कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ८ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹




### ऊस शेतकऱ्यांचे आंदोलन पेटले

**बेळगाव :** बेळगाव आणि बागलकोटसह उत्तर कर्नाटकात ऊस दरासाठी शेतकऱ्यांनी पुकारलेले आंदोलन आज आठव्या दिवशीही सुरूच आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी मदतीसाठी केंद्र सरकारचा दरवाजा खटखटावला असून, शुक्रवारी सायंकाळी बेळगावमध्ये या आंदोलनाला हिंसक वळण लागले. बेळगावजवळील हत्तरगी टोलनाक्यावर संतप्त शेतकऱ्यांकडून दगडफेक करण्यात आली आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाची धग थेट राजधानी बेंगळुरूपर्यंत पोहोचली आहे. प्रति टन ३,५०० रुपये दराच्या मागणीवर शेतकरी ठाम आहेत, तर कारखानदारांनी देऊ केलेला ३,२०० रुपयांचा दर त्यांनी धुडकावून लावला आहे. यामुळे संघर्ष उफाळून आला आहे.

## वे|ध|क

### 'धनंजय मुंडेंकडून हत्येचा कट'

**बीड :** हत्येचा कट उघडकीस आल्यानंतर मनोज जरांगे-पाटील यांनी शुक्रवारी सकाळी पत्रकार परिषद घेतली. यात त्यांनी आपल्या हत्येसाठी अडीच कोटी रुपयांची सुपारी देण्यात आली होती आणि यात त्यांनी थेट धनंजय मुंडे यांचे नाव घेतले. यामुळे खळबळ उडाली आहे. जरांगे म्हणाले की, बीडचा कांचन नावाचा माणूस असून, तो धनंजय मुंडेंचा पीए की कार्यकर्ता आहे. हे षड्यंत्र धनंजय मुंडे यांचे असून, पीए आरोपींना घेऊन परळीला गेले. कांचन आणि मुंडेंमध्ये २० मिनिटे चर्चा झाली. मला मारण्यासाठी अडीच कोटींची डील झाली. आम्ही त्याला ठोकतो बोलल्यावर मुंडेंनी त्यांची जुनी गाडी देण्याचे आश्वासन दिले, असा दावा जरांगेंनी केला. खून करून राजकारणात माणूस मोठा होत नाही. हा प्रकार गंभीर असून, सर्वांनी हुशार होणे गरजेचे आहे, असेही जरांगे पुढे म्हणाले.

# निविदा प्रक्रियापूर्वीच ठेका

## सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचा सावळागोंधळ

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सार्वजनिक बांधकाम विभागातील कामकाज गतिमान आणि पारदर्शक व्हावे, म्हणून ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. मात्र, याच प्रक्रियेत सावळागोंधळ असल्याचे समोर आले आहे. अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयातील विद्युत कामाची निविदा पूर्ण झाली नसताना ठेकेदारांकडून काम केले जात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे बांधकाम विभागाच्या निविदा प्रक्रियेबाबत संशय व्यक्त केला जात आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नसताना ठेकेदाराने काम सुरु केल्याचा आरोप होत आहे. या भोंगळ कारभाराबाबत संताप व्यक्त केला जात आहे.




रायगड जिल्ह्यात विशेष म्हणजे अलिबाग तालुक्यात वेगवेगळी कामे करताना कोणत्याही प्रकारची प्रक्रिया पूर्ण न करता केली जात असल्याचा प्रकार घडत आहे. चौलनंतर अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयातील कारभाराबाबतची माहिती समोर आली आहे.

अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयासह ग्रामीण रुग्णालयात विद्युत विभागामार्फत काम केले जाणार आहेत. रोहित्राबरोबरच केबल टाकण्याचे काम या ठिकाणी केले जाणार आहे. तसेच जिल्हा रुग्णालयातील शल्यचिकित्सक यांच्या कार्यालयात तसेच परिसरात पथदिवे, इन्व्हर्टर लावण्याचे काम अलिबागसह मुरूड याठिकाणीदेखील केले जाणार आहे. या कामांसाठी तीस लाख रुपयांहून अधिक निविदा काढण्यात आली आहे. पेण येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्युत विभागातील कार्यकारी अभियंता यांच्यामार्फत नोंदणीकृत कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदा सवीकारण्याच्या आणि नाकारण्याचे अधिकारी कार्यकारी अभियंता यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत. •➤पान २ वर

> **निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नाही. तरीदेखील कामकाज सुरु केले असल्यास त्याबाबत माहिती घेऊन कारवाई केली जाईल.**
> **– प्रशांत दोडे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, विद्युत विभाग, रायगड**

# नशेली इंजेक्शन विकणाऱ्यावर कारवाई

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

- **अलिबाग पोलिसांनी जप्त केले नशा आणणारे इंजेक्शन**

जीममधील अथवा इतर साहसी खेळ खेळणाऱ्या तरुणांना नशा येणारे इंजेक्शन विकणाऱ्या आक्षी साखरमधील एका तरुणाला पोलिसांनी अटक केली. याप्रकरणी त्याच्याविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्याकडून नशा येणाऱ्या दहाहून अधिक बाटल्या, इंजेक्शन जप्त करण्यात आले आहे. या कारवाईने ड्रग्जची तस्करी करणाऱ्यांना दणका मिळाला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अलिबागमधील साखर आक्षी येथील कोळीवाड्यात एक तरुण •➤पान २ वर

### अल्पवयीन मुलांसह तरुणांना पुरवित होता ड्रग्ज

सूरज राणे हा आरोपी वेल्डींग व्यावसायिक आहे. या धंद्याच्या आड तो गुंगी देणारे औषधांचे इंजेक्शन अल्पवयीन मुलांसह तरुणांना विकत होता. यामध्ये १८ ते ३५ वयोगटातील मंडळींचा अधिक सहभाग आहे. औषधी ड्रग्ज घेण्यासाठी ही मंडळी त्याच्याकडे येत असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### पालकांना आवाहन

जी मुले व्यायामशाळेत जातात, कबड्डी, धावणे व इतर साहसी खेळ खेळतात, त्यांच्या पालकांनी मुलांच्या दोन्ही हातांच्या मनगटाजवळ असलेल्या नसा वारंवार तपासाव्यात. जी मुले वारंवार उत्तेजीत नशा येणारे इंजेक्शन घेतात, त्यांच्या मनगटाजवळ इंजेक्शन टोचल्याच्या खुणा, काळे डाग, नसा काळ्या पडणे, अशी लक्षणे दिसून येतात. त्यांना दुष्परिणामांची माहिती देऊन सुरक्षित ठेवावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

### करोडोंची फसवणूक; गुन्हा दाखल

**पुणे :** पुणे शहराला विद्येचं माहेरघर असं म्हटलं जातं. परंतु, पुणे शहरात गेल्या काही दिवसांपासून सायबर गुन्हे तसंच भोंदू बाबांकडून होणाऱ्या फसवणुकीच्या गुन्ह्यात वाढ होत आहे. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी पुण्यात एक धक्कादायक घटना समोर आली होती. शंकर महाराज अंगात येतात, असं भासवून दिपक जनार्दन खडके, वेदिका पंढरपूरकर व कुणाल पंढरपूरकर यांनी पुण्यातील डोळस या कुटुंबाची १४ कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी पुणे पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, तीन जणांना नाशिक येथून ताब्यात घेतलं आहे, अशी माहिती पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

# चोंढी पुलाच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग-रेवस मार्गावरील चोंढी पुलाला झाडा-झुडपांसह गवताने विळखा घातला आहे. त्याची देखभाल दुरुस्ती करण्यास बांधकाम विभाग उदासीन ठरला आहे. बांधकाम विभागाच्या या कारभाराबाबत तीव्र नाराजीचे सूर उमटत आहेत.

मांडवा ते गेटवे, भाऊचा धक्का तसेच रेवस ते भाऊचा धक्का, करंजापर्यंत जलवाहतूक सेवा सुरू आहे. या सेवेच्या माध्यमातून वर्षाला लाखो पर्यटक अलिबाग ते मुंबई ये-जा करतात. काहीजण नोकरी-व्यवसायानिमित्ताने, तर काही अलिबाग व मुंबईमध्ये फिरण्यासाठी ये-जा करतात. रस्ते वाहतुकीपेक्षा जलवाहतुकीचा प्रवास कमी वेळेत •➤पान २ वर

> **अलिबाग-रेवस रस्ता यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे होता. परंतु, आता एमएसआरडीसीकडे वर्ग करण्यात आला आहे. त्यामुळे या पुलाच्या दुरुस्तीबाबत काहीही बोलू शकत नाही.**
> **– मोनिका धायतडक, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग**

> **चोंढी पुलाच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्याने पुलाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पुलावर वाढलेले गवत, झाडे झुडूप तातडीने काढून पूल सुरक्षेच्या दृष्टीने अधिक मजबूत करण्यात यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.**
> **– संदीप गायकवाड, चिटणीस, आवास मतदारसंघ**



### रेवस रस्त्याला अतिक्रमणांचा विळखा

अलिबाग ते रेवस मार्ग अतिक्रमणांच्या विळख्यात सापडला आहे. रस्त्याच्या दुतर्फा वेगवेगळ्या प्रकारचे अतिक्रमण वाढले आहे. काही धनदांडग्यांचे बंगलेदेखील या रस्त्याच्या दुतर्फा आहेत. या अतिक्रमणामुळे रस्त्यावरच वाहने अनेकजण पार्किंग करतात. त्याचा परिणाम रस्त्यावरील वाहतुकीवर अनेकवेळा होत आहे. याकडे लक्ष देण्याची मागणी केली जात आहे. या रस्त्यावर रस्त्याच्या दुतर्फा महावितरण कंपनीचे उच्चदाब वाहिनीचे खांब व तारा आहेत. या तारांच्या उंचीचे बांधकाम होत असल्याने सुरक्षेचा प्रश्नदेखील निर्माण झाला आहे.

# नागोठण्यात गुटखाविक्रीचा पर्दाफाश

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठण्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौक नाक्यावरील परिसरात बिनधास्तपणे सुगंधी गुटखा विक्री करणाऱ्याला पोलिसांनी अटक करुन गुटखाविक्रीचा पर्दाफाश केला आहे. होलसेल किराणा दुकानावर नागोठणे पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

या कारवाईत नागोठणे पोलिसांनी दोन व्यक्तींवर गुन्हा दाखल केला आहे. यातील मुख्य आरोपी असलेल्या गुटखा विक्री करणाऱ्या दुकानातील एका व्यक्तीला नागोठणे पोलिसांनी अटक केली असून, रोहा येथील फौजदारी न्यायालयाने या आरोपीला १० नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तर यातील गुटखा खरेदी करणारा आमटेम येथील दुसरा आरोपी फरार असून, नागोठणे पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

महाराष्ट्र राज्यात सुगंधी गुटखा, पान मसाला आणि तत्सम पदार्थांच्या साठवणूक व विक्रीवर महाराष्ट्र शासनाने जुलै २०११ मध्ये जारी केलेल्या अधिसूचनेनुसार बंदी घालण्यात आली आहे. असे असतानाही नागोठण्यात काही दुकानदार चोरी छुपे गुटख्याची विक्री करत असल्याची माहिती मिळताच नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली छापामारी करण्यात आली.

नागोठणे पोलिसांनी नागोठणे बाजारपेठ व छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात तपासणी मोहीम राबविली. यावेळी संबंधित दुकानात मानवी आरोग्यास अपायकारक ठरणारा 'केसरयुक्त विमल मसाला' या नावाचे चॉकलेटी रंगाचे प्रत्येकी १९८ रुपये व एकूण १४ हजार ६५२ रुपये किमतीचे •➤पान २ वर



- **१६ हजारांचा गुटखा जप्त**
- **गुटखा किंग मात्र पोलिसांपासून चार हात लांबच**
- **आरोपीला १० नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी**

### अन्यथा रस्त्यावर उतरु : कडू

**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जून २०२६ पर्यंत शेतकऱ्यांची कर्जमाफी करू, असे आश्वासन दिल्याने आम्ही आंदोलन स्थगित केले. सरकारने शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन पूर्ण न केल्यास एक जुलैपासून रेल्वे रोको आंदोलन करून राज्यात एकही रेल्वे धावू दिली जाणार नाही, असा इशारा माजी मंत्री आणि प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी दिला. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी नागपूर येथे आंदोलन उभारल्याबद्दल विविध संघटनांतर्फे पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात बच्चू कडू यांच्यासह शेतकरी नेत्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बच्चू कडू बोलत होते.

# अखेर पुण्यातील जमिनीचा व्यवहार रद्द

**। पुणे । प्रतिनिधी ।**

पुण्यातील कोंढवा जमीन अनियमितता प्रकरणी पार्थ पवार यांच्यावर गंभीर आरोप झाल्यानंतर आता हा व्यवहार रद्द करण्यात येणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्यातच उपमुख्यमंत्री तथा पार्थ पवार यांचे वडील अजित पवारांनी व्यवहारासंदर्भात माहिती दिली.

माझ्या माहितीनुसार हा व्यवहार रद्द करण्यात आला आहे. आता याप्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली असून, ही समिती संपूर्ण चौकशी करेल, त्या चौकशीत सर्व घटनाक्रम पुढे येईल. कोणी मदत केली, कुणाचे फोन गेले हे सगळं समोर येईल. मात्र, मी नेहमीच माझ्या स्वकीयांना, नातेवाईकांनाही सांगतो, नियमाच्या बाहेर जाऊन केलेलं मला चालणार नाही, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले.

मी आजपर्यंतच्या राजकीय जीवनात नियम तोडून काम केलेलं नाही. मागे माझ्यावर २००९-१० ला आरोप झाले, पण ते सिद्ध झाले नाहीत. त्याच्यात अनियमितता होती, श्वेतपत्रिका काढली, हे आपल्याला ज्ञात आहे. अधूनमधून कमेंट्स करुन टार्गेट करण्याचा प्रयत्न केला जातो. या व्यवहारात मला अजिबात काही माहिती नव्हतं. मला माहिती असतं तर लगेच सांगितलं असतं मला विचारुन व्यवहार झालेला आहे. साहजिकच विरोधक आम्हाला बदनाम करण्याचा प्रयत्न करणार, त्यामध्ये दुमत नाही, असेही अजित पवार म्हणाले.

# तहसील आवारातील स्वच्छतागृहांची दुरवस्था

## वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष, नागरिकांमधून संताप

**। चौल । प्रतिनिधी ।**

मुरुड तहसील कार्यालयाच्या आवारातील स्वच्छतागृहांची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. तहसीलदारांसह दुय्यम निबंधकांचे कार्यालय याच ठिकाणी आहे. मात्र, याच आवारात बसत असतानाही या मूलभूत सुविधेकडे होणारे दुर्लक्ष नागरिकांच्या संतापाचे कारण ठरत आहे.

मुरुड तहसील कार्यालयात रोज तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो नागरिक आणि महिला विविध शासकीय कामांसाठी येत असतात. मात्र, येथील स्वच्छतागृहात प्रचंड अस्वच्छता पसरली असून, त्यांची मोठी दुरवस्था झाली आहे.



झाडा-वेलींच्या जंगलाने स्वच्छतागृहांना विळखा घातला आहे. विशेष म्हणजे, याच आवारात तहसीलदार आदेश डफळ आणि दुय्यम निबंधक यांचे कार्यालय आहे. सध्या जमीन विक्रीच्या कामासांठी येणारे नागरिक तसेच तहसीलदार कार्यालयात येणाऱ्या महिलांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. असे असतानाही तहसीलदार आदेश डफळ यांचे या गंभीर समस्येकडे लक्ष नसल्याचे चित्र दिसत आहे. •➤पान २ वर

> **स्वच्छतागृहांची तात्काळ स्वच्छता करण्याच्या सूचना कर्मचाऱ्यांना देण्यात येतील. यापुढे स्वच्छतागृह नियमित स्वच्छ ठेवण्याची ताकीद देण्यात येईल.**
> **– आदेश डफळ, तहसीलदार, मुरुड**

# दिलीप भोईरसह चौघांची कारागृहात रवानगी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मारहाणीबरोबरच घातक शस्त्राने हल्ला करणाऱ्या २१ जणांपैकी चौघेजण अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर अखेर पाच दिवसांनी दिलीप भोईर यांच्यासह चौघांची रवानगी तळोजा कारागृहात करण्यात आली आहे.

चोंढी नाक्यावर ११ सप्टेंबर २०१२ रोजी कॉम्प्युटर क्लासमध्ये घुसून रुपाली थळे यांच्यासह अनेकांना मारहाण करण्यात आली. घातक शस्त्राने मारहाण केल्याप्रकरणी शिंदे गटातील दिलीप भोईर उर्फ छोटमशेठ यांच्यासह २५ पैकी २१ जणांना जिल्हा न्यायालयाने दोषी ठरवत सात वर्षे सक्तमजुरी आणि प्रत्येकी तीन हजार रुपये दंड अशी शिक्षा गुरुवारी (दि.३०) सुनावली होती.

शिक्षा सुनावलेल्या २१ पैकी १७ आरोपींना तळोजा कारागृहात ३० ऑक्टोबरला रात्री पाठविण्यात आले होते. उर्वरित चार आरोपींची प्रकृती बिघडल्याने त्यांना अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यामध्ये माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर, गणेश म्हात्रे, जयवंत साळुंखे, अशोक थळे यांचा समावेश होता. गेल्या अनेक दिवसांपासून या चौघांवर अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु होते. पोलिसांच्या देखरेखीखाली उपचार करण्यात आले होते. •➤पान २ वर

# भटक्या कुत्र्यांना तात्काळ हटवा

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण आदेश

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

शैक्षणिक संस्था, बस-रेल्वे स्थानके आणि क्रीडा संकुलांच्या आसपास फिरणाऱ्या भटक्या कुत्र्यांना त्वरित हटवून त्यांना आश्रयस्थानात हलवावे, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत. तसेच, सर्व शाळा, महाविद्यालये, रुग्णालये आणि शासकीय संस्था योग्यरित्या कुंपणबंद आहेत का? हे तपासण्याचे आदेशही न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.



न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, भटकी कुत्री पशू जन्म नियंत्रण नियमांनुसार लसीकरण आणि नसबंदी केल्यानंतरच आश्रयस्थानात ठेवली जावीत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, न्यायालयाने आदेश दिला आहे की, कुत्र्यांना ज्या ठिकाणांहून पकडले जाईल, त्याच ठिकाणी त्यांना परत सोडले जाऊ नये. न्यायालयाने नमूद केले, ''त्यांना त्याच ठिकाणी परत सोडण्याची परवानगी देणे, म्हणजे अशा संस्थांना मोकाट कुत्र्यांपासून मुक्त करण्याच्या मूळ उद्देशालाच निष्फळ ठरेल.''मोकाट कुत्र्यांमुळे लहान मुलांना चावण्याच्या घटना आणि रेबीजच्या रुग्णसंख्येतील वाढ यावर •➤पान २ वर

**आयोगाच्या निर्णयावर नाराजी | नऊ ग्रामपंचायतींमधील ग्रामस्थ संतप्त**

# निवडणूक शहरात, आचारसंहिता गावात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नऊ ग्रामपंचायतींमध्ये आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. कर्जत आणि माथेरान नगरपरिषद निवडणूक असल्याने लावलेल्या आचारसंहितेमुळे स्थानिक ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. दरम्यान, शहरी भागाच्या लगतची ही गावे असल्याने राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहिता लावण्याचा निर्णय घेतला आहे.

कर्जत तालुक्यात कर्जत आणि माथेरान नगरपरिषदेमध्ये सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्या-त्या शहरात राज्य निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहिता लागू केली आहे. या शहराच्या बाजूला असलेल्या किरवली, हालिवली, शिरसे, वेणगाव आणि तिवरे या ग्रामपंचायती आहेत. त्या ग्रामपंचायतींमध्ये कर्जत नगरपरिषदेची आचारसंहिता लागू झाली आहे. तर, माथेरान नगरपरिषद हद्दीत नेरळ, दामत, माणगाव तर्फे वरेडी, ममदापूर या ग्रामपंचायती असल्याने त्या सर्व ठिकाणी आचारसंहिता लागू झाली आहे. ग्रामीण भागातील आचारसंहितेची अंमलबजावणी करण्याचे काम कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांनी पत्रक काढून केले आहे. मात्र, नगरपरिषद निवडणुकीची आचारसंहिता ग्रामीण भागासाठी लावण्यात आल्याने संतापाची भावना या सर्व नऊ ग्रामपंचायतींमध्ये दिसून येत आहे.



> **आमच्या आदिवासी भागातील विकासकामे रोखून धरण्यासाठी ही आचारसंहिता लागू केली असल्याचे आम्हाला वाटत आहे.**
> **– सचिन गायकवाड, ग्रामस्थ आसल**

> **आमचे गाव हे माथेरान या पर्यटन स्थळाचे प्रवेशद्वार समजले जाते. मात्र, त्यामुळे माथेरानमध्ये निवडणूक असेल, तर नेरळमध्ये आचारसंहिता लावण्याचा राज्य निवडणूक आयोगाचा उद्देश समजून येत नाही. दुसरीकडे नेरळमध्ये आचारसंहिता लावणार आहेत, तर आमच्या गावात नगरपरिषद होण्यासाठी आम्ही दहा वर्षे मागणी करून या ठिकाणी नगरपरिषद केली जात नाही. मात्र, माथेरानमध्ये निवडणूक असताना आचारसंहिता लावली जाते, हे दुर्दैवी आहे.**
> **– गोरख शेप, ग्रामस्थ नेरळ**

# पोलादपूरकर घरपट्टीवाढी विरोधात एकवटणार

## डॉ. काका करमरकर यांच्या श्रीगणेश मंदिरात श्रीगणेशा

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

शहरातील नागरिकांना सलग दुसऱ्यावर्षी घरपट्टीवाढीचा तडाखा देणाऱ्या नगरपंचायत पोलादपूरविरोधात आक्रोश मोर्चा करण्यासाठी आता पोलादपूरकर नागरिक एकवटणार असून, पोलादपूरचे शिल्पकार डॉ. काका करमरकर यांच्या बाजारपेठेतील श्रीगणेश मंदिरामध्येच विरोधाचा श्रीगणेशा शहराच्या विविध भागातील २५ ग्रामस्थांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी सर्वाधिक गाळे असणारे दिलीपसाबळेयांनीनगरपंचायतीवर धडक आक्रोश मोर्चा नेण्याचा सल्ला उपस्थितांना दिला.

पोलादपूर नगरपंचायतीतर्फे गेल्यावर्षी घरपट्टीवाढीच्या नोटीसा बजावण्यात आल्यानंतर अनेकांनी हरकती घेतल्या. या हरकतींवर कोणत्याही प्रकारचे उत्तर न देणाऱ्या नगरपंचायतीने यंदा पुन्हा नागरिकांना पूर्वीपेक्षा अधिक घरपट्टी लावण्यासंदर्भात नोटीसा बजावल्या आहेत. यामुळे पोलादपूरकरांनी बाजारपेठेतील श्रीगणेश मंदिरामध्ये तब्बल विविध भागातील सुशिक्षित आणि समाजसेवी व्यक्तींनी पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाने केलेल्या आवाहनास प्रतिसाद देत उपस्थिती दर्शविली.

यामध्ये दिलीप साबळे, दीपक शेठ, नितीन शेठ, प्रमोद मंडले, अजित घाटे, अमित तलाठी, ओंकार मोहिरे, प्रकाश मांढरे, प्रमोद शेठ, उमेश सवादकर, संतोष जाधव, जगन्नाथ कदम, दर्पण दरेकर, संतोष मोरे, शैलेश पालकर, सुनील भिलारे, जितू वाडीले, रवी तलाठी, अक्षय शिवदे, निलेश सुतार,सुनील दुदूस्कर, रियाज धामणकर, संतोष चिकणे, संदेश सुरेश शेठ, विलास इंगवले आदींनी चर्चेत सहभाग घेतला.

याप्रसंगी पोलादपूरकरांनी मागील वर्षी हरकती आणि निवेदनांवर नगरपंचायतीने केलेली कार्यवाहीयाबाबतकथनकरण्याची गरज व्यक्त केली. मागील वाढीव घरपट्टीच्या तुलनेत यंदाची घरपट्टी अधिक असल्याचे निदर्शनास आणून दिल्याने नगरपंचायतीने हरकतींवर काय विचार केला, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला. नागरिकांमध्ये झोन चार्ट, विकास आराखडा याबाबत अनभिज्ञता असल्याचे नागरिकांचे म्हणणे असून स्क्वेअर मीटरऐवजी स्क्वेअर फूटमध्ये मोजणी करून पूनर्मूल्यांकन करण्याची मागणी नागरिकांनी यावेळी केली आहे.

याप्रसंगी ज्येष्ठ घरपट्टीदार दिलीप साबळे यांनी येत्या ११ नोव्हेंबरला पोलादपूर शहरातील श्रीगणेशमंदिरामध्ये पुन्हा एक विचारविनिमय सभा घेऊन नगरपंचायतीवर नागरिकांचा आक्रोश मोर्चा मोठया संख्येने नेण्याचा निर्णय घेण्यात यावा, अशी सूचना केली. याबाबत दर्पण दरेकर आणि सहकारी यांनी आगामी सभा मोठ्या प्रमाणात पोलादपूरकरांच्या उपस्थितीत होण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यास सुरूवात केली आहे.

## प्रवासी सुरक्षिततेसाठी कोकण रेल्वला निवेदन



। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील सापे-वामने रेल्वे स्थानक पुनर्विकासानंतर प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरत आहे. उंचीचे प्लॅटफॉर्म नसल्यामुळे प्रवाशांना चढणे-उतरणे धोकादायक झाले आहे. या प्रमुख समस्येसह स्थानकाच्या सापे वामने रेल्वे स्थानकांच्या विकासात्मक मागणीकरिता आम्ही सापे, वामने, नडगाव शेतकरी बहुविकासीय सामाजिक संस्था महाड यांनी नुकतीच कोकण रेल्वे कार्यालय नवी मुंबई बेलापूर येथे कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडचे मुख्य वाणिज्य व्यवस्थापक आशुतोष श्रीवास्तव यांची भेट घेऊन रेल्वे स्थानकाबाबत गैरसोय दूर कराव्यात, या मागणीचे निवेदन दिले.

यावेळी सापे-वामने रेल्वे स्टेशनच्या समस्यांबाबत निवेदन देताना संस्थेचे अध्यक्ष सुनिल जाधव, सरचिटणीस अनंत जाधव, सल्लागार नामदेव घाणेकर, प्रवीण साळवी, रामू दवंडे, सुभाष धारसे आदी उपस्थित होते.

प्रवाशांच्या सोयीसाठी प्लॅटफॉर्मची उंची आणि लांबी वाढविणे, स्थानिक ग्रामस्थ आणि गुरांच्या सुरक्षित हालचालीसाठी भुयारी मार्ग, वाहनांच्या वाहतुकीकरिता उड्डाणपूल उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडचे मुख्य वाणिज्य व्यवस्थापक आशुतोष श्रीवास्तव यांनी सांगितले की, या मागणीकरिता आम्ही प्रयत्नशील आहोत. प्लॅटफॉर्मची उंची आणि लांबी वाढविणे, वाहनांच्या वाहतुकीकरिता उड्डाणपुल अशा दोन कामाकरिता निधी प्राप्त झाला असून, या महत्त्वपूर्ण मागणीला लवकरच मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

## बोर्लीत नरेंद्र महाराजांच्या पादुकांचा दर्शन सोहळा

। कोर्लई । प्रतिनिधी ।

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी व पिठाचे उत्तराधिकारी परमपूज्यकानिफनाथमहाराजयांच्या कृपाशीर्वादाने मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता दक्षिणपीठ नाणीजधामच्यावतीने मुरुड तालुक्यातील बोर्ली येथील अमित वेसावकर यांच्या मैदानावर सिद्ध पादुका दर्शन सोहळा संपन्न होत असून, सोहळ्याची जय्यत तयारी सुरु आहे.

या सोहळ्यामध्ये गुरुपूजनासह सामाजिक उपक्रमांतर्गत रामानंद संप्रदायातर्फे गरजू शालेय विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप करण्यात येणार आहे. यादिवशी सर्वप्रथम बोर्लीतील यजमान जितेंद्र पाटील यांच्या निवासस्थानापासून श्रींच्या पादुका वाजत गाजत कार्यक्रमस्थळी येताना मुख्य बॅनर, बाईकरॅली, ढोलपथक, कलशधारी महिला, निशाणधारी पुरुष, रामपंचतन देखावा, विविध देखावे, कोळीनृत्य, भजनपथक, माऊलींचा रथ, हरिपाठ नृत्य, खालुबाजा, लेझीमपथक व शेवटी भक्तगण अशी पथके खास आकर्षण असणार आहेत. तरी सर्व रायगड जिल्ह्यातील भक्तगणांनी या सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन रामानंद संप्रदाय (जिल्हा दक्षिण रायगड) यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

## उरण ते शिर्डी मानाच्या पहिल्या पालखीचा सामाजिक

। उरण । प्रतिनिधी ।

साईबाबांनी आपल्याला श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र दिला. याच साईबाबांची पालखी श्री साई सेवा मंडळ उरणमधून दरवर्षी काढण्यात येते. यंदा पालखीचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्त महेंद्र घरत यांच्यातर्फे शिर्डीला जाणाऱ्या तरुणांना टी-शर्ट देण्यात आले. गेल्या तीन वर्षांपासून टी-शर्ट देण्याचा उपक्रम महेंद्र घरत यांनी सुरू केला आहे.



यावेळी काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष अखलाख शिलोत्री, द्रोणागिरी स्पोर्ट असोसिएशनचे महादेव घरत, उद्योजक मंगेश तांडेल, माजी जिल्हा परिषद सदस्य तुकाराम कडू, मुरलीधर ठाकूर, लंकेश ठाकूर, भेंडखल उपसरपंच अजित ठाकूर, उरण तालुका युवक इंटक अध्यक्ष राजेंद्र भगत, उरण तालुका पर्यावरण अध्यक्ष अंगद ठाकूर, रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश ठाकूर, ग्राम सुधारणा मंडळ सोनारी अध्यक्ष अजय म्हात्रे, सोनारी उपाध्यक्ष प्रशांत कडू आदींसह मंडळाचे अध्यक्ष सतीश पाटील, कार्याध्यक्ष चंद्रकांत म्हात्रे, उपाध्यक्ष चंद्रकांत कडू, उपाध्यक्ष सुधीर ठाकूर, उपाध्यक्ष सोपान टकले, सचिव जगदीश कडू, खजिनदार अमित मुंबईकर व कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपास्थित होते.

यावेळी अपोलो हास्पिटल, ग्रामसुधारणा मंडळ अध्यक्ष आणि ग्रामपंचायत सोनारीच्या वतीने आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. टोपी आणि ओळखपत्र वाटपही यावेळी करण्यात आले.

## पोयनाडची स्टेट बँकेची शाखा नवीन जागेत

। भाकरवड । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील बाजारपेठेत असलेल्या भारतीय स्टेट बँक शाखा पोयनाडचे नवीन जागेत स्थलांतर होणार आहेत. पेण-अलिबाग हमरस्त्यावर किशोर सुपे यांच्या जागेत पोयनाड नाकालगत बँकेचे स्थलांतर होणार असून, सोमवार, दि. १० नोहेंबर रोजी हा कार्यक्रम पार पडणार आहे.

पोयनाड बाजारपेठेत बँकेची शाखा असल्याने बँकेत येणाऱ्यांच्या गाड्या दुतर्फा रस्त्यावर लागल्याने ट्रॅफिक जाम होत होती आणि व्यापारी वर्गाच्या मालवाहतूक गाड्या समान घेऊन आतमध्ये आल्यानंतर अरुंद रस्त्याअभावी अडचण निर्माण होत होती. त्यामुळे बँकेत येणाऱ्या ग्राहकांना खूप त्रास सहन करावा लगतो.

ही बाब येथील बँक मॅनेजर यांच्या लक्षात आल्याने त्यांनी नवीन जागेचा शोध चालू केला आणि आता नव्याने पोयनाड नाका येथे या बँकेचे स्थलांतर केले आहे. यानिमित्ताने सकाळी ११ वाजण्याच्या शुभमुहूर्तावर सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले असून, सर्वांना यानिमित्ताने तीर्थप्रसाद घेण्याचे आवाहनयावेळीबँकप्रशासनाच्या मार्फत करण्यात येत आहे.

## शारदा मंदिर मराठी माध्यम कर्जत तणावमुक्त अभ्याससत्र

। नेरळ । प्रतिनिधी ।

शाळेत येणारे विद्यार्थी हे कायम तणावमुक्त राहावेत यासाठी आणि तणावरहित अभ्यास कसा करावा यासाठी शारदा मंदिर शाळेत मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी सेवानिवृत्त विस्तार अधिकारी संग्राम सोलनकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



संग्राम सोलनकर यांनी विद्यार्थ्यांना एक तास मार्गदर्शन केले. यामध्ये अभ्यास कुठे करावा, किती वेळा एका ठिकाणी बसून अभ्यास करावा, सकाळी पहाटे केलेला अभ्यास तणावमुक्त असतो याची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना तणावमुक्त अभ्यासाची माहिती देण्यात आली. सकाळी उठून गायत्री मंत्राचा जप, व्यायाम करणे, पालकांना दररोज नमस्कार करणे, असे प्रयोजन व मार्गदर्शन सोलनकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी आठवी ते दहावीमधील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय राम सावंत यांनी केले.

## पान १ वरून

### निविदा प्रक्रियापूर्वीच ठेका

दि. ३१ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर या कालावधीत निविदा प्रक्रिया राबविली जाणार आहे.त्यानंतर ११ नोव्हेंबरला निविदा उघडली जाणार आहे. मात्र, या निविदा प्रक्रिया पूर्ण होण्याअगोदरच एका ठेकेदारामार्फत कामाला सुरुवात करण्यात आली आहे. ही विद्युत कामे गेल्या काही दिवसांपासून सुरू केल्याची माहिती समोर आली आहे. निविदा प्रक्रिया ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता पूर्ण होणार आहे. तरीदेखील नियमांचे उल्लंघन करीत ठेकेदाराकडून त्याचे काम सुरू केले आहे. त्यामुळे या निविदा प्रक्रियेच्या कामाबाबत संशय व्यक्त केला जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचा विद्युत विभाग ठेकेदारावर मेहेरबान का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### नशेली इंजेक्शन विकणाऱ्यावर कारवाई

मेफेन्टरमाईन गुंगीकारक औषध विकत असल्याची माहिती अलिबाग पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्यासह त्यांच्या पथकाने गुरुवारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास छापा टाकला. या छाप्यात मेफेन्टरमाईन सल्फेट इंजेक्शनच्या दहा बाटल्या आढळून आल्या. तसेच काही रोकड सापडली. तेथील सूरज मनोज राणे (२९) या तरुणाला ताब्यात घेण्यात आले. त्याची कसून चौकशी केली असता, जीममध्ये जाणाऱ्या व इतर साहसी खेळ खेळणाऱ्या खेळाडूंना गुंगीकारक औषध बेकायदेशीररित्या विकत असल्याचे स्पष्ट झाले. डॉक्टरांच्या परवानगीशिवाय हा गैरप्रकार तो करीत होता. सर्व मुद्देमाल जप्त करण्या आला. याप्रकरणी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्याला भारतीय न्याय संहिता तथा बी.एन.एस.एस.३५(३) प्रमाणे नोटीस बजावण्यात आली आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक प्रतिक पाटील करीत आहेत. सूरज राणे हा आरोपी आक्षी साखरमधील रहिवासी आहे. तो गावातील फॅब्रिकेशन आणि वेल्डींगच्या दुकानामध्ये हा गैरधंदा चालवित असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार त्याच्यावर छापा टाकण्यात आला. सूरज राणे याच्याविरोधात यापूर्वीदेखील हल्ला करणे यासारखे गुन्हे अलिबाग पोलीस ठाण्यात दाखल झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### नागोठण्यात गुटखाविक्रीचा पर्दाफाश

७४ पॅकेट आढळून आले. तसेच '१ तंबाखू' नावाचे प्रत्येकी २२ रुपये व एकूण १ हजार ६२८ रुपये किमतीचे ७४ पॅकेट आढळून आले. या सर्व गुटखा मालाची एकूण किंमत १६ हजार, २८० रुपये आहे.

असे असले तरी या दुकानदारांना गुटखा माल पुरविणारा होलसेल मोठा व्यापारी असलेला 'गुटखा किंग' मात्र पोलिसांपासून अजून चार हात दूरच असल्याने त्याचाही पोलिसांनी शोध घेण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. याप्रकरणी पुढील तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सूरज पाटील करीत आहेत.

### दिलीप भोईरसह चौघांची रवानगी कारागृहात

अखेर त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे लक्षात आल्यावर चौघांची रवानगी तळोजा कारागृहात करण्यात आली आहे. दिलीप भोईर, गणेश म्हात्रे, अशोक थळे यांना शुक्रवारी सकाळी आणि जयवंत साळुंखे यांना बुधवारी कारागृहात पाठविण्यात आल्याची ंमहिती पोलिसांनी दिली.

### तहसील आवारातील स्वच्छतागृहांची दुरवस्था

संतापाची गोष्ट म्हणजे, महिलांच्या स्वच्छतागृहाला तर टाळे लावण्यात आले आहे. यामुळे महिलांची कुंचबणा होत आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कार्यालयापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या स्वच्छतागृहाची ही अवस्था प्रशासनाची एकूणच उदासीनता उघड करत आहे. या अस्वच्छतेमुळे रोगराई पसरण्याची भीती असून, महिलांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. तहसीलदारांनी यात तातडीने लक्ष घालून स्वच्छतागृह दुरुस्त करावे आणि त्याची नियमित साफसफाईची सोय लावावी, अशी मागणी जोर धरु लागली आहे.

### चोंढी पुलाच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष

होत असल्याने जलवाहतुकीला अधिक पसंती दर्शविली जात आहे. सध्या गेल्या काही वर्षांपासून रो-रो सेवा सुरु झाल्याने वाहनांचीदेखील या मार्गावर संख्या प्रचंड वाढली आहे. रस्ता अरुंद असल्याने या मार्गावर अनेक वेळा वाहतूक कोंडीचा प्रश्न भेडसावत आहे.

अलिबाग-रेवस मार्गावरील चोंढी येथील जुन्या पुलाच्या जागी नवीन पूल बांधण्यात आला. हा पूल गेल्या अनेक वर्षांपासून वाहतुकीसाठी खुला आहे. पूल रुंद असला तरी या पुलाच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याचे समोर आले आहे. पुलाच्या दोन्ही बाजूकडील कठड्यांना गवत, झाडा-झुडरपांनी विळखा घातला आहे. वाढलेले गवत, झुडूपे काढण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष करण्यात आले आहे. अलिबाग-रेवस हा रस्ता आता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे वर्ग झाला आहे. त्यामुळे हा सार्वजनिक बांधकाम विभागाने पुलाच्या देखभाल दुरुस्तीबाबत हात वर केले आहेत. या पुलाच्या सुरक्षेबाबत संबंधित विभाग उदासीन ठरल्याचे चित्र दिसून येत आहे.

### भटक्या कुत्र्यांना तात्काळ हटवा

माध्यमांनी प्रकाश टाकल्यानंतर २८ जुलै रोजी न्यायालयाने या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली होती, त्याच खटल्याचा एक भाग म्हणून हा आदेश देण्यात आला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांना तातडीने सार्वजनिक व खासगी शैक्षणिक संस्था आणि क्रीडा संकुलांची यादी तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, जिल्हाधिकारी यांना आदेश दिला आहे की, सर्व शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, क्रीडा मैदाने आणि शासकीय संस्थांना योग्य कुंपण आहे का? याची करावी. नियमित तपासणी: या परिसरांमध्ये भटकी कुत्रे नाहीत याची खात्री करण्यासाठी नियमित तपासणी करणे बंधनकारक असेल. बसस्थानकांसह अशा परिसरांमध्ये आढळलेली सर्व भटकी कुत्री हटवून त्यांना आश्रयस्थानात हलवली जावीत आणि पुन्हा त्याच जागेवर सोडले जाऊ नये, असे न्यायालयाने सांगितले.

## दहिवलीत किल्ला स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

। नेरळ । प्रतिनिधी ।



दहिवली गाव परिसर विचार मंचाच्यावतीने किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. उल्हास नदीच्या तीरावर प्रति अयोध्या, दहिवली येथे साजरा झाला. याप्रसंगी प्रथम दीपोत्सव करण्यात आला. दहिवली ग्रामस्थ, किल्ले स्पर्धक मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले होते. प्रभू रामचंद्र यांची पूजा करुन दीपोत्सवाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी महिला भगिनींची उपस्थिती लक्षणीय होती. दरम्यान, किल्ला स्पर्धेतील विजेत्यांचा यावेळी गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांची पूजा रामचंद्र भागवत, मधुकर सुर्वे, सुनील जाधव, विकास चित्ते, शशांक शेट्टी यांच्या हस्ते झाले. विकास चित्ते यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना गावात सांस्कृतिक, ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी किल्ले स्पर्धा आयोजित केल्याचे स्पष्ट केले. सुनील जाधव यांनी दहिवली गाव परिसर विचारमंच समूहाकडून गावात होत असलेली कामे याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भरत बामणे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची गीते खणखणीत आवाजात गाऊन अवघा परिसर शिवमय केला.

कार्यक्रमाचे शेवटी महाराष्ट्र गीत झाले त्यावेळी सर्वांना उभे राहून मानवंदना दिली. या स्पर्धेत तीन गटात झालेल्या स्पर्धेतील विजेत्या सन्मानित करण्यात आले. परीक्षक म्हणून राजे प्रतिष्ठान, अध्यक्ष महेंद्र भोईर आणि अखंड कोथळीगड संवर्धन समिती अखंड भिवगड संवर्धन समितीचे समन्वयक समाधान पाटील यांनी सहकार्य केले.

दरम्यान, मोठ्या गटात प्रथम क्रमांक :दहिवलीचा राजा-किल्ले रायगड, व्दितीय- शंतनू सुजित मालुसरे- कोथळीगड. लहान गट- प्रथम क्रमांक- शिवमल्हार, किल्ले - लोहगड, द्वितीय क्रमांक- साईसेना मित्रमंडळ, साईनगर, किल्ले - तोरणा. उत्तेजनार्थ- गिरीवन, नंदनवन सोसायटी ग्रुप, पन्हाळा, गिरीवन नंदनवन सोसायटी-रायगड, बेला अजय घरत- संजयनगर-किल्ले-पद्मदुर्ग, धनराज शिंदे, संजयनगर-रायगड, श्रवण हेमंत कदम-मल्हार गड यांचा समावेश आहे.



## 'मोकाट जनावरांबाबत योग्य कारवाई करावी'

। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा शहर व परिसरात रस्त्यावर मोकाट फिरणाऱ्या जनावरांमुळे अपघातांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर बजरंग दलाचे प्रखंड मंत्री प्रसन्न प्रकाश निजामपूरकर यांनी म्हसळा पोलिस स्टेशनमध्ये लेखी निवेदन देऊन योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निजामपूरकर यांनी दिलेल्या निवेदनात नमूद करताना काही जनावरांचे मालक निष्काळजीपणे आपली जनावरे रस्त्यावर सोडतात त्यामुळे वाहनचालक व पादचारी यांना वारंवार अपघातांना सामोरे जावे लागत आहे. अशा निष्काळजी मालकांविरोधात कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. रस्त्यावर मोकाट जनावरे फिरत असल्यामुळे अनेकवेळा गंभीर अपघात घडले आहेत.

पोलीस प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निजामपूरकर यांनी निवेदनातून केली. निवेदन देण्यावेळी त्यांच्या समवेत माजी सभापती महादेव पाटील, गोरक्षक अजय करंबे, संकेत खोपकर, किरण आग्रे, पाटुकळे, धिमर, अक्षय जंगम आदी उपस्थित होते.

## निजामपूरकर यांची निवेदनाद्वारे मागणी

दि. ०७/११/२०२५

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे तळवली, ता. मुरूड जि. रायगड येथील खालील नमुद असलेली जमिन मिळकत. सदर मिळकतीचे विद्यमान मालक सुनिल नथुराम कोकबनकर, भारती संतोष देऊळकर, शरतु संजय नांदगावकर यांनी विक्री व्यवहारास काढलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरोसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीशी विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटिस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिलेले आहे. त्या संबंधीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| तळवली, ता.मुरूड | २६६ | ०-८१-००<br>पो.ख ०-०३-३०<br>एकुण ०-८४-३० | १९.७५ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी सुनिल नथुराम कोकबनकर, भारती संतोष देऊळकर, शरतु संजय नांदगावकर यांचे मालकीचे क्षेत्र ०-६१-०० हे. आर. मिळकतीपैकी क्षेत्र ०-२०-०० हे.आर क्षेत्र या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात इतर कोणाचीही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार वहिवाटीचे येणेजाणेचे मार्ग, वारसहक्क आदी कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास वा त्यांचे वरील मिळकतीच्या सदर विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणारे यांच्याकडे कळवावी. येणेप्रमाणे सदर विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील. व त्यानंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

दि. ०७/११/२०२५

**ॲड. मोहनिश मनोहर ठाकुर**
रा.चिंचघर, पो.बोर्ली, ता. मुरूड, जि.रायगड
मो.नं.८०८००१९११५

## निवडक

### सखी जल्लोष कार्यक्रम साजरा




**श्रीवर्धन :** तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत गाणी व दि प्राईड इंडिया संस्था आणि महानगर गॅस लिमिटेड यांच्यावतीने सखी जल्लोष हा कार्यक्रम शुक्रवार (दि.७)नोव्हेंबर रोजी गाणी येथे संपन्न झाला.कार्यक्रमासाठी श्रीवर्धन उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली दामिनी पथकातील कांचन जवान, ऋतुजा शिरतोडे, प्रतीक्षा कानावडे, गौरी शिंदे उपस्थित होत्या. यावेळी दामिनी पथकातील अंमलदारानी महिला विषयी समस्या जाणून घेतल्या तसेच डायल ११२ व सायबर फ्रॉड बाबत माहिती दिली. यावेळी दामिनी पथकातील सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी महिलांना स्व-सुरक्षितता, स्वसंरक्षण, महिलांची जबाबदारी, महिलांचे पुरुषांबरोबर असणारे समान स्थान यावर मार्गदर्शन केले. दि प्राइड इंडिया संस्थेचे तालुका प्रकल्प समन्वयक किशोर शितोळे यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास गाणी ग्रमसेवक अभिजित माने, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष रमेश धाडवे, सुभाष उजळ, सुदाम शेडगे, आत्माराम रहाटवल, राज कावनकर, आर्यन येलवे व तालुक्यातील सर्व समन्वयक उपस्थित होते.

### तळा-मांदाड रस्त्याची दुरवस्था



**तळा :** तळा तालुक्यातील तळा-मांदाड-आगरदांडा या रस्त्यावरील मांदाड- मांदाड पुल (खाजणी) रस्त्या दरम्यान अंदाजे १ कि.मी. रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असल्याने वाहनचालक, पर्यटक व प्रवासी वर्गातून सदर रस्त्याबाबत नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. तळा तालुक्यासाठी सहा तालुक्यांना जोडणारा हा मांदाड पुल असून या पुलावरून मुरूडकडे अनेक प्रवासी या मार्गावरून प्रवास करत असतात. तसेच पर्यटनाच्या दृष्टीने पर्यटकांना श्रीवर्धन-मुरुड असा हा जवळचा मार्ग असल्याने अनेक पर्यटक या मार्गावरून प्रवास करतात. मात्र या मार्गावर मांदाड गाव ते पुलापर्यतच्या रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरल्याने वाहनचालकाला वाहन चालविताना मोठी कसरत करून वाहन चालवावे लागते त्यामुळे सदर रस्त्यावरील खड्डे त्वरीत भरून डागडूजी करावी व सदर रस्ता होण्यास ज्या कोणत्या अडचणी असतील त्या अडचणी दूर करून या रस्त्याचे काम त्वरीत व्हावे अशी मागणी प्रवासी वर्गातून व्यक्त केली जात आहे.

### मोटारसायकलची चोरी

**पनवेल :** पनवेल रेल्वेस्टेशन येथील पार्किंग जवळील साई मंदिराच्या बाजूला उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. रेवणनाथ पालवे यांनी त्यांची ३० हजार रुपये किमतीची बजाज कंपनीची एमएच १६ एसी ४७७१ डिस्कव्हर मोटारसायकल निळ्या काळ्या रंगाची ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### गांजाच्या तस्करीत दोघे अटकेत

**पनवेल :** हायड्रो गांजाची तस्करी करणाऱ्या केयूर जयेश गोगरी या तरुणाला अटक करण्यात आल्यानंतर या तस्करीत सहभागी असलेल्या आणखी दोन तरुणांना नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे. मोहम्मद आमान सलीम शेख (वय२०) व हित मुकेश पटेल (वय २२) अशी या दोघांची नावे आहेत. हे दोघेही केयूर गोगरी याच्याकडून हायड्रो गांजा घेऊन ते खारघरमधील मुलांना विक्री करत असल्याचे तपासात आढळून आले आहे. खारघरमध्ये राहणारा केयूर गोगरी हा राहत्या घरातून अमली पदार्थाची विक्री करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर अमली पदार्थ विरोधी पथकाने ३० ऑक्टोबर रोजी खारघर सेक्टर-१९ मधील शिवसाई बिल्डिंगवर छापा मारला होता. त्यावेळी केयूर गोगरी याच्या कारमध्ये ८०० मिलीग्रॅम वजनाचा हायड्रो गांजा सापडला होता. अमली पदार्थ विरोधी पथकाने केयूर गोगरी याला एनडीपीएस कलमाखाली अटक केली होती. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडे अधिक केयूर गोगरी याच्या चौकशीत त्याने भांडुप येथे राहणाऱ्या शारीख याच्याकडून हायड्रो गांजा आणून त्याची विक्री करत असल्याचे कबूल केले आहे.

### सराईत गुन्हेगार पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल :** पनवेल शहर पोलिसांच्या कोम्बिंग कारवाई दरम्यान एका सराईत गुन्हेगारास पनवेल रेल्वेस्टेशन जवळील नवनाथ मंदिर मालधक्का झोपडपट्टी परिसरातून ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी इजाज शेख उर्फ अज्जू याने त्या परिसरात चहा टपरीवर चहा पिण्याकरिता थांबलेले महादेव देवकांबळे (वय ४५) यांच्या कडील ओपो कंपनीचा १२,५०० रुपये किमतीचा मोबाईल फोन जबरदस्तीने ओढून चोरून घेऊन गेला होता व चाकूचा धाक दाखविला होता. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने त्या परिसरात कोम्बिंग कारवाई करून आरोपीला ताब्यात घेतले आहे.

### बांधकाम साहित्याची चोरी

**पनवेल :** अनेक वर्षांपासून बांधकाम सुरू असलेल्या खारघर येथील महापौर निवासाच्या इमारतीच्या कामासाठी मागवलेल्या वीज साहित्याची चोरी झाली आहे. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. या घटनेत एक लाख रुपयांची केबल व इतर साहित्य चोरण्यात आले आहे. खारघर येथील सेक्टर २१ येथील भूखंड क्रमांक १५१ येथे पनवेल महापालिका महापौर निवास बांधत आहे. या महापौर निवासाचे काम अंतिम टप्प्यात आहे. २८ ते ३१ ऑक्टोबर या दरम्यान ही चोरी झाल्याची नोंद गरजितसिंग रहलोवालिया यांनी दिली आहे. या चोरीत १२ तांब्याच्या पट्या आणि १८ तारा चोरी झाल्याचे म्हटले आहे.

# अंबा नदीच्या पात्रात कचऱ्याचे साम्राज्य

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

**सुधागड तालुक्यातील वऱ्हाड-जांभूळपाडा ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या जांभुळपाडा परिसरातील अंबा नदीच्या पात्रात सध्या कचऱ्याचे साम्राज्य पसरले असून, त्यामुळे नदीचे पाणी दूषित होण्याची शक्यता आहे. ग्रामपंचायतीकडून 'कचरा व्यवस्थापन' या नावाखाली केवळ बोंबाबो सुरू असून, प्रत्यक्षात कोणतीही ठोस व्यवस्था अस्तित्वात नाही. परिणामी, पर्यावरणीय समतोल ढासळण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

अंबा नदी ही परिसरातील अनेक गावांसाठी पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचा मुख्य स्रोत आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून नदीच्या काठावर आणि पात्रात घरगुती, प्लास्टिक आणि घनकचरा टाकला जात आहे.

ग्रामपंचायतीकडून नियमित साफसफाई, कचरा संकलन किंवा विल्हेवाट लावण्याची कोणतीही यंत्रणा कार्यरत नसल्यामुळे ही स्थिती निर्माण झाली असून, नदीचे पाणी गंभीर स्वरूपात दूषित होण्याची शक्यता आहे. पर्यावरणप्रेमी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी याबाबत चिंता व्यक्त करत अंबा नदीच्या पात्रात टाकण्यात आलेला कचरा पाण्याच्या गुणवत्तेला धोका पोहोचवत असून, पाणीप्रदूषण वाढण्याची शक्यता आहे, असे स्पष्ट केले. कचऱ्यामुळे दुर्गंधी आणि आजारांचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

ग्रामपंचायतीकडून 'कचरा व्यवस्थापन' या नावाखाली केवळ कागदी योजना राबवली जात असून, प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याची शक्यता आहे. पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना न केल्यास गंभीर परिणाम भोगावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या परिस्थितीमुळे

- ग्रामपंचायतीच्या बेजबाबदारपणामुळे आरोग्य धोक्यात
- पर्यावरणीय समतोल ढासळण्याची शक्यता

परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली असून, त्यांनी ग्रामपंचायतीने तातडीने कचरा व्यवस्थापनाची ठोस यंत्रणा कार्यान्वित करण्याची मागणी केली आहे.

वऱ्हाड-जांभूळपाडा ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या इतर गावांमध्येही कचरा व्यवस्थापनाची स्थिती अत्यंत दयनीय आहे. कोणत्याही प्रकारचे वर्गीकरण, संकलन किंवा पुनर्वापराची प्रक्रिया राबवली जात नसल्यामुळे संपूर्ण परिसरात अस्वच्छता आणि पर्यावरणीय संकट निर्माण होण्याची शक्यता आहे.

नदीचे प्रदूषण हे केवळ स्थानिक समस्या नसून, दीर्घकालीन परिणाम करणारे संकट ठरू शकते. अंबा नदीचे पाणी शेती, जनावरांचे पाणी आणि काही ठिकाणी पिण्यासाठीही वापरले जाते. त्यामुळे या प्रदूषणाचा थेट परिणाम आरोग्यावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

#### साफसफाईची मागणी

प्रशासनाने अंबा नदीच्या काठावर साठलेल्या कचऱ्याची तातडीने साफसफाई करावी, प्रत्येक गावात कचरा संकलनासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करावी, प्लास्टिक आणि घनकचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी पर्यावरणपूरक उपाययोजना राबवाव्यात आणि या विषयावर ठोस निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी, अशा मागण्या नागरिकांकडून करण्यात आल्या आहेत.



# पनवेल महापालिकेची झाडांवर कुऱ्हाड

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिका हरित पनवेलचे उद्दिष्ट गाठण्यासाठी यंदाच्या वर्षात सव्वा लाख वृक्ष लागवड करणार आहे. परंतु दूसरीकडे सिडकोच्या संयुक्त विद्यमाने तळोजा येथील घोटचाळ गावाशेजारी सुरू असलेल्या नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या विस्तारामध्ये अडचण ठरणारी ७ ते १० वर्षे वयाची २२४ झाडांची तोड करण्याचा प्रस्ताव पुढे आल्यामुळे पर्यावरण प्रेमींमध्ये चिंतेचे वातावरण आहे.



या वृक्षतोडी बद्दल नागरिकांना माहिती मिळावी यासाठी महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या हरकती मागविण्याची जाहीर नोटीस बुधवारी प्रसिद्ध केली आहे. या झाडांमध्ये सुबाभूळ, जांभूळ, करंज, काजू, साग, निम, कदंब, सोनमोहर, आंबा, गुलमोहर, बहावा यांसारख्या विविध प्रजातींचा समावेश आहे. ही झाडे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या विस्तारासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त भूखंडाभोवती परिधीय मार्ग आणि जलनिस्सारणासाठी करावयाच्या बांधकामासाठी अडथळा ठरत आहेत. नागरिकांनी या झाडांच्या तोडणीसंबंधी हरकती किंवा सूचना १२ नोव्हेंबरपर्यंत लेखी स्वरूपात सादर कराव्यात, असे आवाहन महापालिकेच्या उद्यान विभाग आणि वृक्ष प्राधिकरणाने केले आहे. मुदतीत हरकती न आल्यास वृक्ष प्राधिकरण झाडतोडीस सशर्त परवानगी देण्याची कार्यवाही करणार असल्याचे स्पष्ट नमूद केले आहे.

# हरिहरेश्वरला कोस प्रदक्षिणा



**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**


श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथील कार्तिकी उत्सवास नवान्न पौर्णिमेस प्रारंभ झाला आहे. त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत म्हणजे साधारण महिनाभर हा उत्सव सुरू असतो. यावेळी कालभैरव, योगेश्वरी देवीची पालखी काढण्यात येते. कार्तिकी एकादशीच्या दिवसाला हरिहरेश्वराचे राज्य कसे चालू आहे, हे पाहण्याकरिता रक्षणकर्ते कालभैरव, योगेश्वरी माता पालखीत विराजमान होऊन गावात फिरतात. पर्वत रूपी पार्वती, महेश, विष्णू आणि ब्रम्ह पर्वतांना प्रदक्षिणा घातली जाते. काळेश्री मातेला भेटून ही पालखी पुन्हा मंदिर परिसरात परत येते, या प्रदक्षिणेस कोस प्रदक्षिणा म्हणतात.

दक्षिण काशी हरिहरेश्वर येथे अनेक भाविक व पर्यटक येत असतात. या कोस प्रदक्षिणेस मनात इच्छा असूनही काही कारणास्तव भाविक व पर्यटकाना सहभागी होता येत नाही तसेच विद्यार्थ्यांनाही कोस प्रदक्षिणा बाबतीत उत्सुकता असते. गुरुवार (दि .६) रोजी श्री क्षेत्र हरिहरेश्वर दक्षिण काशी येथे पारंपारिक मार्गावर कोस प्रदक्षिणा आयोजित करण्यात आली होती. यावेळेस भाविक, पर्यटक आणि विद्यार्थ्यांनी उत्सुर्त प्रतिसाद दिला.

ट्रॅव्हल वेडे आयोजित हा आजचा उपक्रम आहे. येत्या काळात आपण हि प्रदक्षिणा जस ट्रेक आयोजित केले जातात त्याप्रमाणे आपण ते करणार आहोत.त्याला काही मूल्य आकारण्यात येईल त्यामध्ये त्या पर्यटकाला, भाविकाला डॉक्युमेंटरी दाखवणार आहेत.

# महामार्गाचे रडगाणे सुरूच

## वाहन चालकांकडून संताप व्यक्त



**| कोलाड | प्रतिनिधी |**

मागील सतरा ते अठरा वर्षांपासून रखडलेल्या राष्ट्रीय मुंबई-गोवा महामार्गावर ६६ वरील सतत पडत असलेल्या परतीच्या पावसामुळे भयानक खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांचा त्रास प्रवाशांसह वाहन चालकांना सहन करावा लागत आहे. तर एवढ्येच नव्हे तर त्यात आता वाहने अडकून बंद पडत आहेत. खांब कोलाड पासून तळवली, तिसे, भुवन, इंदापूर दरम्यान मोठ मोठे खड्डे पडल्याने त्यात वाहने अडकून बंद पडण्याच्या घटना घडत असल्याने याबाबत सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील खांब येथील दिपक धाबा ते गोमंतक हॉटेल, महिसदरा नदीवरील पुल कुंडलिका नदीवरील पुल, कोलाड बाजारपेठ, कोलाड पोस्ट ऑफिस समोर, तिसे, तळवली, भुवन, इंदापूर या ठिकाणी रस्त्याला जीवघेणे खड्डे पडलेले असुन या खड्डुयातुनप्रवास करतांना प्रवाशांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. या खड्ड्यातून प्रवास करतांना वाहने खड्ड्यात अडकून बंद पडत आहेत. अनेक अपघात होतांना दिसत आहे.

मुंबई गोवा महामार्गाची पाहणी मंत्री, पालकमंत्री आणि नेते मंडळी यांनी केली. अनेक डेडलाईन देखील देण्यात आल्या पण त्या सर्व डेडलाईन फोल ठरल्या असल्याचे दिसून येत आहेत. परंतु अनेक वर्षे सुरू असलेल्या महामार्गाचे काम अद्याप ही रखडला आहे. मात्र महामार्गाचे काम आजतागायत पूर्ण होत नसल्याने आता अधिक कोणी मंत्री या महामार्गाची पाहणी करण्यास शिल्लक राहिले आहेत का असा संतप्त सवाल सर्व सामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# पनवेल महानगरपालिकातर्फे बांबू लागवड

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडून २ हजार बांबू लागवड करण्यात येणार आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र बांबू धोरण २०२५, राष्ट्रीय बांबू मिशन तसेच महानगरपालिकेतर्फे विविध वृक्षांचे वृक्षारोपण अंतर्गत कळंबोली एन्ट्री पॉईंट ते केएलई कॉलेजपर्यंत मुख्य रस्त्याच्या बाजूला बांबूची लागवड करणे नियोजित आहे. यावेळी सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, उद्यान विभाग प्रमुख अनिल कोकरे, पर्यवेक्षक विशाल हुडेकर, सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक महेश घोडसरे, सुमित बोडके पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या अंतर्गत बुध्दा बेली या प्रजातीच्या २ हजार बांबूच्या रोपांची लागवड करण्यात येणार आहे.

# पालीत तिकीट आरक्षण खिडकी बंद

**| पाली | प्रतिनिधी |**

पाली एसटी स्थानकातील आरक्षण खिडकी बंद असल्याने प्रवाशांना जास्त पैसे मोजावे लागत आहेत आणि त्यांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. ही समस्या प्रामुख्याने एसटी कर्मचारी आणि सरकार यांच्यातील समन्वयाचा अभाव असल्यामुळे यांचा नाहक प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. पाली एसटी स्थानक गेली कित्येक वर्ष अनेक समस्यानेग्रस्त असताना त्यामध्ये अजून एक समस्येची भर पडलेली आहे. एसटी स्थानकातील तिकीट आरक्षण मशीन गेली कित्येक दिवस बंद पडल्याने ती दुरुस्तीसाठी पेण येथील कार्यालयात पाठवण्यात आली आहे. पाली शहरासह सुधागड तालुक्यातून विशेषता ठाणे, पुणे, मुंबई या ठिकाणी जाणारे प्रवासी तिकीट आरक्षणासाठी जात असतात आरक्षण खिडकी बंद असल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झालेली आहे.




आरक्षण खिडकी बंद असल्याने प्रवाशांना ऑनलाइन तिकीट बुक करावे लागते, जे काहीवेळा शक्य नसते. जास्त खर्च: आरक्षण खिडकी बंद असल्यामुळे काही दलाल प्रवासींकडून जास्त पैसे उकळतात, ज्यामुळे प्रवाशांच्या खिशाला कात्री बसत आहे. एसटी प्रशासनाने या समस्येवर लक्ष केंद्रित करून प्रवाशांना सोयीस्कर आणि सुरक्षित प्रवासाची हमी द्यावी असे प्रवाशांची विनंती केली आहे.

> पाली एसटी स्थानकातील तिकीट आरक्षण खिडकी गेली कित्येक दिवस बंद असल्याने प्रवाशांना जादा पैसे देऊन तिकीट आरक्षण करावे लागत आहेत. प्रवासी संतापले असून लवकरच खिडकी सुरू करण्यात यावी, अन्यथा शिवसेना उबाठा आंदोलन छेडणार आहे. -विद्देश आचार्य, पाली शहराध्यक्ष शिवसेना उबाठा

> **तिकीट आरक्षणाची मशीन बिघडल्याने ती पेण येथील कार्यालयात पाठवण्यात आली आहे. लवकरच मशीन मिळावी यासाठी आम्ही पाठपुरावा करत आहोत.**
> **– रोहिदास कोकणे,**
> **कंट्रोलर पाली एसटी स्थानक**

ढेबे-बर्गेवाडी रस्त्याला वन खात्याची मंजुरी | ग्रामस्थांनी केला आनंदोत्सव साजरा

# ५० वर्षाचा खडतर प्रवास संपणार

**| खोपोली | प्रतिनिधी |**

खालापुर तालुक्यातील ग्रामीण शिरवली ग्रामपंचायत हद्दीतील ढेबे-बर्गेवाडी रस्ता वन खात्याच्या अडथळ्यामुळे दुरुस्ती पासून वंचित राहिला होता. गेल्या ५० वर्षाहून अधिक काळापासूनचा येथील नागरिकांचा खडतर प्रवास करावा लागत होता. हा प्रवास सुखकर व्हावा यासाठी ग्रामपंचायतीचे सरपंच महेश पाटील यांनी ढेबेवाडी बर्गेवाडी या गावांसाठी जाणाऱ्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी वन खात्याची परवानगी मिळवून दिली दिल्यामुळे तसेच ३/२ चा दावा मंजूर केल्याने ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले आहेत. पुढील काळात हा रस्ता खड्डेमुक्त होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. वन खात्याची मिळालेली मंजुरी बद्दल वनविभागाचे अधिकारी राजेंद्र पवार यांचे ग्रामस्थांनी आभार मानले. त्यामुळे ग्रामस्थांचा ५० वर्षाचा खडतर वाटचालीचा वनवास आता संपणार आहे.

खालापूर तालुक्यातील ग्रामीण भागामधील काही रस्ते हे वनखात्यामुळे रखडल्याने अनेकांना पायवाट व खड्डेमय रस्त्याने प्रवास करावा लागत असल्याने अनेक जण वनविभागाच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त करतात. असाच शिरवली ग्रामपंचायत हद्दीतील ढेबे -बर्गेवाडी रस्ता वन खात्याच्या अडथळ्यामुळे नागरिकांना १ किलोमीटरहून अधिक अंतर रानावनातून पायवाटेने, पावसाळ्यात चिखल व गुडघ्यावर



पाण्यातून प्रवास करावा लागत असल्याने येथील ग्रामस्थ मोठ्या समस्येत सापडल्याने पाटील यांनी या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाल्याने खड्डेमय व खरंतर प्रवासापासून येथील नागरिकांची आता सुटका होणार आहे. वनविभागाचे तालुका अधिकारी राजेंद्र पवार यांची पाटील यांनी ग्रामस्थासह भेट घेत वनविभागाचे आभार मानले. यावेळी रवींद्र देवकर, महेश पाटील, गीता बांदल, संदीप मोरे, विजय ढेबे, रवींद्र पाटील, महेश कडू संदेश गोरडे, नाना पाटील, नितेश जाधव, प्रमिला पाटील, रघुनाथ ढेबे, अंकुश कदम, पांडुरंग बर्गे, संपत ढेबे, विष्णू पाटील, लक्ष्मण ढेबे, सचिन ढेबे, भांबू बर्गे, सचिन ढेबे आदी प्रमुख उपस्थित होते.

> **शिरवली ग्रामपंचायत हद्दीतील ढेबेवाडी बर्गेवाडी रस्ता वनखात्याचा परवानगीमुळे अनेक वर्ष रखडला होता. अनेक वेळा निधी मंजूर होऊनही रस्ता पूर्ण करता येत नव्हता, मात्र महेश पाटील यांनी सदर वनखात्याची परवानगी घेण्याचा चंगच त्यांनी बांधला होता. अनेक त्रुटी पूर्ण करत ५० वर्षाहून अधिक काळ होऊन सुद्धा अनेकांना जे जमलं नाही ते त्यांनी करून दाखवल्या बद्दल त्यांच्या मनापासून आभार.**
> **– रघुनाथ ढेबे, ग्रामस्थ**

> **ढेबेवाडी बर्गेवाडी हे कोयना प्रकल्पग्रस्त गाव, परंतु या भागात स्थलांतर झाल्यानंतरही त्यांना मूलभूत सोयी सुविधांपासून वंचित राहावं लागत होते. गावापर्यंत जाणारा रस्ता हा वन विभागातून जात असल्यामुळे अनेक वेळा आजारी असणाऱ्या रुग्णांना डोली करून मुख्य रस्त्यापर्यंत घेऊन यावं लागत असे. आता रस्त्याला वनखात्याची परवानगी मिळणे हा त्यांच्या आयुष्यातली सर्वात मोठा आनंदाचा क्षण आहे. – महेश पाटील,**
> **सरपंच शिरवली ग्रामपंचायत**

#### ग्रामस्थांमध्ये नवचैतन्य

वनविभागाची परवानगी मिळाल्याने ५० वर्षाचा येथील नागरिकांचा वनवास आता संपणार असून पुढे काळात या गावाला नवा रस्ता जोडण्यात येणार असल्याने ग्रामस्थांमध्ये नवचैतन्य पसरले आहे.

# दादांचा राजीनामाच हवा

आपल्या तोंडून नको ते उद्गार बाहेर पडल्याबद्दल अजित पवार यांनी यापूर्वी एक दिवसाचे प्रतिकात्मक प्रायश्चित्त घेतले होते. कराडला यशवंतराव चव्हाणांच्या समाधीपाशी दिवसभर घालवून हे त्यांनी चिंतन केले होते. पण दादांनी आता मात्र खरेखुरे प्रायश्चित्त घ्यायला हवे. त्यांच्या चिरंजीवांचे प्रतापच तसे दिसतात. पुण्यामध्ये १८०० कोटी रुपये किमतीची जमीन अवघ्या ३०० कोटी रुपयांना बेकायदेशीररीत्या खरेदी केली असा चिरंजीव पार्थ पवार यांच्यावर आरोप आहे. पार्थ सज्ञान व स्वतंत्र आहे व त्याच्या व्यवहारांशी आपला काही संबंध नाही असे म्हणून दादांना हात झटकता येणार नाहीत. त्यांनी राजीनामाच द्यायला हवा. त्यांनी तो दिला नाही तर देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्याकडून तो घ्यायला हवा. अर्थात, इतकी नैतिकता हे दोघेही दाखवतील का याबाबत शंकाच आहे. कारण जनतेने आपल्याला प्रचंड बहुमत दिले आहे या एकाच आधारावर आपल्याला शंभर अपराध माफ आहेत असे यांना वाटते व रोजच्या रोज त्यांचा माज चालू राहतो. हेच अजितदादा रोज उठताबसता पैसे झाडाला लागत नाहीत असा उपदेश करीत असतात. शेतकऱ्यांना एकवेळ कर्जमाफी केली, पण पुन्हा करणार नाही म्हणून दम भरत असतात. गोष्टी फुकट मिळणार नाहीत असे सारखे बजावत असतात. थोडक्यात मोफत किंवा फुकटचे जे काही आहे ते केवळ मंत्र्यांच्या कुटुंबियांना मिळू शकते आणि या सगळ्याची किंमत जनतेने आपल्या पैशांतून मोजत राहायची असा या सर्वांचा अर्थ आहे. हे प्रकरण यंदाच्या म्हणजे २०२५ च्या मे महिन्यातले आहे. पुण्यानजीक मुंढवा-कोरेगाव पार्क इथल्या चाळीस एकर जमिनीचा हा सौदा आहे. ही जमीन मूळची महारवतनाची आहे. तिच्या सातबाऱ्यावर इतर हक्कात महार वतनदार कुळांची नावे आहेत. अशा जमिनीची विक्री वा हस्तांतर करताना अत्यंत कडक नियम आहेत. त्यासाठी बऱ्याच परवानग्या घ्याव्या लागतात. पण पार्थ पवार यांच्या अमेडिया या कंपनीला मात्र अगदी हसत हसत ही जमीन मिळाली.

## पार्थला वाचवण्याची धडपड

अमेडिया होल्डिंग्ज लिमिटेड लायबिलिटी पार्टनरशिप ही भागीदारी फर्म असून पार्थ आणि त्यांचे मामेभाऊ दिग्विजय पाटील हे दोन संचालक भागीदार आहेत. दिग्विजय यांनीच हा खरेदी व्यवहार केला असून त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पण कंपनीचा पत्ता पार्थ यांच्या बंगल्याचा असून एकूण व्यवहार पाहता पार्थ यांचा थेटपणे आणि अजितदादांचा अप्रत्यक्षपणे त्याच्याशी संबंध आहे हे उघड आहे. त्यामुळे या संदर्भात पार्थ यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल होणे व चौकशी होईपर्यंत अजितदादांनी पदापासून दूर राहणे अत्यंत आवश्यक आहे. ब्रिटिशांच्या काळात सेवा केल्याचे पारितोषिक म्हणून महारवतने देण्यात आली. नंतर बहुतेक ठिकाणी या जमिनी सरकारी मालकीच्या झाल्या. तशीच हीही झाली. १९७३ मध्ये बोटॅनिकल गार्डन सोसायटीला ही जमीन एक रुपयाच्या नाममात्र भाड्याने सरकारने दिली व तो करार २०३८ पर्यंतचा आहे. त्यामुळे ही जमीन अन्य कोणी विकण्याचा प्रश्नच नव्हता. पण इतर हक्कातील कुळांच्या नावच्या सातबाऱ्यांच्या आधारे कोण्या शीतल तेजवानी यांना मुखत्यारपत्र देण्यात आले व त्यांच्याकडून पार्थ यांच्या कंपनीने ही जमीन खरेदी केली असे दाखवण्यात आले. शिवाय ही जमीन घेताना आयटी उद्योगासाठी घेण्यात येत असल्याचे दाखवून केंद्र व राज्य सरकारच्या सवलती उकळण्याचा प्रयत्न झाला. ३०० कोटींच्या व्यवहारावर किमान २१ कोटींचे मुद्रांकशुल्क भरले जाणे अपेक्षित होते. पण आयटी पार्कच्या सवलतीच्या नावाखाली ते माफ करण्यात आले व केवळ ५०० रुपयांच्या स्टँपपेपरवर हा सर्व कारभार उरकण्यात आला. आता सरकारने मुद्रांकशुल्क बुडाले म्हणून गुन्हा दाखल केला आहे व उपनिबंधक तसेच तहसिलदारांना निलंबित केले आहे. पण हा केवळ अनवधानाने घडलेला प्रकार आहे असे भासवण्याचा हा सर्व प्रयत्न आहे काय असा संशय यामुळे निर्माण होतो. जमीन विक्री करणाऱ्यांनी ती महारवतनी आहे असे दाखवले, सरकारी मालकीची आपल्याला कल्पना नव्हती असा पवित्रा कदाचित यातून पार्थ व त्यांचे भागीदार घेण्याची शक्यता आहे. अधिकाऱ्यांचा बळी देऊन राजकारण्यांना वाचवण्याची ही जुनीच पध्दत आहे.

## दादा खरे प्रायश्चित्त घ्या

यामध्ये मुद्रांकशुल्क आकारताना गफलत झाल्याबद्दल अधिकाऱ्यांवर ठपका ठेवून त्यांना शिक्षा केली असे दाखवायचे आणि नंतर हा सर्व व्यवहार आम्ही रद्द करीत आहोत असे पार्थ यांनी जाहीर करून अंग काढून घ्यायचे अशा दिशेने हा प्रकार नेण्याचा प्रयत्न केला जाईल अशी दाट शक्यता आहे. पुण्यातील यापूर्वी मॉडेल कॉलनीतील जैन ट्रस्टची जमीन बिल्डरला विकण्याचा बेकायदा व्यवहार नंतर असाच रद्द् करण्यात आला होता व त्यातून भाजपचे मुरलीधर मोहोळ यांची सुटका करण्यात आली होती. मोहोळ यांची अलिकडपर्यंत ज्यांच्यासोबत भागीदारी होती त्या गोखले बिल्डरना ही जमीन स्वस्तात देण्यात आली होती. पण तिथे मोहोळ हे सध्या भागीदार नसल्याने बचावले होते. पार्थ यांना तो बचाव उपलब्ध नाही. ते कंपनीचे भागीदार आहेत. दुसरे म्हणजे इतक्या मोठ्या प्रकरणात जमिनीची मालकी सरकारची आहे हे आपल्याला ठाऊक नव्हते असा पवित्रा त्यांनी घेतला तर तो निव्वळ लबाड असेल. विशेष म्हणजे चार-पाच महिन्यांपूर्वी असा काही व्यवहार चालू असल्याचे आपल्या कानावर आले होते असे दादांनी स्वतःच सांगितले आहे. तेव्हा बेकायदेशीर काही चालणार नाही असे आपण बजावले होते असेही ते म्हणतात. मुळात एक तर इतक्या मोठ्या रकमेचा व्यवहार त्यांच्या माहितीशिवाय झाला असेल हे संभवतच नाही. दादा हे पार्थचे वडीलच नव्हेत तर पुण्याचे पालकमंत्रीही आहेत हे लक्षात ठेवायला हवे. दुसरे म्हणजे पार्थ हा सज्ञान असून त्याचे व्यवहार तो स्वतंत्रपणे करतो असा बचावही दादांनी दिला आहे. पण याच पार्थला २०१९ च्या निवडणुकीत दादांनी खासदारकीची उमेदवारी दिली होती. शिवाय, तोच दादांचा उत्तराधिकारी आहे हे सर्वांना ठाऊक आहे. त्यामुळे दादांच्या पदाच्या जोरावरच हा बेकायदेशीर तसेच चोरीचा व्यवहार पार्थ यांनी पुढे नेला आहे. त्यामुळे पार्थ, दादा तसेच इतर सर्वांना त्याची योग्य ती शिक्षा व्हायलाच हवी. मुळात १८०० कोटींची जमीन ३०० कोटींना मिळालेली असूनही आणखी केवळ २१ कोटींचे मुद्रांकशुल्कदेखील माफ करून घेतले गेले. समजा केंद्राच्या आयटी पार्क नियमानुसार ते माफ असले तरी स्थानिक स्वराज्य कर तसेच मेट्रो कर किमान सहा कोटी रुपये भरणे अपेक्षित होते. पण फुकट काही मिळणार नाही म्हणणाऱ्या दादांच्या चिरंजीवांना तेवढे भरणेही जिवावर आले. तेव्हा दादांनी आता या सगळ्याचे प्रायश्चित्त घेण्याची वेळ आलेली आहे.

विचार

# नक्षलवादी आले मुख्य प्रवाहात...

***वर्षानुवर्षे जंगलात फिरणारे अनेक नक्षलवादी आता मुख्य प्रवाहात परत येऊ इच्छितात आणि शांततापूर्ण जीवन जगू इच्छितात. आत्मसमर्पण करणाऱ्या माओवाद्याचे हे विधान महत्त्वपूर्ण आहे, जे नवीन पिढीच्या हिताचे सूचक आहे. देशात ३१ मार्चअखेर नक्षलवाद संपवण्याच्या सरकारच्या धोरणाला पूरक पावले पडत आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये तर प्रचंड प्रमाणात नक्षलवादी मुख्य प्रवाहात आले. त्या निमित्ताने घेतलेला वेध.***



**अजय तिवारी**

'आता क्रांतीपेक्षाही मोबाईल फोन, बाईक आणि गर्लफ्रेंड जास्त महत्त्वाच्या आहेत,' नक्षलवादी चळवळीला सोडचिठ्ठी देऊन मुख्य प्रवाहात येऊ इच्छिणाऱ्या नक्षलवाद्यांचे हे प्रातिनिधिक मत आहे. त्यावरून नक्षलवाद्यांची बदललेली मनसिकता लक्षात येते. दुसरीकडे, छत्तीसगडमधील बस्तर येथे सुरक्षा दलांनी 'ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट' अंतर्गत २७ माओवाद्यांना घेराव घालून ठार केले. त्यापैकी माओवादी संघटना सीपीआय (माओवादी) चा सरचिटणीस आणि नक्षलवादी चळवळीचा कणा असलेला नंबला केशवराव उर्फ बसवराजू हा एक होता. बसवराजू हा एक अभियंता होता. माओवादी विचारसरणीने प्रेरित होऊन तो नक्षलवादी बनला. सरकारने त्याच्यावर एक कोटी रुपयांचे बक्षीस ठेवले होते आणि त्यांच्यावर १५० सैनिकांची हत्या केल्याचा आरोप होता. त्याने सीपीआय (माओवादी) ची सशस्त्र शाखा 'पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी' (पीएलजीए) ला बळकटी देण्यासाठी काम केले. २००० मध्ये अनेक लहान नक्षलवादी गटांचे विलीनीकरण झाल्यानंतर 'पीएलजीए'ची स्थापना झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बसवराजूंच्या खात्म्याचे वर्णन 'नक्षलवाद संपवण्याच्या लढाईतील ऐतिहासिक कामगिरी' असे केले. या कारवाईमध्ये ५४ माओवाद्यांना अटक करण्यात आली. याआधी, सुरक्षा दलांनी दुर्गम कुरेगुट्टा टेकड्यांमध्ये ३१ माओवाद्यांना लपण्याच्या ठिकाणांना वेढा घालून ठार मारले होते. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रेही जप्त करण्यात आली होती. पोलिसांनी असाही दावा केला आहे, की या वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांत सातशेहून अधिक माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले. सुरक्षा दलांच्या मते आता माओवाद छत्तीसगड, महाराष्ट्र, तेलंगणा आणि झारखंडपुरता मर्यादित राहिला आहे.

सरकारच्या मते देशभरातील माओवादग्रस्त जिल्ह्यांची संख्या एप्रिल २०१८ मध्ये १२६ वरून ९० वर तर जुलै २०२१ मध्ये ७० वर आली. एप्रिल २०२४ च्या आकडेवारीनुसार, माओवादग्रस्त जिल्ह्यांची संख्या फक्त ३८ वर आली आहे. माओवाद खरोखर शेवटच्या टप्प्यात आहे का? याचे सकारात्मक उत्तर देणे खूप घाईचे होईल. काहीजण सुरक्षा दलांच्या कारवाईच्या प्रामाणिकपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. त्यांना नुकसान सहन करावे लागले आहे. माओवादाला आळा घालण्याचे राजकीय श्रेय घेण्याची स्पर्धाही सुरू झाली आहे; पण आता माओवादी थकले आहेत का? हे निश्चितपणे सांगता येत नाही. कुरैगुट्टा टेकडीवर वेढा घातल्यानंतर, माओवाद्यांनी छत्तीसगड सरकारशी शांतता चर्चेचा प्रस्ताव ठेवला. तो सरकारने नाकारला. सरकारच्या मते नक्षलवाद्यांनी एक तर शस्त्रे सोडून द्यावीत किंवा मरण्यास तयार रहावे. नक्षलवाद्यांच्या शरणागतीकडे त्यांच्या विघटित होणाऱ्या संघटनेची पुनर्स्थापना करण्यासाठी आवश्यक विराम म्हणूनही पाहिले गेले. याचा अर्थ ते पूर्णपणे तुटले आहेत, असे नाही. त्यांना अजूनही कुठून तरी ऊर्जा मिळते. तज्ज्ञांचे म्हणणे आहे, की सरकारने बंदी घातलेल्या माओवादी संघटनेचीही एक सुव्यवस्थित रचना, एक निश्चित व्यवस्था आहे; ज्यामध्ये एका बसवराजूच्या जाण्याने दुसऱ्या बसवराजूसाठी मार्ग मोकळा होतो. दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे तर एका बसवराजूचा मृत्यू झाला तर दुसरा त्याची जागा घेईल, म्हणून माओवादाचा नायनाट करायचा असेल, तर शेतकरी, आदिवासी आणि शोषित गटांच्या समस्या सोडवणेदेखील आवश्यक असेल.

मध्य प्रदेशचा विचार केला तर, माओवाद हा छत्तीसगड आणि महाराष्ट्राच्या सीमेवर असलेल्या काही जिल्ह्यांपुरता मर्यादित आहे, परंतु तिथेही सरकारचे धोरण शून्य सहनशीलतेचे आहे. विकासाचा प्रकाश जसजसा वाढत आहे तसतसा नक्षलवाद्यांचा प्रभाव कमी होत आहे. गेल्या आठवड्यात, छत्तीसगडमध्ये २०८ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. यापूर्वी सुमारे दोनशे नक्षलवादी आत्मसमर्पण करुन मुख्य प्रवाहात सामील झाले. महाराष्ट्रात ६१ नक्षलवाद्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर आत्मसमर्पण केले. इतक्या मोठ्या प्रमाणातील आत्मसमर्पणानंतर, छत्तीसगडमधील, विशेषतः बस्तर प्रदेशातील नक्षलवाद्यांबद्दलचे आक्रमक इनपुट आता थांबले आहे. भारताचे गृहमंत्री अमित शहा यांनी १६ ऑक्टोबर रोजी 'एक्स'वर पोस्टमध्ये म्हटले होते, की एके काळी दहशतीचे केंद्र असलेल्या छत्तीसगडमधील अबुझमाड आणि उत्तर बस्तर आज पूर्णपणे नक्षलवादी हिंसाचारमुक्त घोषित करण्यात आले आहे. आता, दक्षिण बस्तरमध्ये काहीच नक्षलवादी शिल्लक आहेत, ज्यांना आमचे सुरक्षा दल लवकरच संपवेल. उत्तर बस्तर प्रदेशात अबुझमाड क्षेत्र येते. जानेवारी २०२४ मध्ये छत्तीसगडमध्ये भाजप सरकार स्थापन झाल्यापासून २,१०० नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. १,७८५ जणांना अटक करण्यात आली आहे. अबुझमदचा नक्षलमुक्त दर्जा हे केवळ सुरक्षा यश नाही, तर आदिवासी भूगोलासाठी एक नवीन पहाट आहे. वाढत्या प्रशासकीय हस्तक्षेपामुळे आणि विकास प्रकल्प पोहोचण्याच्या आशेमुळे येथे आदिवासींचे शोषण पुन्हा सुरू होण्याची भीती असल्याने सरकारने अत्यंत संवेदनशीलतेने काम करण्याची गरज आहे.

छत्तीसगडच्या बस्तर प्रदेशातील सुमारे चार हजार चौरस किलोमीटरवर पसरलेले अबुझमाड शेकडो वर्षांपासून एक कोडे राहिले आहे, जे पृथ्वीवर नोंदवले गेले आहे; परंतु कागदपत्रांमध्ये हरवले आहे. बहुतेक भागांमध्ये, जमिनीचे निश्चित मोजमाप नाही. कुरणांचा कोणताही मागमूस नाही आणि रस्त्यांचे निश्चित सरेखन नाही. जुन्या कागदपत्रांवरून दिसून येते, की अकबराच्या काळात येथे महसूल नोंदी गोळा करण्याचा प्रयत्न केला गेला होता; परंतु जंगलांची खोली प्रत्येक मोजमापाच्या पायरीला गिळंकृत करत होती आणि अबुझमाड जसे होते तसे राहिले. १९७० च्या दशकात नक्षलवाद्यांनी या भागात प्रवेश केला होता. नक्षलवादी संघटनेची एक तुकडी, पीपल्स वॉर ग्रुप, या भागात आली आणि लोकांना एकत्र करण्यास सुरुवात केली. नक्षलवादी कागदपत्रांमध्ये म्हटले आहे, की एक किलो मिठाच्या बदल्यात आदिवासींकडून एक किलो काजू किंवा मनुका उकळण्याचे प्रकार घडत होते. या प्रदेशात सरकारी अधिकाऱ्याच्या नियुक्तीची तुलना काळ्या पाण्याच्या शिक्षेशी केली जात होती. १९८० च्या सुरुवातीला, आदिवासींच्या सामाजिक-सांस्कृतिक गोपनीयतेचा हवाला देऊन बाहेरील लोकांना अबुझमाडमध्ये प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली होती. पुढील काळात या भागात नक्षलवादाचा विस्तार होत राहिला. अबुझमाडचे भौगोलिक स्थान नक्षलवाद्यांच्या लष्करी प्रशिक्षणासाठी आदर्शवत होते. म्हणूनच हा परिसर दंडकारण्यमधील नक्षलवाद्यांचा गड बनला. आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्रात नक्षलवाद्यांवर दबाव वाढला तेव्हा अबुझमाड हे नक्षलवादी केंद्रीय समितीपासून 'पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी'पर्यंत सर्वांसाठी आश्रयस्थान बनले.

छत्तीसगड हे वेगळे राज्य झाल्यानंतर नऊ वर्षांनी या भागातील प्रवेशावरील बंदी उठवण्यात आली; परंतु तोपर्यंत नक्षलवाद जंगलाच्या मुळांसारखा पसरला होता. यथावकाश जनता सरकारने जमिनीचे पट्टे वाटले आणि लोक न्यायालयेही भरवली. बदललेल्या परिस्थितीत सरकारने प्रदेशाचा योग्य विकास आणि आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांचे योग्य पुनर्वसन याकडे विशेष लक्ष दिले. ज्या सामाजिक असमानतेवर आधारित माओवाद्यांनी गावकऱ्यांमध्ये प्रभाव मिळवला, त्या दूर करण्यासाठी सरकारने प्रयत्न केले पाहिजेत. 'नियाद नेलनार' (तुमचे चांगले गाव) सारख्या विकास योजना केवळ सुरक्षा छावण्यांच्या पाच किलोमीटरच्या परिघात मर्यादित नसून माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलेल्या संपूर्ण क्षेत्रात वाढवल्या पाहिजेत.

आरोग्यसेवेसाठी शैक्षणिक आश्रम आणि रुग्णालये किंवा दवाखाने बांधण्याच्या योजना लवकर अंमलात आणल्या पाहिजेत, कारण वनउत्पादने आदिवासींसाठी उपजीविकेचे एक महत्त्वाचे साधन आहेत. त्यांच्या योग्य किमती आणि प्रक्रियेसाठी योजना राबवण्यावरही विचार केला पाहिजे. रस्तेदेखील बांधले पाहिजेत आणि मोबाईल टॉवर बसवले पाहिजेत. अशा विकास प्रकल्पांची अंमलबजावणी करताना, पर्यावरणाचे कमीत कमी नुकसान होईल, याची खात्री करणेदेखील आवश्यक आहे. सरकारने आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांना पुनर्वसन धोरणाचे फायदे त्वरित मिळावेत याचीदेखील खात्री केली पाहिजे. त्यांना आवश्यक प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. अर्थात त्यानंतरही सुरक्षा दलांनी माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलेल्या भागात पाळत ठेवली पाहिजे.

# गावाला पोलीस पाटील यांची प्रतीक्षा

**अंतरा पारंगे**

पोलीस पाटील हे गाव पातळीवरील एक महत्त्वाचे पद आहे. गावामध्ये शांतता आणि सुव्यवस्था राखण्याचे काम पोलीस पाटील करतात. गावपातळीवर घडलेल्या कोणत्याही गुन्ह्यांची माहिती पोलीस ठाण्याला देणे आणि नैसर्गिक आपत्ती किंवा रोगराईसारख्या घटनांची माहिती वरिष्ठांना देणे यांसारखी महत्वाची कामे पोलीस पाटील करतात. एकंदरीत गावाच्या सुरक्षेची जबाबदारी पोलीस पाटील यांच्यावर असते. मात्र, सध्या रायगड जिल्ह्यात एक हजार ९१ पदे रिक्त आहेत. ही पदे तात्काळ भरण्यात यावी, अशी मागणी पोलीस पाटील संघाकडून करण्यात आली आहे. मात्र, त्याची कार्यवाही अद्याप करण्यात आली नाही. त्यामुळे कार्यरत पोलीस पाटील यांच्यावर अनेक गावांचा भार पडला आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक, बेकायदेशीर व्यवसाय करणारे, अवैध धंदेवाले, याबद्दल पूर्ण माहिती ही पोलीस पाटलांना असते. ही माहिती तात्काळ पोलीस प्रशासनाला दिल्याने अवैध धंद्यावर कारवाई करणे सोपे जाते. मात्र अनेक गावांमध्ये पोलीस पाटील पदे रिक्त असल्याने गाव-खेड्यांतील सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे दिसून येत आहे.

१७ डिसेंबर १९६७ महाराष्ट्र पोलीस अधिनियम हा कायदा संमत करण्यात आला. त्यानुसार स्वतंत्र महसुली गावांना पोलीस पाटील नेमण्यात आले. त्यांचा उपयोग गावपातळीवर महसूल व पोलीस प्रशासनाला नियमित होत गेला. महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम १९६७ अधिनियम ८६ नुसार पोलीस पाटील गाव पातळीवर कार्यकारी दंडाधिकारी यांच्या आदेशान्वये कार्य करत असतात. सार्वजनिक शांततेला बाधा पोहोचणार नाही यासाठी आवश्यक माहिती अधिकाऱ्यांना पुरवणे, गावच्या हद्दीत गुन्हा घडू नये, लोकांचा उपद्रव होऊ नये म्हणून बंदोबस्त करणे व आपल्या हद्दीतील गुन्हेगारांचा शोध घेऊन न्यायालयासमोर हजर करण्यास मदत करणे इत्यादी कामे पोलीस पाटील करतात. त्याचप्रमाणे गावपातळीवर किंवा त्यांच्या कार्यक्षेत्रातील गुन्ह्याची माहिती पोलीस ठाण्यास देणे, विनापरवाना शस्त्र बाळगण्यास मनाई करणे, नैसर्गिक आपत्ती व रोगराई या गोष्टींचा अहवाल वरिष्ठांना देणे एवढेच नाही तर गावात अनैसर्गिक किंवा संशयास्पद मृत्यू झाला असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांना देण्यापर्यंतची महत्वाची कामे पोलीस पाटील करतात. परंतु, जिल्ह्यातील एक हजार ९१ गावांना पोलीस पाटीलच नसल्याने गावाची शांतता आणि सुव्यवस्था वाऱ्यावर असल्यासारखेच आहे.

या कामांबरोबरच गावातील सण, उत्सव, यात्रा, राजकारण, निवडणुका या सर्वच घडामोडीवर पोलीस पाटील लक्ष ठेवून असतात. पोलीस पाटील या नेमणुकीवरील व्यक्ती ही त्याच गावची असल्याने सर्वांना ओळखत असते. गुन्हेगारी, अवैध धंदे याबद्दल पूर्ण माहीती ही पोलीस पाटलांना असते. त्यामुळे पोलीस प्रशासनाला यावर कारवाई करणे सोपे जाते. त्यामुळे भविष्यातील निर्माण होणाऱ्या संघर्षाला वा गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यास उपयोग होतो. पूर, भूकंप, अतिवृष्टी यांसारख्या नैसर्गिक आपत्तीच्या कालावधीत माहितीगार म्हणून पोलीस पाटलांचा उपयोग होतो. ग्रामपंचायत व वेगवेगळ्या निवडणुकांच्या काळात पोलीस पाटील गावपातळीवरील हालचालींबाबत पोलीस प्रशासनाला माहिती उपलब्ध करून देतात. निवडणुकीच्या काळात पोलीस पाटील यांचे योगदान मोलाचे ठरते. मात्र, रायगड जिल्ह्यात गेल्या काही वर्षांपासून पोलीस पाटील यांची भरती केली नाही. त्यामुळे कार्यरत असलेल्या पोलीस पाटील यांच्यावर कामाचा ताण पडला आहे. एका पोलीस पाटलांकडे दोन ते तीन गावांचा भार सोपविण्यात आला आहे. त्यामुळे गावांतील गुन्हे व इतर माहिती पोलीस व प्रशासनाकडे पोहोचविताना कार्यरत पोलीस पाटलांना अडचण निर्माण होत आहे. काही पोलीस पाटील सेवानिवृत्त झाले. परंतु, त्या जागी नवीन पोलीस पाटील यांची भरती केली नसल्याने ही पदे रिक्तच राहिली आहेत. त्यामुळे पोलीस पाटीलविना गाव अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

रायगड जिल्ह्यातील गावांची लोकसंख्या दोन हजारांच्या आसपास आहे. ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजारांहून अधिक आहे. जिल्ह्यासाठी एक हजार ९९५ पोलीस पाटील यांची पदे मंजूर आहेत. यापैकी फक्त ९०४ पदे भरण्यात आली आहेत. जिल्ह्यातील गावे, वाड्यांमधील कायदा व सुव्यवस्थेची माहिती देण्याचे तसेच महसूल प्रशासनाला मदत करण्याचे काम कार्यरत पोलीस पाटील यांच्यामार्फत केले जात आहे. जिल्ह्यात एक हजार ९१ पोलीस पाटील यांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे एक हजार ९१ गावांची सुरक्षा वाऱ्यावर आहे. तसेच, काही शासकीय किंवा रहिवासी दाखल्यांसारख्या कागदपत्रांसाठी पोलीस पाटील यांची स्वाक्षरी गरजेची असते. मात्र गावात कोणी पोलीस पाटील नसल्यामुळे नागरिकांना दुसऱ्या गावातील पोलीस पाटील यांच्याकडे जावे लागत आहे. त्यामुळे पोलीस पाटील यांची भरती तात्काळ करण्यात यावी, अशी मागणी मागील अनेक वर्षापासून पोलीस पाटील संघटनेकडून करण्यात आली आहे. मात्र, त्याची अद्याप कार्यवाही न केल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.

लोकसंसद

## गुणी अभिनेत्री काळाच्या पडद्याआड

आपल्या अभिनय कौशल्याच्या जोरावर मराठी रंगभूमी, चित्रपट आणि मालिकांमधून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री दया डोंगरे यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाने एक गुणी अभिनेत्री गमावली आहे. लहानपणापासूनच अभिनयाची आवड असणाऱ्या दया डोंगरे यांनी विविध नाटके आणि मालिकांमधून महत्वपूर्ण भूमिका साकारल्या. गजरा या दूरदर्शनवर गाजलेल्या मालिकेत त्यांनी साकारलेली भूमिका लक्षवेधी होती. तुझी माझी जमली जोडी रे, नांदा सौख्य भरे, लेकुरे उदंड झाली, आव्हान, स्वामी या मालिकांमधीलही त्यांच्या भूमिका गाजल्या. दया डोंगरे यांनी नवरी मिळे नवऱ्याला, खट्याळ सासू नाठाळ सून, नकाब, लालची, चार दिवस सासूचे या चित्रपटात भूमिका केल्या. काही चित्रपटात त्यांनी खलनायकी भूमिका साकारल्याने मराठी चित्रपट सृष्टीतील खलनायकी चेहरा म्हणून त्या ओळखल्या जाऊ लागल्या. त्यांनी काही हिंदी मालिकांतही काम केले. त्या नेहमी अभिनयाचे कंगोरे समजून घेऊनच भूमिका करत. ज्येष्ठ अभिनेत्री दया डोंगरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**– श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

## बँकांनी स्थानिक भाषा जाणणाऱ्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी मुंबईत १२ व्या एसबीआय बँकिंग आणि अर्थशास्त्र परिषदेत बोलताना 'स्थानिक लोकांशी जोडले जाण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँक कर्मचाऱ्यांना स्थानिक भाषेचे ज्ञान आहे' याची खात्री संबंधित बँकांनी करावी असे आवाहन केले. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे कर्मचारी स्थानिक भाषांमध्ये बोलत नसल्यामुळे अनेक ठिकाणी स्थानिक लोक आणि बँक कर्मचारी यांच्यात अनेकदा संघर्ष उफाळून येतो. अशाच एका घटनेतून मे महिन्यात बेंगळुरूमधील सूर्या नगर येथील शाखा व्यवस्थापकाने कन्नडमध्ये बोलण्यास नकार दिल्यामुळे एसबीआयला माफी मागावी लागली होती. अशा परिस्थितीत या बँकांच्या नियुक्त्या करताना स्थानिक भाषा बोलणारे कर्मचारी नियुक्त करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या या वारंवारच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन बिगर हिंदी राज्यात स्थानिक लोक आणि बँक कर्मचाऱ्यांचा भाषेवरून होणारा संघर्ष टाळण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँका आतातरी स्थानिक भाषा जाणणाऱ्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करतील अशी अपेक्षा आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु. ल.

लोकप्रिय मराठी लेखक, नाटककार, नट, कथाकार व पटकथाकार, दिग्दर्शक आणि संगीत दिग्दर्शक पु. ल. देशपांडे यांची आज ८ नोव्हेंबर रोजी जयंती. त्यांना महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व असे म्हटले जाते. त्यांच्या आद्याक्षरांवरून महाराष्ट्रात ते प्रेमाने पु. ल. म्हणून ओळखले जातात. ८ नोव्हेंबर १९१९ रोजी मुंबईतील गावदेवी या भागात पु. ल. देशपांडे यांचा जन्म झाला. जोगेश्वरीतील सारस्वत कॉलनीत त्यांचे बालपण गेले. पार्ले टिळक विद्यालयात शालेय शिक्षण घेतल्यानंतर पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात आणि सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयात त्यांनी पुढील शिक्षण घेतले. आजोबांनी लिहून दिलेले आणि पु. लं. नी पाठ केलेले दहा-पंधरा ओळींचे पहिले भाषण पु. लं. नी वयाच्या ५ व्या वर्षी त्यांच्या शाळेत हावभावासहित खणखणीत आवाजात म्हणून दाखवले. पु. लं. ना घरात खूप वाचन करायला आणि रेडिओवरील संगीत ऐकायला मिळाले. त्यांच्या घरी संगीताच्या बैठकाही होत असत. ते घरीच बाजाची पेटी शिकले. टिळक मंदिरात एकदा बालगंधर्व आले असताना पु. लं. नी त्यांना पेटी वाजवून दाखवली. बालगंधर्वांनी शाबासकी दिली आणि भावी कलाजीवनासाठी शुभेच्छा दिल्या. लोकांच्या वागण्यातील विसंगती आणि हास्यास्पद गोष्टी हेरून पु. ल. त्या लोकांच्या नकला करायचे, म्हणून घरी कुणी आले असताना पुरुषोत्तम जवळ नसलेलाच बरा असे आईला वाटे. देशपांड्यांची आई कारवारी, वडील कोल्हापूरचे आणि बहीण कोकणात दिलेली, त्यामुळे घरात भोजनात विविधता असे. यातूनच पु. ल. खाण्याचे शौकीन झाले. वडिलांच्या मृत्यूनंतर देशपांडे गाण्याच्या, पेटीच्या व अन्य शिकवण्या करू लागले. ते शाळेत असल्यापासूनच भावगीते गायचे आणि गीतांना चाली लावायचे. ग. दि. माडगूळकरांनी लिहिलेल्या आणि भीमसेन जोशींनी गायलेल्या 'इंद्रायणी काठी'ला पु. लं. नी चाल लावली होती. हेही गाणे अजरामर झाले. कॉलेजमध्ये असताना पु. ल. गायकांना साथ करीत. पु. ल. पेटी वाजवत, त्यांचा भाऊ रमाकांत तबला आणि मधुकर गोळवलकर सारंगी वाजवीत. मिळालेले १५ रुपये तिघेही वाटून घेत. पार्ले टिळक विद्यालयातून माध्यमिक शिक्षण पूर्ण करून पु. ल. देशपांडे मुंबईतील इस्माईल युसुफ कॉलेजातून इंटर व सरकारी लॉ कॉलेजमधून एलएल.बी. झाले आणि कलेक्टर कचेरी व प्राप्तीकर विभागात काही काळ नोकरी करून पुण्याला आले. पुण्याला आल्यावर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमधून बी.ए.आणि नंतर एम.ए. केले. १९३७ पासून नभोवाणीवर पु. ल. देशपांडे छोट्या मोठ्या नाटिकांत भाग घेऊ लागले. त्या वर्षी त्यांनी अनंत काणेकरांच्या 'पैजार' या श्रुतिकेत काम केले. १९४४ साली पु. लं. नी लिहिलेले पहिले व्यक्तिचित्र भट्या नागपूरकर अभिरुची या नियतकालिकातून प्रसिद्ध झाले. याचदरम्यान त्यांनी सत्यकथामध्ये 'जिन आणि गंगाकुमारी' ही लघुकथा लिहिली. १९४० च्या दशकात साहित्यक्षेत्रात पदार्पण करण्यापूर्वी ते काही काळ शाळेमध्ये शिक्षक होते. १९४६ साली ते सुनीताबाईंशी विवाहबद्ध झाले. १९४७ ते १९५४ या काळात त्यांनी चित्रपटांमध्ये आणि चित्रपटांसाठी काम केले. ङ्गवंदे मातरम्फ, ङ्गदूधभातफ आणि ङ्गगुळाचा गणपतीफ या चित्रपटांत त्यांनी अष्टपैलू कामगिरी केली. गुळाचा गणपती या चित्रपटांत कथा, पटकथा, काव्य, संगीत, भूमिका आणि दिग्दर्शन सर्वच पु. लं. चे होते. १९४८साली पु. ल. देशपांडे यांनी 'तुका म्हणे आता'हे नाटक आणि 'बिचारे सौभद्र' हे प्रहसन लिहिले. १९५५ मध्ये पु. ल. देशपांडे 'आकाशवाणी'त (ऑल इंडिया रेडिओत) नोकरीला लागले. आकाशवाणीसाठी त्यांनी अनेक श्रुतिका लिहिल्या आणि भाषणे दिली. १९५६-५७ मध्ये ते आकाशवाणीवर प्रमुख नाट्यनिर्माता झाले. बदलीवर दिल्लीला गेले असताना त्यांनी व सुनीताबाईंनी 'गडकरी दर्शन' नावाचा कार्यक्रम सादर केला. असे हे बहुआयामी व्यक्तिमत्व असलेले पु. ल. देशपांडे यांचे १२ जून २००० रोजी पुण्यात निधन झाले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

८ नोव्हेंबर

१)श्री.काशिनाथ रघुनाथ कोळी
मु.बोडणी अलिबाग,
८-११-१९४८

## खेड आगाराला पाच लाखांचे उत्पन्न




| सिंधुदुर्ग | प्रतिनिधी |

कार्तिकी एकादशीसाठी येथील एसटी प्रशासनाने जादा बसफेऱ्या चालवण्याचे नियोजन केले. त्यानुसार ३४ बसफेऱ्या आरक्षित केल्या होत्या. २८ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत धावलेल्या बसफेऱ्यांमधून १ हजार ४२७ भाविकांनी पंढरपूर गाठत विठुरायाचे दर्शन घेतले. यातून येथील आगाराला ५ लाख १ हजार ७९९ रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले. कार्तिकी एकादशीसाठी तालुक्यातून पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांची संख्या सर्वाधिक असते. यासाठी एसटी प्रशासनाने ग्रामीण भागातील बसफेऱ्यांना ब्रेक लावत पंढरपूरला ३४ बसफेऱ्या सोडल्या. या बस फेऱ्यांमधून १४२७ वारकऱ्यांनी प्रवास केला. यामध्ये ५७८ पुरुष व ६०९ स्त्रियांचा समावेश होता. ११० नागरिकांनी अमृत योजनेचा लाभ घेतला. यातूनच सुरक्षित प्रवासासाठी ओळखल्या जाणाऱ्या एसटीला भाविक प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे दिसून येत आहे.

# फिरत्या वाचनालयाची फक्त घोषणा

## ● रत्नागिरीसह पाली, गुहागर बसस्थानक प्रतीक्षेत; प्रवासी नाराज

| रत्नागिरी | प्रतिनिधी |

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी राज्यातील ७४ बसस्थानकात वाचनालय सुरू करणार असल्याची घोषणा केली होती. नोव्हेंबर महिना उजाडला अद्याप रत्नागिरी, पाली, गुहागर या तीन बसस्थानकावर फिरते वाचनालय सुरू झालेले नाही. जिल्ह्यासह राज्यातील कोणत्याच बसस्थानकावर अद्याप तरी वाचनालय सुरू झाले नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे प्रवाशांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.



बसस्थानकात एसटी वेळेवर न आल्यास प्रवाशांना ताटकळत उभे रहावे लागते. त्यावर पर्याय म्हणून बसस्थानकात मोफत वाचनालय सुरू करण्याची घोषणा परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. स्थानकातील वाचनालयात मराठी वृत्तपत्रांसह कथासंग्रह, स्पर्धा परीक्षेसाठीची पुस्तके उपलब्ध असणार असून पुस्तके नोंद करून घरी घेऊन जाता येणार आहे, असेही सांगण्यात आले होते. मात्र ही योजना जाहीर करून दीड महिना होत आला, अद्याप तरी रत्नागिरी बसस्थानकासह पाली, गुहागर बसस्थानकावर फिरते वाचनालय सुरू झाले नाही. नुसती घोषणा करण्यात आल्यामुळे प्रवाशांमधून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

प्रसिद्धीसाठी मोठ-मोठ्या घोषणा केल्या जातात. मात्र या घोषणांची पूर्तता करताना आवश्यक निधी तसेच योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कोणतीच योजना आखली जात नाही, अशी बोचरी टीकाही नागरिकांमधून करण्यात येत आहे.

### या स्थानकांवर नाहीत वाचनालये

रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, धाराशिव, नाशिक, जळगाव, धुळे, पुणे, बीड, छत्रपती संभाजी नगर, लातूरसह अन्य ठिकाणी वाचनालय सुरू होणार आहे. मात्र अद्याप कोणत्याच बसस्थानकावर फिरते वाचनालय सुरू झालेले नाही.

> “मोफत वाचनालय सुरू करण्याबाबतचे आदेश आले आहेत. रत्नागिरीसह अन्य बसस्थानकावर फिरते मोफत वाचनालय सुरू करण्यात येणार आहे.
> – प्रज्ञेश बोरसे, विभाग नियंत्रक, रत्नागिरी”

> “पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यातील ७४ बसस्थानकावर मोफत फिरते वाचनालयाची घोषणा करण्यात आली होती. कल्पना चांगली आहे. मात्र प्रत्यक्षात हालचाली करून वाचनालय सुरू होणे अपेक्षित होते. जेणेकरून वाचन संस्कृती वाढेल, प्रवाशांचा वेळही सत्कारणी लागेल.
> – पंकज पवार, प्रवासी”

# काम अपूर्णच; ठेकेदाराला पैसे दिले पूर्ण

## ● डहाणूतील चळणी ग्रामपंचायतीचा अजब कारभार

| पालघर | प्रतिनिधी |

पाणीपुरवठा योजनेचे काम अपूर्ण ठेवणाऱ्या ठेकेदाराला डहाणूतील चळणी ग्रामपंचायतीने पूर्ण पैसे दिले आहेत. ठेकेदाराने पाण्याची टाकी बसवली पण मुख्य पाइपलाइनला जोडलीच नाही. त्यामुळे पाणीपुरवठा योजनेचे तीनतेरा वाजले आहेत. लाखो रुपये खर्चून ग्रामस्थांना हंडाभर पाण्यासाठी पायपीट करावी लागत असल्याने ग्रामपंचायतीच्या अजब कारभाराविरोधात ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.

मुबलक पाऊस पडूनही पालघरमधील ग्रामीण भागातील ग्रामस्थांना पाणीटंचाईचे चटके सोसावे लागत आहेत. महिलांना पाण्यासाठी मैलोन्मैल पायपीट करावी लागत आहे. ग्रामस्थांची फरफट थांबवण्यासाठी ग्रामपंचायतीने पंधरावा वित्त आयोगाच्या निधीतून २०२४ मध्ये चारीचामाळ पाड्यात पाणीपुरवठा योजना राबवली होती. पाड्यातील ५२ कुटुंबांसाठी पाच हजार लिटर क्षमतेची टाकी बसवून त्या ठिकाणी चार नळ बसवण्यात आले होते. मात्र टाकीला मुख्य पाइपलाइन न जोडल्याने ती योजना गेल्या वर्षभरापासून रखडली आहे. असे असताना ग्रामपंचायतीने ठेकेदाराला अर्धवट कामाचे तीन लाख पाच हजार रुपये दिले. लाखो रुपये खर्चूनही योजनेचा कोणताच लाभ न मिळाल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

### चौकशीची मागणी

ग्रामपंचायत व ठेकेदार यांच्यात मिलीभगत करून भ्रष्टाचार केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून ग्रामविकास अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व लवकरात लवकर पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी ग्रामस्थ अविनाश डावरे यांनी केली आहे.

# रामपूर-ओमळी एसटी पूर्ववत करावी

## कोकण प्रवासी महासंघाची मागणी

| चिपळूण | प्रतिनिधी |

चिपळूण आगारातून रामपूर ते ओमळी फेरी सुरू करण्यात यावी, अशी मागणी कोकण प्रवासी महासंघ यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ विभाग नियंत्रक कार्यालय रत्नागिरी यांच्याकडे निवेदनद्वारे केली आहे.

या निवेदनात असे नमूद केले आहे की, गेली वर्षभर रामपूर ते ओमळी ही गाडी रस्ता नादुरुस्त व खराब असल्याचे कारण दाखवून बंद करण्यात आली आहे. या रस्त्याचे काम सुव्यवस्थित व पूर्ण झाल्यावर ही फेरी पूर्ववत सुरू करण्यात येईल, असे तोंडी आश्वासन रत्नागिरी विभागाचे वाहतूक अधिकारी सुर्वे यांनी दिले. मात्र रामपूर ते ओमळी फाटा या मार्गाचे डांबरीकरण व रुंदीकरण पूर्ण झाले आहे. एसटी फेरी सुरू करण्यास रस्ता योग्य असल्याबाबतची माहिती देऊन सदर एसटी सुरू करावा, असे विनंतीपत्र विभाग नियंत्रण रत्नागिरी व आगार व्यवस्थापक चिपळूण यांना देण्यात आले. याबाबत आगार व्यवस्थापक यांच्याकडून शाळा सुरू झाल्यावर फेरी सुरू करू, असे तोंडी आश्वासन देण्यात आले. परंतु, शाळा सुरू होऊन सहा महिन्याचा कालावधी उलटला आहे. तरीही बस फेरी सुरू करण्यात आलेली नाही.



# चारिझेन फाउंडेशनतर्फे टिशर्ट वाटप

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव चारिझेन फाउंडेशनतर्फे तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा गांगवली येथील विद्यार्थ्यांना शुक्रवारी (दि.७) टिशर्ट वाटप केले. या कार्यक्रमास उपस्थित फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते यांचे शाळेतर्फे मुख्याध्यापक अशोक जाधव, शिक्षिका नेहा जाधव यांच्यासह विद्यार्थ्यांनी स्वागत केले. चारिझेन फाउंडेशन हे रायगड जिल्ह्यात बहुजन समाजात सामाजिक बांधिलकी ठेऊन आपण समाजाचे काहीतरी देणेकरी लागतो, हा उदात्त हेतू नजरेसमोर ठेऊन सातत्याने सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवित आहेत. माणगाव तालुक्यात या फाउंडेशनमार्फत महिलांसाठी शिलाई कोर्स, विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप, टिशर्ट वाटप, रक्तदान शिबीर असे विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबविले जात आहेत. आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भावी नागरिक असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी फाऊंडेशन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन फाउंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा यांनी केले.

# टँकरच्या धडकेत तरुणीचा मृत्यू

| मुंबई | प्रतिनिधी |

रस्ता ओलांडणाऱ्या २७ वर्षीय तरूणीचा टँकरच्या धडकेत मृत्यू झाला. बुलढाणा जिल्ह्यातील मूळची रहिवासी असलेली खुशबू दीपक परियानी (२७) खार (पूर्व) येथील खेरेवाडी भागात राहत होती. ती एका खासगी बँकेत काम करीत होती. खुशबू गुरुवारी सकाळी ९.३० च्या सुमारास कार्यालयात जात होती. बीकेसी येथील एशियन हार्ट रुग्णालय जंक्शनजवळून ती रस्ता ओलांडत असताना पाण्याच्या टँकरने तिला धडक दिली. यात तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. तिला तात्काळ खेरवाडीतील गुरू नानक रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

# शेतकऱ्यांची एकजूट महत्त्वाची: उद्धव ठाकरे

| मुंबई | प्रतिनिधी |

थापेबाज सरकारला वठणीवर आणण्यासाठी शेतकऱ्यांची एकजूट आता महत्वाची आहे. सर्व हेवेदावे दूर ठेऊन संघटीत होऊन तुमच्यावर झालेल्या अन्यायाविरुध्द आता रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची वेळ आली आहे.



तुमच्या नुकसानीची भरपाई पूर्णपणे मिळण्यासाठी मी संघर्ष करत आहे, तुम्ही पेटून उठा, असे आवाहन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांना केले. अर्धापूर तालुक्यातील पार्डी येथे त्यांनी अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांशी सविस्तर संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.

शेतकऱ्यांच्या उदध्वस्त झालेल्या जीवनात त्यांना मदत करण्याऐवजी या भागातून समृध्दी महामार्ग होण्यासाठी व कंत्राटदारांचे भले करण्यासाठी ८६ हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले. मात्र सरकारने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेले ३२ हजार कोटींचे पॅकेज नेमके गेले कुठे? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला. पुढे ते म्हणाले की, संबंध मराठवाडा फिरत आहे, कुठेही शेतकरी समाधानी नाही, पिकविम्यांची तुटपुंजी मदत, जाहीर केलेल्या अनुदानापैकी थोडीफार मदत करुन शेतकऱ्यांची क्रूरचेष्टा हे सरकार करत आहे. शेती उदध्वस्त झाली, पिके वाहून गेली, केळी उदध्वस्त झाली, बागायती पिकांचे नुकसान झाले. तरीही या सरकारला दया आली नाही, शक्तीपीठाच्या माध्यमातून त्याचे नियोजन होण्यापूर्वीच आजूबाजूच्या जमिनी बड्या मंडळींनी खरेदी केल्या. शेतकऱ्यांच्या मदतीपेक्षा समृध्दी महामार्ग या सरकारला महत्वाचा वाटतो आहे. तसेच, दिवाळी गेली तरीही मदत नाही. त्यामुळे आता शेतकऱ्यांची एकजूट महत्वाची असून, सरकारला जाब विचारण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी संघटीत होऊन तहसीलदार आणि संबंधितांना घेराव घाला. मदत मिळेपर्यंत तेथून हालू नका, असा सल्लाही उद्धव ठाकरे यांनी दिला.

# विद्यार्थ्यांनी पडलेल्या भाताचे केले निरीक्षण

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

शाळेय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शेती विषय हा आभ्यास शालेय उपक्रमात असतो. मात्र या वर्षी शेतीचे मोठे नुकसान झाले. हे विद्यार्थ्यांना जवळून पाहून त्यांचे निरीक्षण करता यावे यासाठी राजिप शाळा वडगाव येथील विद्यार्थ्यांनी शेताच्या बांधावर जाऊन शेतीचे झालेल्या नुकसानीचे प्रात्यक्षिक धडे गिरवले.



आपले पालक शेतीमध्ये घेत असलेली मेहनत आणि त्या मेहनतीवर फिरलेले पाणी हे त्यांना प्रत्यक्ष जवळून पाहता आले. यावेळी भात शेतीच्या नुकसान संदर्भात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नाची शेतकऱ्यांनी समाधानकारक उत्तर देऊन मुलांमध्ये शेतीविषयी आत्मियता निर्माण केली. विद्यार्थी शेतामध्ये गेले असताना त्यांच्या दृष्टीस पावसामुळे शेतातील पडलेले भात दिसले. काही ठिकाणी भात कापणी केली नाही म्हणून भाताच्या लोंब्यापासून दाणा अलग होत असल्याचे पहावयास मिळाले. या क्षेत्रभेटीमधून मुलांना शेतकऱ्यांच्या पिकाचे झालेले नुकसान व त्याचे निरीक्षण करता आले.

# विनोदशेठ जैन यांना मातृशोक

म्हसळा : म्हसळा येथील सेवाभावी उद्योजक व नाकोडा मेडिकलचे मालक विनोदशेठ जैन यांच्या मातोश्री रेमीबाई खेतमलजी हरणेशा यांचे शुक्रवारी (दि.६) अल्पशा आजाराने निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ८५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे आणि आप्तेष्ट असा मोठा परिवार आहे. त्यांचे अंत्यसंस्कार विधी शनिवार दि.७ नोव्हेंबर रोजी सकाळी म्हसळा येथील हिंदू स्मशानभूमीत करण्यात आले.

# निडीत आढळला दुर्मिळ जातीचा साप

| खांब | प्रतिनिधी |

रोहा शहराजवळील निडी या गावी ग्लॉसी मार्स या दुर्मिळ जातीचा साप आढळला असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. निडी गावातील सर्पमित्र दत्तात्रेय वाघमारे यांना गुरुवारी (दि.६) त्यांच्या गावात साप आढळल्याची माहिती मिळाली. त्यांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून पाहणी केली असता, तो साप काहीसा वेगळ्या प्रकारचा असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तात्काळ सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था कोलाड या टिमजवळ संपर्क साधाला. माहिती मिळताच टीम सदस्यांनी



घटनास्थळी धाव घेतली व सापाचे बारकाईने निरीक्षण केले. तपासणीनंतर तो साप ग्लॉसी मार्स या नावाने ओळखला जात असून तो अत्यंत दुर्मिळ जातीचा साप असल्याचे टीम सदस्यांनी सांगितले. त्यानंतर सापाला पकडून सुरक्षितपणे नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. ग्लॉसी मार्श साप आणि डॉग-फेस्ड साप हे दोन्ही साप

**विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय सेवाही उपलब्ध करणार** | **शिक्षण विभागाचे महत्वाचे पाऊल**

# शाळांच्या इमारतींची होणार संरचनात्मक तपासणी

| ठाणे | प्रतिनिधी |

ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व खासगी शाळांच्या इमारतींचे संरचनात्मक तपासणी करण्याचा निर्णय पालिकेच्या शिक्षण विभागाने घेतला आहे. मुंबईतील भारतीय तंत्रज्ञान संस्था आणि वीरमाता जिजाबाई तांत्रिक संस्था या संस्थेमार्फत हे परिक्षण करून घेण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. त्यासाठी शाळेच्या मुख्याध्यपकांना पत्र पाठविले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही शिक्षण विभागाने हे महत्वाचे पाऊल उचलल्याचे दिसून येत आहे.



ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये एकूण ७६९ खासगी शाळा आहेत. त्यात २०९ खासगी अनुदानित आणि ५६० विनाअनुदानित शाळा आहेत. याशिवाय, ठाणे महापालिकेच्या ९५ प्राथमिक तर ७ माध्यमिक अशा एकूण १०२ आहेत. २०१४ साली शिक्षण मंडळ बरखास्त करून सरकारने शिक्षण समितीमार्फत कारभार सुरू केला. मात्र, तेव्हापासूनच शैक्षणिक अधोगती सुरु झाल्याचा आरोप ठाणे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी काही दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेऊन केला होता. ठाणे महापालिका शाळांच्या एकूण ७६ इमारतीपैकी सद्यस्थितीत ६९ इमारती शाळा भरत असून उर्वरीत ७ शाळांची दुरवस्था बनल्याने विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून शाळेत बसावे लागते. ठाणे महापालिकेला ३५९ कोटी ३४ लाख इतके अनुदान प्राप्त होते. तरीही विद्यार्थी व शिक्षकांना त्याचा फायदा होत नसल्याचा आरोप चव्हाण यांनी केला होता. त्याचबरोबर खासगी शाळांचाही मुद्दा उपस्थित केला होता.

या संदर्भात विक्रांत चव्हाण यांनी ठाणे पालिकेच्या शिक्षण विभागाला पत्रही पाठवून शाळा इमारतींच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुढे आणला होता. यानंतर खडबडून जागे झालेल्या ठाणे महापालिका शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही शिक्षण विभागाने हे महत्वाचे पाऊल उचलले आहे. महापालिकेच्या शिक्षण विभागाचे उपआयुक्त सचिन सांगळे यांनी सर्व खासगी शाळांच्या मुख्याध्यापकांना पत्र पाठविले आहे. त्यात शाळांच्या इमारतींचे संरचनात्मक तपासणी करण्याचा निर्णय पालिकेच्या शिक्षण विभागाने घेतला आहे.

### विद्यार्थी संख्येनुसार आवश्यक सुविधा

*मुंबईतील भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) आणि वीरमाता जिजाबाई तांत्रिक संस्था (व्ही.जे.टी.आय.) या संस्थेमार्फत हे परिक्षण करून घेण्याचे आदेश आहेत. तसेच विद्यार्थी संख्येनुसार शाळांच्या इमारतीमध्ये अद्ययावत प्रयोगशाळा, शौचालये, कॅन्टीन आणि विश्रांतीगृह अशा आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक शाळेत वैद्यकीय अधिकारी आणि परिचारिका यांच्या सेवाही उपलब्ध करून द्याव्यात, अशाही सुचना केल्या आहेत.*

# निवडक

## विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययन प्रशिक्षण




**खांब** : ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम संशोधिका, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रोहा तालुक्यातील ग्रामीण भागातील १९ शाळांतील इयत्ता दहावीतील निवडक विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययन प्रशिक्षण वर्ग कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, रोहा येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी ज्ञान प्रबोधिनीतील प्रशिक्षक ओंकार बाणाईत यांनी घेतलेल्या ‘माहितीची पुनर्मांडणी’ या कृती सत्रामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे सादरीकरण कौशल्यात व आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली. तसेच स्मरण कौशल्य या विषयावरही विद्यार्थ्यांना उपयुक्त मार्गदर्शन मिळाले. रोह्यातील जेष्ठ शिक्षिका प्रा. मुग्धा ओक यांनी विद्यार्थ्यांना गणितातील संकल्पना समजावून सांगितल्या. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण केले. या प्रशिक्षण कार्यक्रमात सुमारे ५५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. या सर्व विद्यार्थ्यांनी इयत्ता १० वी, विज्ञान विषयातील प्रयोग स्वतः करून पाहिले. ज्यामुळे त्यांच्या निरीक्षण, विश्लेषण आणि विचारशक्तीचा विकास झाला.



## वंदे मातरम समूहिक गायन कार्यक्रम

**उरण** : कोकण ज्ञानपीठ पुरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अ जीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वंदे मातरम गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सामूहिक वंदे मातरम गीत गायन कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही व्ही गर्जे यांनी याप्रसंगी भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील वंदे मातरम गिताची भूमिका विशद करून राष्ट्रवाद व देशभक्ती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर उपस्थित सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी वंदे मातरम गीताचे समूह गायन केले. इतिहास विभाग प्रमुख डॉ. एम.जी. लोणे यांनी वंदे मातरम गीताचा इतिहास सांगितला व भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर प्रकाश टाकला व उपस्थितांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ.दत्ता हिंगमिरे यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनात ग्रंथपाल श्याम धारासुरकर व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला.



## संगमेश्वर मंदिरात दीपोत्सव साजरा

**माणगाव** : माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव येथील संपूर्ण माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या संगमेश्वर मंदिरात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही बुधवारी दि.५ त्रिपुरारी पोर्णिमेनिमित्त दीपोत्सव कार्यक्रम भक्तिभावाने साजरा करण्यात आला. संगमेश्वरनगर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संजय साबळे यांच्या हस्ते सायंकाळी महाआरती घेण्यात आली. यावेळी विजयशेठ मेथा, सचिन गोरेगावकर, उमेश, कनोजे, अभिजित साबळे यांच्यासह भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आलेल्या सर्व भक्तगणांचे देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संजय साबळे व सहकाऱ्यांनी स्वागत केले. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मंदिर परिसरात व मंदिराच्या गाभाऱ्यात विद्युत रोषणाई, दिवे व फुलांच्या माळांनी आकर्षक अशी सजावट केली होती. सदर उत्सव उत्साहात पार पाडण्यासाठी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संजय साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रस्टचे सर्व पदाधिकारी तसेच संगमेश्वर उत्सव कमिटी पदाधिकारी व महिला मंडळ यांनी विशेष परिश्रम घेऊन त्रिपुरारी पौर्णिमा उत्साहात साजरी केली.

## जिजाऊ शैक्षणिक संस्थेकडून रुग्णवाहिका भेट



**चिपळूण** : जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था महाराष्ट्र या संस्थेच्या वतीने चिपळूण तालुक्यासाठी देण्यात आलेल्या रुग्णवाहिकेचे लोकार्पण आमदार शेखर निकम यांच्या हस्ते करण्यात आले. हा सोहळा गुरुवारी (दि.६) सकाळी १० वाजता चिपळूण शहरातील श्री कालभैरव मंदिराच्या प्रांगणामध्ये पार पडला. यावेळी जिजाऊ संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश भगवान सांबरे यांनी तळागाळातील लोकांच्या विकासाचा ध्यास घेतला आहे. कोकणचा सर्वांगीण विकास हा जिजाऊचा ध्यास असे ब्रीदवाक्य घेऊन त्यांनी कोकणातील गरजूंना मदतीचा हात दिलेला आहे. चिपळूण तालुक्यासाठी रुग्णवाहिका प्राप्त झाल्याने आता तालुक्यातील ग्रामीण भागातील रुग्णांना एक हक्काची रुग्णवाहिका मिळाली आहे. या सेवेचा रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन सुद्धा करण्यात येत आहे. चिपळूण तालुक्यातील गरीब गरजू रुग्णांसाठी एक चांगली रुग्णवाहिकेची सेवा जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेने निर्माण करून दिली आहे, ही बाब निश्चितच गौरवाची आहे.

## ‘वाचनालय आपल्या दारी’ उपक्रम

**चिपळूण** : लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर चिपळूण आणि पेढे ग्रामविकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच वाचनालय आपल्या दारी उपक्रम सुरु झाला. वाचन चळवळ वाढावी, समाजात वाचनाची गोडी निर्माण व्हावी म्हणून लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर आणि पेढे ग्रामविकास मंडळ यांनी नुकताच पेढे कोष्टेवाडी येथील कामधेनू मंदिरात महिला वाचकांचा मेळावा आयोजित केला होता. यावेळी लोटिस्मा ग्रंथालयाचे कोषाध्यक्ष सुबोध दीक्षित यांनी वाचनाची आवश्यकता आणि वाचनाचे कायदेफ याविषयी मार्गदर्शन केले. वाचनालयाचे कार्याध्यक्ष अरुण इंगवले यांनी वाचनालय, कलादालन, वस्तुसंग्रहालय या वाचनालयाच्या उपक्रमांविषयी माहिती देऊन माहिती देऊन वाचनालयात भेट देण्याचे उपस्थितांना आवाहन केले.

# हिंदू तरुणीच्या उपचारासाठी मुस्लिम समाजाचा पुढाकार

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ शहरातील १४ वर्षीय कनिष्का प्रकाश लोभी या तरुणीला उपचारासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदतीची गरज भासल्याने, नेरळ व दामत येथील मुस्लिम समाजाने पुढाकार घेत समाजात ऐक्याचे अनोखे उदाहरण घालून दिले आहे. मशिदीत नमाजीनंतर आवाहन करून केवळ काही दिवसांत सुमारे दोन लाख रुपयांची मदत गोळा करण्यात आली आहे.

कनिष्का ही नेरळच्या राजेंद्र गुरुनगर भागात राहते. अभ्यास करत असताना ती इमारतीच्या टेरेसवरून तोल जाऊन खाली पडल्याने गंभीर जखमी झाली. तिच्या डोक्याला, जबड्याला, कंबरेला आणि पायाला गंभीर दुखापत झाली आहे. सध्या तिच्यावर मुंबईच्या परेल येथील ग्लिनिगल रुग्णालयात उपचार सुरू आहेत. डॉक्टरांनी सुरुवातीला २५ लाख रुपयांचा खर्च सांगितला असून हा खर्च ४० लाखापर्यंत होणार आहे. यामुळे कुटुंबाला मोठा आर्थिक अडथळा निर्माण झाला आहे.



## ● दोन लाख रुपयांची मदत केली जमा

कनिष्काचे वडील हे नेरळमाथेरान दरम्यान प्रवासी वाहन चालवून घर सांभाळतात. घरात पत्नी आणि इतर लहान मुली, वडील आहेत. या कठीण प्रसंगात सोशल मीडियावरून नागरिकांकडून मदतीचे आवाहन करण्यात आले. दरम्यान, नेरळ व दामत येथील मुस्लिम समाजाने पुढाकार घेतला. मशिदीत नमाजीच्या वेळी चादर पुढे करून कनिष्काच्या उपचारासाठी मदतीचे आवाहन करण्यात आले. या उपक्रमातून दामत गावातून एक लाख साठ हजार रुपये आणि नेरळ शहरातून तब्बल साठ हजार रुपये जमा झाले आहेत.

### मानवताच सर्वोच्च धर्म

**आठवडाभरापूर्वी कनिष्काला बी पॉझिटिव रक्ताची तातडीची गरज भासली होती. तेव्हाही विविध समाजातील नागरिक, तसेच मुस्लिम युवकांनी पुढे येत रक्तदान केले. हिंदू मुलीसाठी मुस्लिम समाजाने दाखवलेला हा मानवतेचा हात आणि संवेदनशीलतेचा भाव नेरळ शहर व परिसरात धार्मिक ऐक्याचे एक आदर्श उदाहरण म्हणून ओळखला जात आहे. या घटनेने मानवतेचा धर्मच सर्वोच्च हा संदेश पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.**



# शाळांमधून वंदे मातरम्‌चा जयघोष

। रसायनी । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये वंदे मातरम राष्ट्रीय गीताचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. राज्यातील शाळांमधून रोज वंदे मातरम्‌ या गीताची पहिली दोनच कडवी गायिली जातात. परंतु १५० वर्षपूर्तीचे औचित्य साधून सर्व शाळांमधून संपूर्ण वंदे मातरम्‌ चे गायन व्हावे व या गीताचा इतिहास सांगणारी प्रदर्शन शाळांच्या दर्शनी भागात लावावा. तसेच वंदे मातरम्‌ गीताचा संपूर्ण इतिहास विद्यार्थ्यांना माहीत व्हावा या उद्देशाने शाळेमध्ये हा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेमध्ये वंदे मातरम राष्ट्रीय गीताचे संपूर्ण गायन घेण्यात आले. तसेच वंदे मातरम गीताच्या इतिहासाविषयी माहिती देणारी प्रदर्शनी शाळेत आयोजित करण्यात आली.

# व्यापारी असोशियनतर्फे रक्तदान शिबीर

। महाड । प्रतिनिधी ।

महाडमधील जनकल्याण रक्तपेढी येथे शुक्रवारी (दि.७) महाड व्यापारी असो.तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ३२ व्यापारी सदस्य यांनी रक्तदान केले. महाड शहर व्यापारी असो.च्या वतीने तिसरे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. त्यामध्ये महाड शहर अध्यक्ष संजय मेहता, जेष्ठ व्यापारी आणि व्यापारी संघटनेचे प्रमुख सल्लागार कुमार मेहता, उपाध्यक्ष संदीप, सुरेश पटेल, प्रदीप वाडके, मनीष मेहता, कार्याध्यक्ष अमित फुटाणकरसह कार्याध्यक्ष समीर देसाई याच्या प्रमुख उपस्थितीत शिबीर घेण्यात आले.

---

दिनांक : ०८ नोव्हेंबर २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे हेदवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| काशिनाथ चिंधू पाटील | ३९ | १९ | ०-१०-०० | ० | ०९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:- मु.पो.कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक : ०८/११/२०२५

---

## जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक सुनंदा हरिश्चंद्र घोडके, हरिश्चंद्र रामचंद्र घोडके यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे - बार्णे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे. आर. | आकारणी रु.पै |
|---|---|---|---|
| ३ | ११ | ०-०९-१० पो.ख.<br>०-००-५० एकुण<br>०-०९-६० क्षेत्र मिळकतीचे खरेदीखत | ०-१२ |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन ०७ (सात) दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक : ०७/११/२०२५

**ॲड. मोनाली रामदास हजारे**
एम. कॉम. एल. एल. बी.
पत्ता: दहिवली, ए. व्ही. एफ. रेसिडेन्सी, ललानी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९२६०१०९२८२

---

## कर्जत नगर परिषद
KARJAT MUNICIPAL COUNCIL
ता. कर्जत जि. रायगड पिन - ४१०२०१
E-mail : karjatcouncil@gmail.com ऑफीस : ०२१४८-२२२०३३ : Fax :२२१३१२

जा.क्र.कनप/सानि/जाहीर नोटीस/२१९६/०४/२५-२६ दिनांक : ०७/११/२०२५

**कर्जत नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक२०२५**
**(मतदान केंद्राची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या जाहिर प्रकटन)**

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील आदेश क्र. रानिआ/नप- २०२५/प्र.क्र.०९/का-६ दि. ३०/०९/२०२५ व दि. १३/१०/२०२५ मधील निर्देशानुसार कर्जत नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता प्रभाग क्र. १ ते १० मधील मतदान केंद्रांची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी दिनांक ०७/११/२०२५ रोजी पासून कर्जत नगरपरिषद कार्यालयात, कार्यालयीन वेळेत, कार्यालयीन दिवशी पाहणेसाठी/निरीक्षणासाठी/विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तसेच कर्जत नगरपरिषदेच्या https://mahaulb.in/MahaULB/home/ulbist/viewmore या संकेत स्थळावर उपलब्ध करणेत आली आहेत. तरी याची कृपया नोंद घ्यावी.

| अ.क्र. | ठिकाण | तपशिल |
|---|---|---|
| १ | कर्जत नगरपरिषद कार्यालय ता. कर्जत, जि. रायगड | कर्जत नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. १ ते १० मधील मतदान केंद्रांची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या. |

दिनांक:- ०७/११/२०२५
ठिकाण :- कर्जत

सही/-
**(तानाजी चव्हाण)**
मुख्याधिकारी
कर्जत नगरपरिषद, कर्जत

---


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


---

## उरण नगरपरिषद
**जिल्हा रायगड**
**जाहीर सूचना**

मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्र. रानिआ/ग्रापनि २०२३/प्र.क्र.३/का-८ दिनांक १६ जुलै, २०२५ अन्वये उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदार यादीचा कार्यक्रम निश्चित केल्याप्रमाणे व मा.राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.०९/का-६ दिनांक ३०/०२/२०२५ अन्वये अधिसूचित केलेल्या दिनांकास म्हणजे ०१/०७/२०२५ रोजी अस्तित्वात आलेली १९० उरण विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादी वरून मा. जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र.नपाप्र.कार्या-४/न.प.सा.नि./मतदार यादी कार्यक्रम/२०२५/२१२ दिनांक ०६/१०/२०२५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार उरण नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकी करिता १ ते १० बहुसदस्यीय प्रभागाच्या मतदान केंद्राची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या तयार करण्यांत आल्या आहेत. सदरच्या मतदार याद्या नागरीकांना पाहण्यांसाठी दिनांक ०७/११/२०२५ खालील ठिकाणी प्रसिद्ध आल्या आहेत. सदर याद्या निम्नलिखित स्थळी उपलब्ध असतील.

१) उरण नगरपरिषद कार्यालय नोटीस बोर्डावर २) तहसिल कार्यालय उरण जि.रायगड ३) उरण नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.३ मोरा-उरण ४) उरण नगरपरिषद संकेतस्थळ : https://mahaulb.in/PortalSite/#/app/home

उरण नगरपरिषद कार्यालय
उरण, दिनांक ०७/११/२०२५

सही/-
**(समीर जाधव)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे बार्णे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) अशोककुमार सत्यनारायण सिंग व २) हरेंदर विद्याचल सिंग यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे बार्णे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३२ | २/क | ०-४२-२० | ४-७० |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०८/११/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकतीचे अविभक्त मालकीचे क्षेत्र हे त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या अविभक्त जमीन मिळकतीचे क्षेत्राबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - गुढवण, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| शितल बाळाराम कदम | ६५ | ४ | ०-५०-०० | ० | २२ |

सदर मिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी खरेदी देणार यांचे अविभक्त मालकीच्या क्षेत्राबाबत

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- शॉप नं. २, तळमजला, साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टँडजवळ नेरळ पूर्व, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१

सही/-
**ॲड. नितीन अर्जुन क्षिरसागर**
मो.नं.९३७२९६४६६५
दिनांक : ०८ नोव्हेंबर, २०२५

---

## पनवेल महानगरपालिका
## जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | राकेश कुमार श्रीवास्तव, प्लॉट नं. ०१, सेक्टर १५, नवीन पनवेल, सी.के.टी. स्कूल समोर, ता. पनवेल,जि. रायगड | ०२ वड, ०२ उंबर, ०३ आंबा, ०१ नारळ ०१ गुलमोहर अशी एकूण ०९ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील अर्जदार यांचे मालकीचे प्लॉट नं. बी-२/२८+२९ +३०, से-१२, कळंबोली मधील ०२ वड, ०१ उंबर अशी ०३ झाडे, प्लॉट नं. ए-१० /२८+२९+३०, से-१२, कळंबोली मधील ०२ आंबा, ०१ उंबर, ०१ नारळ, ०१ नारळ, ०१ गुलमोहर अशी ०५ झाडे तसेच प्लॉट नं. ए-९/३१+३२+३३, से-१२ कळंबोली मधील ०१ आंबा अशी एकूण ०९ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येइल, याची नोंद घ्यावी.

जा.क्र. PMC-PARK/२५२/२०२५-PTAD

सही/-
**(स्वरूप खारगे)**
उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका

---

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकतीचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन : मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|---|
| श्री. एकनाथ मारुती पाटील<br>श्री. बाळू मारूती पाटील<br>श्री. मंगळ मारूती पाटील | १४३ | १/अ/३ | ०-३७-०० | ०-२७ |

वरील मिळकती ह्या आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.
कळावे.

दि. ०८/११/२०२५.
**ॲड. निलेश रखमाजी पादीर**
मो. ९७६७६३७१००
९२७२५६२१५८

**ॲड. दिपक रखमाजी पादीर**
मु. पो. नेरळ (मोहाचीवाडी),
ता. कर्जत, जि. रायगड
मो. - ९८५०७६७५६८

---

## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत मिळकतींचे मुळ श्री. तेजस वासुदेव मानकवळे यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविले असुन तशी बोलणी देखील केलेली असुन सदर मिळकत कायम फरोक्त खरेदीखताने विकत घेण्याचे आमचे अशिलांनी ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | पो.ख. (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| गौळणवाडी | १/५२/क | ०-३५-०० | ०-०५-०० | ०.४३ |

वरील वर्णनाची मिळकत व त्यातील दगड, धोंडा, पाणी, जाणे येण्याचा मार्ग सर्व वहिवाटी, सर्व हक्क दरोबस्त अशी मिळकत ही या जाहीर नोटीसीचा विषय असुन सोयीकरीता तिला यापुढे सदर मिळकत असे संबोधिले जाईल.

सदर मिळकत ही विद्यमान मालक यांचे ताबेकब्जातील, वहीवाटीतील, निर्वेध, बोजारहीत, विकण्यायोग्य असल्याची हमी मिळकतीचे मुळ मालक यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणतेही भागावर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहीवाट, ताबेकब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बक्षिस, बोजा, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, भागीदारी, खरेदीखत, या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. या कालावधीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
ता. ०७/११/२०२५

**ॲड. पुष्कर धनदास मोकल**
रा. ईशान्य को. ऑप. हौ. सोसायटी,
बी-विंग, पहिला मजला, फ्लॅट नं. १०३,
महाजन हॉस्पिटलचे बाजुला चिंचपाडा,
पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८५०३६११७२, ८६८७३६९३६९

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000038119**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-27/2025-2026.**<br>RFx e-tender for Supply of Tools & Plant (T&P) at 220/33kV Ulwe GIS & 220kV Timber Market substations under EHV O&M Division Panvel...**2nd call.**<br>**Tender amount Rs. 7,26,422/-, EMD amount Rs. 7,264/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **07.11.2025, 18:00 Hrs. to 17.11.2025, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 17.11.2025 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **18.11.2025 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(A. P. Joshi)**
**Executive Engineer, E.H.V. (O&M) Dn. Panvel**

---


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


---

परिशिष्ट-६
**(सोडत व आरक्षण प्रसिद्धी-जाहीर सूचनेचा नमुना-इंग्रजी)**

**PANVEL MUNCIPAL CORPORATION**
**GENERAL ELECTION 2025**
**PROGRAMME FOR THE DRAW OF LOTS FOR RESERVATION**
**PUBLIC NOTICE**

For the General Election of Panvel Municipal Corporation to be held in the year 2025 The Programme for the Draw of lots for reservation of seats in the category of the Scheduled Caste (women), Scheduled Tribes (women), Backward Class of Citizens, backward Class of Citizens (women) & Women from General Category and for the publication of reservation is as below.

| | | |
|---|---|---|
| 1. | Date of the Draw for the reservation | Tuesday, Date 11 November, 2025<br>At 11.00 a.m<br>Place -Adya Krantiveer Vasudev Balwant Phadke Auditorium |
| 2. | Date of publishing the draft of reservation | Monday, Date - 17 November, 2025 |
| 3. | Last date of submitting Objections & Suggestions | Monday, Date - 17/11/2025 To Monday, Date 24/11/2025 |
| 4 | Place where Objections & Suggestions are to be filed. | Panvel Muncipal Head office (Citizen Facility Center ), or concerned ward Office |

**Note:-** After considering all Objections & Suggestions, final notification of reservation will be published.

Place:- Panvel
Date: 08/11/2025

Sd/-
**Commissioner,**
**Panvel Municipal Corporation**

---

परिशिष्ट-५
**(सोडत व आरक्षण प्रसिद्धी-जाहीर सूचनेचा नमुना-मराठी)**
**पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५**
**आरक्षण सोडत कार्यक्रम**
**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनूसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणे, तसेच आरक्षणांचे प्रारूप प्रसिद्ध करून हरकती व सूचना मागविण्यासाठी खालील प्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | आरक्षण सोडत दिनांक | मंगळवार, दिनांक- ११ नोव्हेंबर, २०२५ सकाळी ११.०० वा.<br>स्थळ - आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल महानगरपालिका |
| २ | आरक्षणाचे प्रारूप प्रसिद्ध करण्याचा दिनांक | सोमवार दिनांक - १७ नोव्हेंबर २०२५ |
| ३ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | सोमवार, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ ते<br>सोमवार, २४ नोव्हेंबर, २०२५ (दुपारी ३.०० वाजेपर्यंत) |
| ४ | हरकती व सूचना दाखल करण्याचे ठिकाण | पनवेल महानगरपालिका मुख्यालय (नागरी सुविधा केंद्र) अथवा संबंधित प्रभाग कार्यालय येथे सादर कराव्यात. |

**टिप:- दाखल झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन आरक्षणाची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल.**

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- ०८/११/२०२५

सही/-
**आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

---


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१**
- **अकाउंटट पाहिजे- पात्रता** B com, Tally **अनुभव ५ वर्षे ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार - २५००० महिना** Contanct - 9823585321
- **''जन्नावार हॉस्पीटल'' अलिबागमध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे.** (Vacancy) Contact No : 7798034509
- **श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग**

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**




## राशीभविष्य

- **मेष** : अपेक्षित वार्ता कानी येईल. विवाहाची बोलणी सफल होतील. नव्या व्यवहारात सावधगिरी बाळगावी.
- **वृषभ** : ग्रहमानाची अनुकूलता राहील. महत्त्वाचे निर्णय तातडीनं घ्यावेत. विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळेल.
- **मिथुन** : साऱ्या गोष्टी मनाप्रमाणे घडतील. यंत्र, वाहनाचा वापर काळजीपूर्वक करावा. प्रकृती सांभाळावी.
- **कर्क** : स्थापत्य, कला क्षेत्रात संधी लाभेल. नव्या योजनांना गती मिळेल. प्रवासात पुरेशी काळजी घ्या.
- **सिंह** : उत्पन्नाच्या नव्या पर्यायांचा विचार होईल. सर्व गोष्टी उघड करू नका. मानसिक अस्वास्थ राहील.
- **कन्या** : नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक स्वीकारा. वरिष्ठांची तुमच्यावर मर्जी राहील. अपेक्षित भेटी होतील.
- **तूळ** : हितशत्रूंच्या कारवाया वाढीस लागतील. विचारपूर्वक पावलं उचलावीत. व्यवसायात अडचणी येतील.
- **वृश्चिक** : कौटुंबिक वाद-विवाद टाळावे. आर्थिक करार लाभदायक ठरतील. घर दुरूस्तीकडे लक्ष राहील.
- **धनु** : दिवसाच्या सुरूवातीस दिलासा मिळेल. हितचिंतकांचा सल्ला ध्यानी घ्यायला हवा. चिंता करू नये.
- **मकर** : प्रयत्नात सातत्य आणि चिकाटी ठेवावी. कलांचा गौरव होईल. छोटा-मोठा प्रवास घडणार आहे.
- **कुंभ** : अपत्यांबाबत चिंता राहील. कामाचा व्याप वाढल्याने धावपळ होईल. आध्यात्मिकतेकडे ओढा राहील.
- **मीन** : नातलगांच्या गाठीभेटी होतील. नव्या योजना मार्गी लागतील. स्थावर, वाहन सौख्य लाभणार आहे.

## दिनविशेष — ८ नोव्हेंबर

**१९१९** : ख्यातनाम लेखक, दिग्दर्शक, निर्माता, संगीतकार, अभिनेता पु. ल. देशपांडे यांचा जन्मदिवस.
**१९३९** : हिटलरच्या सभेत बॉंबस्फोट घडवून त्याचा खून करण्याचा प्रयत्न फसला. या स्फोटात सात माणसे ठार, साठ जखमी.
**१९७२** : अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी निक्सन यांची फेरनिवड.
**२०१३** : फिलिपिन्सला टायफून या चक्रीवादळाचा जोरदार तडाखा. सहा हजारांपेक्षाही अधिक लोक मृत्यूमुखी.

## आरोग्यमंत्र — चुकवू नका सकाळचा नाश्ता

सकाळी नाश्ता करण्याचं महत्त्व सगळ्यांना माहीत असलं, तरी कित्येकांची अवस्था, कळतं पण वळत नाही अशी असते. दररोज सकाळी न चुकता हेल्दी नाश्ता करणं म्हणजे निरोगी आयुष्याची सोय करून ठेवणं आहे. दिवसाची सुरुवात आपण योग्य आणि हेल्दी अशा नाश्त्यानं करायला हवी याबाबत कोणाचं दुमत नसतं. पण तरीही बरेच जण सकाळचा नाश्ता नीट घेत नाहीत. त्यामागचं एक कारण म्हणजे काही लोकांना या वेळेस भूकच लागत नाही. काही लोक कॅलरी नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि वेळच मिळत नाही, या सबबीवर नाश्ता करत नाहीत. नाश्ता केल्यानं दिवसभराचा मूड चांगला राहातो सकाळच्या हेल्दी नाश्त्यानं रक्तातील साखर नियंत्रणात राहाते. योग्य नाश्त्यानं वजन नियंत्रणात राहू शकतं; कारण त्यामुळे आपलं चयापचय सुधारत असतं. मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदय रोगापासून लांब राहाणं शक्य होतं. वजन नियंत्रणात राहिलं आणि रक्तातील साखरेचं व्यवस्थित चयापचय झालं, तर मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदय रोगापासून लांब राहाणं शक्य होतं. नाश्ता अती तेलकट तुपकट नसावा. उपमा, पोहे, इडली हा पारंपारिक नाश्ता नेहमीच उत्तम जास्त हेल्दी नाश्ता हवा असेल तर ओट्स, दलिया, सोया, सुजी, मोड आलेले मूग वाफवून खावेत किंवा त्यांचं धिरडं करावं. मिश्र पिठाचं धिरडंही स्वादिष्ट आणि हेल्दी नाश्ता आहे. नुसती फळं खाणं हा देखील एक उत्तम पर्याय आहे.



## सफर देशांची — फुलांचा देश नेदरलँड

नेदरलँड म्हणजे हॉलंड. पश्चिम युरोपमधला हा छोटासा देश जर्मनी आणि बेल्जियम यांच्या मध्ये वसला आहे. नेदरलँडच्या उत्तर आणि पश्चिमेला उत्तर समुद्र आहे. ॲमस्टरडॅम ही नेदरलँडची राजधानी. डच ही इथली प्रमुख भाषा आहे. युरो हे इथलं चलन आहे. उत्तर समुद्राने हॉलंडला नष्ट केलं असतं. पण इथल्या लोकांनी भराव घालून समुद्राला आटोक्यात ठेवलं. तसंच नद्यांनाही वेसण घातली. चारचाकी गाड्यांच्या तुलनेत इथे सायकलींची संख्या तीन पटींनी जास्त आहे. इथल्या पुरूषांची सरासरी उंची ६ फूट तर महिलांची सरासरी उंची ५.७ फूट इतकी असते. इथली कला, स्थापत्यकला तसंच फुलं पाहण्यासाठी जगभरातले लोक येतात. ट्युलिप्स इथे मोठ्या प्रमाणावर उमलतात. हॉलंडमध्ये बल्बचं उत्पादन मोठ्या प्रमाणावर होतं. या देशात युरोपियन संघातल्या कोणत्याही देशापेक्षा लोकसंख्येची घनता जास्त आहे. नेदरलँडने ऊर्जानिर्मितीसाठी पवनचक्क्यांवर भर दिला आहे. या देशात डोंगर नाहीत. नैसर्गिक सीमा नसल्याने शेजारी देशांनी नेदरलँडवर कायम आक्रमण केलं. या देशावर शतकानुशतकं परकीयांचंच राज्य होतं.

## पॅरेंटिंग — मुलांकडून करून घ्या योगासनं

वाढतं प्रदूषण, जंक फूडचं अतिसेवन, अभ्यास, वाढती स्पर्धा, गॅझेट्सचा वापर, व्यायामाचा अभाव, बैठी जीवनशैली यामुळे मुलांचं आरोग्य धोक्यात आलं आहे. वजन वाढण्यासोबतच चिडचिड होणं, मन एकाग्र न होणं अशा समस्या त्यांना भेडसावतात. योगासनांच्या माध्यमातून या समस्या सोडवता येतील. तुम्ही मुलांना योगासनं करायला प्रोत्साहन देऊ शकता. त्यांच्याकडून योगासनं करून घेऊ शकता. नियमित योगासनांमुळे मुलं तंदुरूस्त राहतील. मुलांच्या आणि तुमच्या वेळेनुसार योगासनांची निश्चित वेळ ठरवा. सकाळी किंवा संध्याकाळी मुलांकडून सोपी योगासनं करून घ्या. त्यांना योगाचे फायदे सांगा. मुलांना योगाच्या क्लासलाही घालता येईल. तुम्हीही मुलांसोबत योगा क्लासला जा. मुलांना योगाची गोडी लागावी यासाठी वेगवेगळ्या कल्पना लढवा.

(क्रमशः)

## पंचांग

**शनिवार, ८ नोव्हेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, कार्तिक कृ. ३/४, चंद्रराशी : वृषभ, नक्षत्र : मृगशीर्ष, योग : शिव, सूर्योदय ६. ४४, सूर्यास्त ६.००

## फॉरवर्डस

**खरीददार क़ोई कैसे मिलता हमें वहाँ...**

**झूठ क़ा बाज़ार था वो औऱ हम सच बेचनें निकलें थें...!**

## फॅशन पॅशन

✲ ग्रे रंगाचा स्वेटर, पांढरी रिपल्ड जीन्स आणि ग्रे शूज असं कॉम्बिनेशनही मस्त दिसेल.

✲ काही वेगळं ट्राय करायचं असेल तर लाल शर्ट, ब्लॅक जीन्स आणि ब्राउन लोफर्स हे कॉम्बिनेशनही भाव खाऊन जाईल.

✲ पोलका डॉटवाला स्वेटर मस्त दिसेल. त्यावर निळी रिपल्ड जीन्स आणि व्हाईट स्नीकर्स उठून दिसतील.

✲ ब्लॅक स्वेटरवर ब्लॅक जीन्स आणि ब्लॅक स्लीप ऑन्सही ट्राय करता येतील.

(क्रमशः)

## करिअरवाटा — लिगल आऊटसोर्सिंगचा हटके पर्याय

अलिकडच्या काळात इतर क्षेत्रांप्रमाणे कायद्याच्या क्षेत्रातही काही नव्या संकल्पना रूढ होत आहेत. त्याद्वारे कारकिर्दीच्या नव्या, हटक्या वाटा उपलब्ध होत आहेत. त्याविषयी जाणून घ्यायला हवं. विशेषतः या क्षेत्रात लिगल प्रोसेस आऊटसोर्सिंगद्वारे वकिली क्षेत्रातील तज्ज्ञ आपल्या क्लायंट्सना उत्तम सेवा देऊ शकतात. लिगल प्रोसेस आऊटसोर्सिंग ही प्रोजेक्ट ओरिएंटेड रोजगारवाट आहे. यामध्ये एखादी कंपनी सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करण्याची इत्थंभूत जबाबदारी एखाद्या वकिलाकडे अथवा वकिलांच्या एखाद्या गटाकडे देऊ शकते. या मार्गानं त्यांच्या कायदेशीर कामांमध्ये शिस्तबद्धता, अचूकता येते. काही वर्षांसाठी करार करून या संस्था एकमेकांच्या बरोबर काम करतात. लिगल रिसर्च, ग्राफ्टिंग, ॲनॅलिसिस, लिगल बॅकएंड ऑपरेशन्समध्ये एलपीओ महत्त्वाचं योगदान देतं. नवं तंत्रज्ञान, नव्या व्यावसायिक संकल्पनांद्वारे हे काम होत असल्यानं अचूकता वाढते. लिटिगेशन सपोर्ट, कॉर्पोरेट लिगल सपोर्ट, कॉंट्रॅक्ट मॅनेजमेंट, लिटिगेशन प्रॉपर्टी आदींमध्ये एलपीओची महत्त्वाची भूमिका असू शकते. अशा संस्थेत काम करण्यासाठी जागतिक पातळीवर खऱ्या उतरणाऱ्या बौद्धिक क्षमतेची गरज आहे. वेगळं करून दाखवण्याचा ध्यास असल्यास ही वाट चोखाळणं योग्य ठरेल.



## खेचाखेची — टेन्शन फ्री

टेन्शन फ्री रहायचं असेल तर हे तीन शब्द नेहमी लक्षात ठेवा

.
.
.
.

आपल्याला काय करायचं ?

## वेगळं काही

म्यानमारमधले पॅगोडा, स्तूप सोन्याने मढलेले आहेत. इथे पावलोपावली सोनेरी रंगाचे बौद्ध स्तूप पहायला मिळतील. मंदिर कोणतंही असलं तरी त्याला झळाळी असते ती सोन्याची. ११ ते १३ व्या शतकादरम्यान इथे पगान साम्राज्य होतं. याच दरम्यान म्यानमारमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार आणि प्रचार होत होता. अर्थात साधारण दोन हजार वर्षांपूर्वीच म्यानमारमध्ये बौद्ध धर्माने आपली पाळंमुळं रोवायला सुरूवात केली होती. म्यानमारच्या संस्कृतीत सोन्याला खूप महत्त्व आहे. इथल्या औषधांमध्येही सोन्याचा वापर केला जातो. इतकंच नाही तर इथल्या स्थानिक मद्यातही सोन्याचे अंश असतात. इथे काही अन्नपदार्थांमध्येही सोन्याचे तुकडे घातले जातात.

## भटकंती — बीचवरील भटकंतीपूर्वी...

सर्वसाधारणपणे डिसेंबर-जानेवारीचा कालावधी भटकंतीसाठी उत्तम मानला जातो. यात अनेकांना समुद्र किनारी फिरायला जायला आवडतं. समुद्रात डुंबायचं, वाळूत खेळायचं तर स्वीमिंग सूट, फ्लिप फ्लॉप, जास्तीचे कपडे असं साहित्य लागतं. पण यासोबत इतर काही वस्तूंची गरज भासते. या महत्त्वाच्या वस्तू कोणत्या जाणून घेऊ...



✲ ओल्या कपड्यांसाठी वेगळी बॅग ठेवा. पाण्यात खेळल्यावर स्विमिंग सूट आणि इतर कपडे ओले होतात. समुद्रावर वॉटर स्पोर्ट खेळताना कपडे ओले होतात. अशा वेळी अतिरिक्त बॅग असेल तर चेंज केल्यावर ओले कपडे ठेवणं सोपं जातं.

✲ मोकळ्या, स्वच्छ समुद्रकिनारी छत्रीखाली पडून रहायला खूप छान वाटतं. अशी मजा अनुभवणार असाल तर बीच कार्ट सोबत ठेवा. यामध्ये छत्री, खुर्ची, बीच बॅग आणि पाण्याची बाटली या वस्तू सहज बसतात. त्या कॅरी करणंही खूप सोपं जातं.

✲ समुद्रकिनारी उन्हाची तीव्रता जास्त असते. त्यामुळे सनस्क्रीन सोबत न्यायला विसरू नका. बाहेर पडताना चेहऱ्यावर सनस्क्रीन चोपडा. यामुळे त्वचा टॅन होणार नाही. पाण्यात जातानाही अंगाला सनस्क्रीन लावा.

## सुडोकू २५


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ५ | | ७ | | २ | | | ८ |
| २ | ७ | | ३ | ४ | ८ | ५ | | १ |
| | १ | ८ | ९ | | ५ | | | |
| ७ | | | | | | २ | १ | ६ |
| | | | | ३ | | | | |
| ६ | ९ | १ | | | | | | ५ |
| | | | ४ | | ३ | १ | ५ | |
| ५ | | ४ | १ | ९ | ७ | | २ | ३ |
| १ | | | ५ | | ६ | | ४ | ९ |

टीप -
✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू २४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ८ | ४ | २ | ९ | १ | ५ | ७ | ३ |
| ३ | ९ | १ | ६ | ५ | ७ | २ | ८ | ४ |
| २ | ५ | ७ | ८ | ३ | ४ | ६ | १ | ९ |
| ४ | ६ | २ | ७ | १ | ५ | ९ | ३ | ८ |
| ९ | ७ | ५ | ४ | ८ | ३ | १ | ६ | २ |
| १ | ३ | ८ | ९ | ६ | २ | ७ | ४ | ५ |
| ५ | ४ | ९ | ३ | ७ | ६ | ८ | २ | १ |
| ७ | १ | ३ | ५ | २ | ८ | ४ | ९ | ६ |
| ८ | २ | ६ | १ | ४ | ९ | ३ | ५ | ७ |

## शब्दकोडे क्रमांक २५



**आडवे शब्द :-**
१) कसरत
३) दिमाख, ऐट
५) वंशाचा नाश
९) चांदणी
१०) मनाला बसलेला धक्का
११) तालुक्याचे वसुलीचे काम, महत्व
१३) व्योम, नभ
१५) वाढलेला व्याप
१६) लाकूड छिलण्याचे एक हत्यार
१७) शत्रू
१८) मुलाची किंवा मुलीची मुलगी
१९) लुच्चा, कपटी
२१) तसराळे
२३) वालुकामय प्रदेश
२५) गाय
२७) लाट, झटका, हुक्की
३०) सूट
३२) साप्ताहिक सुट्टीचा दिवस
३३) जन्म-मृत्यू
३६) तारका
३७) जिनसांची यादी
३८) प्रश्न
४०) पृथ्वी
४२) बाण
४४) उंबरठा
४५) अहंकार
४६) विजयाचा नामघोष
४९) ओटा, कट्टा
५०) बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
५१) उंटाचा चालक
५३) रात्रभर
५५) केर
५७) परमेश्वर
५८) चक्र
५९) वितरण
६१) चंद्र
६३) फळाचे साल
६४) तुषार, ओसाड

**उभे शब्द :-**
१) छंद, आवड, अभ्यास
२) चिंतन
३) मित्रांचा समुदाय
४) आश्रय
५) मुद्दाम काढलेली खोडी
६) क्षमाशील
७) मृत्युदेवता
८) खेद, दुःख
१२) मागे लागलेले शुक्लकाष्ठ
१४) मोगऱ्याची माळ
१८) अपशकुन
२०) पायविहीर
२१) चाकरमानी
२२) समशेर, करवाल
२४) नमस्कार
२६) अंतरिक्ष
२८) विरोध, प्रतिबंध
२९) यज्ञ
३०) उत्सवाचा दिवस
३१) वल्लरी
३३) धरण, तळे, विहीर इ.
३४) व्यापारी फायदा
३५) रसाळ
३९) त्वरित
४१) समुद्रकिनारा
४३) रात्री फिरणारा (चोर, घुबड इ.)
४६) जास्वंद
४७) शरीर
४८) दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
४९) मर्यादा, सीमा
५०) झाडाभोवतीचा कट्टा
५१) सज्जन, प्रामाणिक
५२) जीभ, बोलणे
५४) भेग, चीर
५६) राजाचे, शासकीय
५७) राष्ट्र
६०) स्वच्छ
६२) पुष्कळ.

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त

हिंदी चित्रपटसृष्टींतील ख्यातनाम अभिनेत्री व नृत्यांगना मधुमती यांचे १५ ऑक्टोबर २०२५ रोजी मुंबईत त्यांच्या वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाल्यामुळे हिंदी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली. मधुमती यांनी मराठी, हिंदी, पंजाबी, भोजपुरी चित्रपटांतून भूमिका केल्या. त्यांच्या नृत्यांतील प्राविण्यामुळे अनेक चित्रपटांतील गाणी त्यांनी आपल्या नृत्याने सजविली. दिसायला त्या नर्तकी हेलेनसारख्या असल्याने त्यांना नेहमी हेलनची बहिण समजण्यांत येत असे. मधुमती यांचे नृत्याचे प्रशिक्षण देणारे एक विद्यालय मुंबईतील जुहू येथे होते. त्यांत शिक्षण घेणाऱ्या कलाकारांमध्ये अक्षयकुमार, विंदू दारासिंग, चंकी पांडे, अमृता सिंग, फराह, सोनम, जॅकी श्रॉफ यांचा समावेश होता.

रंगबहार

शरद कोरडे

## नृत्यांगना मधुमती



मधुमती यांचा जन्म ३० मे १९४१ मध्ये मुंबईजवळील ठाणे या शहरांत झाला. हुतोशीदारा रिपोर्टर नामक पारसी कुटूंबात जन्मलेल्या या मुलीचे नांव पुढे 'मधुमती' असे ठेवण्यांत आले. लहानपणापासून नृत्याची आवड असल्याने तिच्या आईवडिलांनी त्यांना भरतनाट्यम, कथ्थक, मणीपुरी व कथकल्ली नृत्याचे शास्त्रीय शिक्षण दिले.

नृत्याचे सखोल प्रशिक्षण घेतल्यानंतर वयाच्या पंधराव्यावर्षी त्यांनी स्वत:ची नृत्यशाळा सुरु केली व विद्यार्थ्यांना नृत्य शिकविण्यास सुरुवात केली. त्यांचे वडील खानसाहेब दारा बेहरामजी रिपोर्टर हे नामवंत न्यायाधीश होते. जेव्हा चित्रपट निर्माते व दिग्दर्शक धीरुभाई देसाई यांनी मधुमतीला चित्रपटांत काम करण्याची ऑफर दिली, तेव्हा खानसाहेबांनी त्यांनी प्रखर विरोध केला. पण पीरुभाईंनी त्यांची समजूत काढून मधुमतीची सारी जबाबदारी व पालकत्व स्वीकारण्याची तयारी दर्शविली तेव्हाच खानसाहेबांनी ती केवळ नृत्याशी संबंधित असलेल्या भूमिकाच करील या अटीवर त्यांना परवानगी दिली. मधुमतीने प्रथम चंदुलाल शहा यांच्या 'हरिश्चंद्र' या मराठी चित्रपटांत १९५९ मध्ये भूमिका केली. त्यावेळी चंदूलाल शहा यांनी या 'हुतोक्षी' नामक पारसी मुलीचे चित्रपटांसाठी 'मधुमती' हे नवीन नाव धारण करण्याची सूचना केली व ती मान्य करण्यांत आली. पुढे चित्रपटाचे काही चित्रीकरण झाल्यावर हा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच थांबविण्यांत आला. मात्र त्यानंतर आलेल्या १९६० मधील 'जमिनके तारे' या चंदूलाल शहा निर्मित चित्रपटांत मधुमतीला हनी इराणीच्या क्रूर सावत्र आईची भूमिका देण्यांत आली. हाच मधुमती पहिला चित्रपट समजला जातो. या चित्रपटांत मोतीलाल, आगा, मा. भगवान, अचला सहदेव यांच्या भूमिका होत्या. पुढे मधुमती यांनी कमाल अमरोही यांच्या 'रसिझा सुलतान' (१९६१), 'ताजमहाल' १९६३, राजकपूरचा 'दुल्ला दुल्हन'१९६४, 'सिकंदरे आझम' १९६५, 'चांद और सुरज' १९६५, 'निंद हमारी ख्वाब तुम्हारे', १९६६, 'ये रात फिर ना आयेगी'१९६६, 'स्मगलर' १९६६, आदी चित्रपटांतील गाण्यांवर नृत्ये केली.

राजकपूरच्या आर.के. फिल्ममध्ये मनहर दिपक नावांचा नृत्य दिग्दर्शक होता, ज्याने आर.के.च्या 'जागते रहो' या चित्रपटांतील 'देखी मै झूट बोलिया' या गाण्यावर पंजाबी नृत्य केले होते व बी.आर.फिल्म्सच्या 'नया दौर' या चित्रपटांत 'ये देश है वीर जवानोंका' या गाण्यामध्ये नृत्य केले होते. मधुमती यांनी मनहर यांच्यासोबत सहाय्यक नृत्य दिग्दर्शिकेचे काम केले होते. पुढे हा मनहर दिपक सुनिल दत्त यांच्या 'अजंठा आर्टस्' या चित्रपटसंस्थेत काम करीत होता. सुनिल दत्त यांच्या खास विश्वासांतला माणूस होता. नर्गिस दत्त त्याला आपला भाऊ मानित असत. मनहर यांना चार मुले होती. त्यांची पत्नी १९६४ मध्ये मृत्यू पावली. त्यामुळे संकटांत सापडलेल्या मनहरला मधुमतीने खूप मदत केली. नर्गिस दत्त यांनी मधुमतीला मनहर यांच्याशी विवाह करण्याचा सल्ला दिला व 'मनहर माणूस म्हणून खूप चांगला कलाकार आहे, तू त्याच्या पाठीशी राहिलीस तर त्याचे जीवन मार्गी लागेल. तू विचार कर व निर्णय घे. असे सांगितल्यामुळे मधुमतीने मनहर बरोबर लग्न करण्याचा निर्णय आपल्या आईवडिलांचा विरोध असतानाही घेतला. १९६५ मध्ये दोघांनी विवाह केला. मधुमतीला आपले जीवन मनहरसा समर्पित केले. त्याच्या मुलांना आपल्या सावत्र आईमुळे परकेपणा वाटू नये म्हणून स्वत:ला मूल होऊ न देण्याचा तिने ठाम निर्णय घेतला. त्यावेळी मधुमती यांचे वय केवळ १९ वर्षाचे होते.

त्यानंतर मधुमती यांनी राज खोसला यांच्या 'अनिता' १९६७, 'सुहागरात' १९६८, 'मेरे हुजर' १९६८, राजेंद्रकुमारचा 'झुक गया आसमान १९६८, रामानंद सागर यांचा 'आँखे' १९६८, जितेंद्रचा 'जबाब' व 'रुम तेरा मस्ताना' एल.बी.लछमन यांचा 'अन्नदाता', धर्मेंद्रचा 'चरस' आदी चित्रपटांतून कामे केली. या चित्रपटांतील त्यांची नृत्ये खूप गाजली होती. मनमोहन देसाई यांच्या 'अमर अकबर अँथनी'या चित्रपटांत त्यांनी मुक्री यांच्या प्रेयसीची बिजलीबाईची भूमिका केली होती. मलिकचंद कोचर निर्मित व विनोदकुमार दिग्दर्शित 'मेरे हुजर या चित्रपटांत 'झनक झनक तेरी बाजे पायलीयाँ' या गाण्यात राजकुमार सोबत त्यांनी बहारदार नृत्य केले होते. अजय साहनीच्या 'पवित्र पाणी' चित्रपटांतील 'ले दे सैय्या ओढणी पंजाबी शिलेदार' या गाण्यावर तर ओ.पी.रल्हन निर्मित 'तलाश' या चित्रपटांतील 'तेरे नैना तलाश करे जीसे' या गाण्यांत शाहू मोडक वाद्य वाजवून गात असतो व त्या तालावर मधुमती नाचत असते. 'मेरे हुजूर'मध्ये राजकुमार 'झनक झनक तोरी बाजे पायलियाँ' गाणे म्हणत असतो व मधुमती व लक्ष्मीछाया त्याच्यासोबत नाचत असतात. याशिवाय 'अन्नदाता'मध्ये 'ओ मेरी प्राणसजनी चंपावती आजा' या गाण्यांत नृत्यगुरु गोपीकृष्णसोबत मधुमती नायक अनिल धवन व जया भादुरी यांच्यासमोर नृत्य करीत असतात. मधुमतीने 'हमराज' मध्ये सुनील दत्त 'ना मूह छुपाके जीयो और ना सर झुकाके जीयो' हे गाणे गात असताना मधुमती नृत्य करताना दाखविली आहे. नृत्यागना हेलेन सोबत मधुमतीने 'हुजुरेवाले जो होगी इजाजत' या गाण्यावर नृत्य केले होते. मधुमती व तिचे पती मनहर दिपक यांनी १९८० मध्ये 'सावली प्रेमाची' या मराठी चित्रपटाची निर्मिती केली होती, ज्यामध्ये स्वत: मधुमती, विक्रम गोखले, श्रीराम लागू व क्रिकेटर सुनिल गावसकर यांनी भूमिका केल्या होत्या. या चित्रपटाचे दिग्दर्शन दत्ता केशव यांनी केले होते. रामानंद सागर यांचा १९७६ मधील 'चरस' हा मधुमतीचा बहुदा शेवटचा हिंदी चित्रपट. या चित्रपटांत धर्मेंद्र, हेमा मालिनी, अजित, अरुणा ईराणी, असरानी, सुजीत कुमार यांच्या भूमिका होत्या. यात लैला नामक नृत्यांगनेचे काम मधुमती यांनी केले होते. सुनिल दत्त जेव्हा आपल्या अजंठा आर्टस् कंपनीतर्फे सीमाभागांतील सैनिकांच्या मनोरंजनासाठी कार्यक्रम करीत असे, त्यावेळी मधुमतीही त्या चमूसोबत जाऊन आपले नृत्याचे कार्यक्रम करुन सीमेवरील जवानांचे मनोरंजन करीत असे. १९७६ नंतर मधुमतीने चित्रपटसृष्टींतून निवृत्ती घेऊन आपला सारा वेळ नृत्यशाळेसाठी दिला. त्यावेळी या नृत्यशाळेत अनेक नवीन अभिनेते व अभिनेत्री त्यांच्याकडे नृत्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी येत असत. त्यांत दारासिंगचा मुलगा बिंदू दारासिंग, अक्षय कुमार, चंकी पांडे, जॅकी श्रॉफ, अमृतसिंग, फराह व सोनम यांचा समावेश होता. १९ ऑक्टोबरला जेव्हा मधुमती यांच्या निधनाची बातमी आली त्यावेळी सर्वप्रथम बिंदु दारासिंग यांनी आपल्या भावना प्रकट केल्या. 'मधुमती आँटी ह्या केवळ एक शिक्षिका नव्हत्या. त्या कुटूंबातील सदृश्य व मार्गदर्शक होत्या. त्यांनी चित्रपटांतील अनेक कलाकारांना नृत्य शिकवले होते व स्वत:ही अनेक चित्रपटांतून कामे केली होती. व चित्रपटसृष्टींत त्यांचे खूप नाव होते. त्यानंतर अक्षयकुमार याने मधुमती या माझ्या पहिल्या व कायमच्या नृत्यगुरु होत्या. नृत्याबाबत मी जे काही शिकलो व जे काही मला माहिती आहे ते सर्व त्यांच्या चरणी शिकलो. मधुमतीजींच्या प्रत्येक अदा व एक्स्प्रेशन्स व त्यांची आठवण अखेरपर्यंत माझ्यासोबत असेल असे म्हणत त्याने त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. मधुमती यांचे पती मनहर दिपक यांचा मृत्यू सन २००६ मध्येच झाला. क्रिकेट समालोचक व अंपायर पिलू रिपोर्टर हा मधुमती यांचा सखखा भाऊ होता. ●●

## विवाह सोहळ्यांचे बदलते स्वरूप; योग्य की अयोग्य ?

जगन घाणेकर

तुळशी विवाह लागले की लगीनसराई सुरु होते. काही दिवसांतच आजूबाजूला सनई चौघड्यांचे सूर कानी पडू लागतील. हिंदू धर्मात १६ संस्कारांपैकी पाणिग्रहण म्हणजेच विवाह संस्काराला अनन्यसाधारण महत्व आहे. ब्रह्मचर्याश्रमांतून गृहस्थाश्रमाला सुरुवात करण्यापूर्वी जो संस्कार केला जात असे त्यालाच पूर्वी विवाह संस्कार म्हटले जात असे. आजही गृहस्थाश्रमाला म्हणजेच संसाराला सुरुवात करण्यातील आरंभीचा टप्पा म्हणून विवाह संस्काराचे महत्व अबाधित आहे. देव, अग्नी आणि ब्राह्मण यांच्या साक्षीने हा विवाह संस्कार पार पडतो. विवाह संस्कारामध्ये श्री गणेश पूजन, सीमांतपूजन, मधुपर्कपूजन, गौरीहरपूजन, कन्यादान, मंगळसूत्र बंधन, अक्षतारोपण, मंगलाष्टके, विवाह होम, पाणिग्रहण, लाजाहोम, सप्तपदी, गर्भाधान असे अनेक विधी असतात. या प्रत्येक विधीच्या वेळी म्हटले जाणारे मंत्र, केल्या जाणाऱ्या कृती यामागे ऋषीमुनींचा संकल्प कार्यरत असतो, त्यामुळे या विधी भावपूर्ण होणे अत्यंत महत्वाचे असते. विवाह संस्कार म्हणजे उभयतांना केवळ सहचर्य करण्याची अनुमती देणारा संस्कार नसून भावी जीवनात धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांची सांगड घालण्याची शिकवण देणारा संस्कार आहे. विवाहसंस्कारात नियोजित विधींना अधिक महत्व देण्यात आले आहे. सध्याच्या घडीला विवाहातील धार्मिक विधींपेक्षा अन्य गोष्टींना आणि कृत्रिम अवडंबराला अधिक महत्व प्राप्त होऊ लागले आहे. विवाह संस्कारात अनेक अनिष्ट बाबींचा शिरकाव झाला आहे, ज्यामुळे विवाहातील मुख्य विधींनाच बगल दिली जात आहे. विवाहासारख्या धार्मिक कार्यक्रमाचाही इव्हेन्ट होऊ लागला आहे, ज्यामुळे त्यातील सात्विकताच लोप पावू लागली आहे.



विवाह जुळवण्यासाठी हुंडा देणे आणि घेणे दोन्हीही भारतीय दंडविधानानुसार गंभीर गुन्हे आहेत. तरीही देशातील अनेक भागांत आजही हुंडा दिला आणि घेतला जात आहे. या हुंड्याच्या लोभामुळे दरवर्षी कितीतरी नववधूंचा छळ केला जातो. त्यापैकी कितीतरी जणी या छळाला कंटाळून आत्महत्येसारखा टोकाचा मार्ग स्वीकारतात. व्हाट्स अप आणि टेलिग्रामच्या दुनियेतेतही आज महागड्या लग्नपत्रिका छापल्या जातात. लग्न पार पडल्यानंतर खरेतर पत्रिकेला काहीच महत्व उरत नाही, तरीही केवळ आपली पत दाखवण्यासाठी काही ठिकाणी महागड्या पत्रिका छापल्या जातात. विवाहाचे बॅनर्स आणि होर्डिंग्स लावण्याची पद्धत गेल्या काही वर्षांपासून रूढ होत चालली असून यावरही अवास्तव खर्च केला जात आहे. विवाहासाठी निश्चित केलेल्या मुहूर्तावर विवाह लागणे, अत्यंत महत्वाचे आहे, पुरोहितांकडून मुहूर्ताच्या वेळी वधू-वरांना आशीर्वाद देण्यासाठी देवतांना उपस्थित राहण्यास आवाहन केले जात असल्याने मुहूर्ताला देवता सूक्ष्मरूपाने येतात, असा लोकांचा समज आहे. त्यामुळे पूर्वी मुहूर्तावर विवाह लागण्यासाठी आधीपासूनच सर्व सिद्धता केली जात असे. आजमितीला विवाहाच्या मुहूर्तापेक्षा जवळच्या नातेवाईकांची उपस्थिती आणि वधू-वरांचा मेक अप यांना अधिक महत्व दिले जाते. त्यासाठी विवाह रोखून धरला जातो. अनेक जण लग्न लागल्यानंतर स्वागत समारंभाची आणि भोजनाची वेळ पाळून विवाहाला उपस्थित राहतात. पूर्वी लग्नाची मंगलाष्टके म्हणण्यात चढाओढ लागत असे. एक मंगलाष्टक संपले कि दुसरे मंगलाष्टक म्हणण्याची संधी साधण्यासाठी उपस्थितांकडून धडपड केली जात असे. हल्ली काही विवाह सोहळ्यांना तर केवळ मंगलाष्टके म्हणण्यासाठी वाद्यवृंद आणि गायक बोलावले जातात. त्यासाठी वेगळा खर्च केला जातो. वधूवरांनी एकमेकांना पुष्पहार घालून झाल्यावर त्यांच्या मस्तकावर अक्षता वाहण्याची पद्धत आहे; मात्र अनेक जणांना याविषयी पुरेशी माहिती नसल्याने मंगलाष्टके म्हणतानाच अक्षता उधळल्या जातात. परिणामी अक्षता वधू वरांच्या मस्तकावर न पडता कार्यक्रमस्थळी सर्वत्र विखुरल्या जातात. अशा ठिकाणी वावरताना त्या पायाखाली येतात. यामध्ये अक्षतांची नासाडीही होते आणि अवमानही होतो. वधू-वरांनी एकमेकांना पुष्पहार घालणे हा विवाहातील एक महत्वाचा क्षण असतो. त्यालाही मनोरंजक करण्यासाठी हल्ली वधू-वरांना उगाचच उंचावर उचलून सहजपणे हार न घालू न देण्यासाठी आटापिटा केला जातो. ज्यामुळे त्यातील धार्मिकता निघून जाऊन तो केवळ मनोरंजनाचा क्षण बनतो. स्वागत समारंभासाठी परिधान करण्यात येणारे हिंदू वधु-वरांचे कपडेही हल्ली पाश्चात्य पद्धतीने शिवण्याची प्रथा पडू लागली आहे. त्यामुळे सकृतदर्शनी विवाह ख्रिश्चनांचा आहे की हिंदूंचा हा उपस्थितांनाही प्रश्न पडतो. हल्ली विवाह विधी पार पडल्यानंतर सर्वांना एकत्र गोळा करून त्यांच्या समक्ष वधु-वरांकडून महागडा केक कापला जातो. हिंदू धर्मात शिजलेल्या अन्नपदार्थांवर सूरी फिरवणे वर्ज्य मानले जाते. त्यामुळे विवाहासारख्या सात्विक कार्यक्रमामध्ये अशी असात्त्विक कृती करणे अयोग्यच म्हणावे लागेल. हल्ली लग्नाच्या सिद्धतेसाठी अधिक वेळ द्यायला नको म्हणून इव्हेन्ट मॅनेजमेंट कंपनीला लाखो रुपये देऊन कंत्राट दिले जाते. ही कंपनी विवाहातील धार्मिक विधींना अधिक महत्व न देता सोहळा अधिकाधिक मनोरंजक आणि आकर्षक कसा होईल याकडे अधिक लक्ष देतात. त्यामुळे अनेक ठिकाणी धार्मिक विधी चालू असताना दुसरीकडे सिनेसंगीत चालू असते. त्यामुळे उपस्थितांचे अधिक लक्ष त्याकडेच जाते. विवाह विधी सुरु असताना जी शांतता अपेक्षित असते ती न पाळता सर्वत्र गोंगाटाचे वातावरण असते. आलेल्या पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी याच कंपन्यांकडून वधु-वरांचे आणि त्यांच्या नातेवाईकांचे सिनेगीतांवर नृत्य बसवले जातात, विवाह विधीनंतर त्याचे विशेष सादरीकरण असते. स्टेजवर लोकांसमोर नाचायचे आहे, तर सर्व व्यवस्थितच व्हायला हवे यासाठी अनेक जवळचे नातेवाईक लग्नाच्या तयारीत हातभार लावण्यापेक्षा या नृत्याच्या तयारीतच अधिक व्यस्त असतात. विवाह विधी हा वर आणि वधु या दोहोंच्या नातेवाईकांसाठी आनंदाचा विधी असतो, त्यामुळे विवाहाप्रित्यर्थ उपस्थितांना प्रीती भोजन दिले जाते. हे भोजन वधु वरांच्या कुटुंबाच्या ऐपतीनुसार दिले जायला हवे; मात्र इथेही आत्मप्रौढीसाठी भोजनात नको तितक्या पदार्थांची रेलचेल पाहायला मिळते. काही ठिकाणी भोजनासाठी शाकाहार आणि मांसाहार असे वेगवेगळे कक्ष उभारले जातात. याशिवाय चायनीज, इटालियन पदार्थांचे कक्ष उभारण्याचीही पद्धत हल्ली रूढ होत चालली आहे. शहरी भागांत भोजनासाठी सर्रास 'बुफे' पद्धत अवलंबली जाते, ज्यामध्ये आपले ताट स्वतःहून वाढून घ्यायचे असते. बऱ्याचदा उपस्थित मंडळी आपल्या भुकेचा अंदाज न घेता केवळ समोर ठेवले आहेत म्हणून नको तितके पदार्थ ताटात वाढून घेतात आणि संपवता न आल्याने त्यातील काही पदार्थ ताटातच अर्धवट खाऊन सोडून देतात. दरवर्षी लगीन सराईमध्ये असे कितीतरी टन अन्न केवळ ताटात अर्धवट सोडून दिल्यामुळे वाया जाते. आज भारतात असाही वर्ग आहे ज्यांना प्रतिदिन २ वेळचे पोटभर अन्न मिळणे दुरापास्त आहे. अशा भारतात जेवण ताटात सोडून वाया घालवणे म्हणजे अन्नदेवतेचा अवमान नव्हे का? अशा प्रसंगी भोजनाकरीता भारतीय पंगत अधिक योग्य ठरते; मात्र तिलाच आज 'आऊटडेटेड' ठरवण्यात आले आहे. विवाहानंतर मंजुळ आवाजाच्या पारंपरिक वाद्यांनीशी वधु -वरांची वरात काढण्याची प्रथा लोप पावत चालली आहे. हल्ली वरातीसाठी डीजे, बेण्डबाजा आणि कानठळ्या बसवणाऱ्या फटाक्यांच्या आतषबाजीसाठी हजारो रुपये उधळले जातात. याशिवाय मित्र मंडळींना मद्याच्या आणि मांसाहाराच्या मेजवान्या देण्यासाठी खर्च होतो तो वेगळाच. विवाह सोहळा म्हणजे खरेतर वधु-वरांचा उत्सव, मात्र त्यातही हल्ली नातेवाईकांचे मानापमान नाट्य पाहायला मिळते. वर किंवा वधूच्या आईवडिलांनी मनासारखे कपडे किंवा दागिने घेतले नाहीत, पत्रिकेत नाव टाकले नाही म्हणून ऐन लग्नातही नातेवाईकांचे रुसवे फुगवे सुरु असतात. यांचा मान राखण्यासाठी पुन्हा वेगळा खर्च केला जातो. ●●

## रंगशारदा विजया मेहता

श्रीराम शेटये



गेल्या कित्येक वर्षांपासून-दशकांपासून मराठी रंगभूमीवर आपल्या तेजाने तळपत असलेल्या मराठी रंगभूमीच्या अध्वर्यू - विजया मेहता

विजयाबाई या पूर्वाश्रमीच्या विजया जयवंत होत. लहानपणापासून घरात - जवळच्याच नात्यांतील नलिनी जयवंत, शोभना समर्थ व त्यांच्या कन्यका नूतन-तनुजा यांच्यामुळे - मोहमयी हिंदी चित्रसृष्टीशी जवळचा संबंध येऊन देखील त्यांची भावनिक जवळीक मात्र सतत मराठी रंगसृष्टीशी राहिली. पुढे दुर्गा खोटे यांचा मुलगा हरीन खोटे यांच्याशी विवाह झाल्यावर देखील हिंदी चित्रपटांच्या मायाजालामध्ये न गुरफटण्याचा निर्णय त्यांनी कायम ठेवला हे पहाता 'आपल्या मराठी रंगभूमीचे नशीब बलवत्तर' असेच म्हणावयास हवे.

साठ-सत्तरच्या दशकांत तेंडुलकर-खानोलकर-एलकुंचवार व इतर समकालीन संवेदनक्षम नाटककारांची, नाट्यक्षेत्रातील तत्कालीन प्रचलित रुढींना सुरुंग लावून आणि प्रदृमाण मानल्या गेलेल्या प्रस्थापित संकेतांची चौकट नाकारुन वा प्रसंगी धुडकावून देऊन प्रयोगशीलतेला प्राधान्य देणारी, नवनवीन नाटके-एकांकिका 'रंगायन' वा अन्य माध्यमांतून मंचावर आणण्यात बाईंचा आणि त्यांच्या जोडीने अरविंद देशपांडे-सुलभा देशपांडे-माधव वाटवे-कमलाकर सारंग-श्रीराम लागू या त्यांच्या सहकाऱ्यांचा अत्यंत मोलाचा वाटा होता. 'रंगायन' संस्था - व त्या अनुषंगाने एक चोखंदळ प्रेक्षकवर्ग सुद्धा - उभारुन प्रायोगिक एकांकिका-नाटकांची चळवळ त्या काळात त्यांनी दहा-बारा वर्षे जोमाने चालवली. सतत काहीतरी नवीन करण्याचा-देण्याचा ध्यास घेतलेल्या बाई प्रायोगिक-समांतर रंगभूमीने त्या काळात अक्षरशः झपाटल्या गेल्या. मात्र पुढे दुर्दैवाने जेव्हा 'रंगायन' अंतर्गत बेबनाव-मतभेदांमुळे फुटली तेव्हा प्रायोगिकतेच्या चौकटीतच कायम रहाण्याच्या विचारांचे गाठोडे-ओझे उराशी न बाळगता व्यावसायिक - किंवा, त्यांच्याच शब्दात सांगायचं झालं तर, लोकमान्य - रंगभूमीवर सुद्धा तितक्याच ताकदीने व उत्साहाने त्या परत कार्यरत झाल्या व स्थिरावल्या. वैयक्तिक जीवनात सुध्दा, लग्नानंतर अवघ्या पाच वर्षांतच - पदरात दोन लहान मुलं असताना - पतिनिधनाचा प्रचंड आघात सोसून व त्यामुळे आयुष्याला मिळालेली विलक्षण कलाटणी पचवून, बाई न खचता कंबर कसून उभ्या राहिल्या.

'श्रीमंत', 'मादी', 'एक शून्य बाजीराव', 'अजब न्याय वर्तुळाचा', 'पुरुष', 'बॅरिस्टर', 'महासागर', 'हमीदाबाईची कोठी', 'वाडा चिरेबंदी', 'हयवदन', 'सावित्री' अशी अनेक लक्षणीय नाटके-एकांकिका तसेच 'पेस्तनजी', 'रावसाहेब', 'स्मृतिचित्रे' अशा अनेक लक्षवेधी चित्रकृती बाईंच्या रेखीव-बांधीव दिग्दर्शनाने फुलल्या-फुलवल्या. केवळ अर्थकारणाच्या - म्हणजेच 'गल्ल्याच्या गणिता'च्या - दृष्टीने पाहिल्यास यातील बरीचशी चांगलीच तरली-तरारली-फोफावली असली तरी क्वचित काही बुडाली-फसली देखील. मात्र यातील प्रत्येक कृतीवर आपला असा एक वैशिष्ठ्यपूर्ण कलात्म ठसा उमटवून दिग्दर्शनाच्या क्षेत्रात आपले निर्विवाद वर्चस्व बाईंनी निश्चितच प्रस्थापित केले. बाईंनी स्वतःची अशी एक स्वतंत्र पठडी वा घराणं निर्माण केलं याविषयी दुमत असू नये. मराठी नाट्यक्षेत्रातील आजचे अनेक आघाडीचे व प्रथितयश कलाकार त्या काळात बाईंच्या हाताखाली हळूहळू जडत-घडत गेले. विक्रम गोखले, उषा नाडकर्णी, नाना पाटेकर, रिमा लागू, भक्ती बर्वे, प्रदीप वेलणकर, सुकन्या कुलकर्णी, उदय म्हैसकर, नीना कुलकर्णी अशा अनेक अभिनयनिपुण कलाकारांची एक अख्खी नवीकोरी फळी त्यांच्या कुशल दिग्दर्शकीय हातातून तयार झाली.

नाटकाची संहिता व तिचा आशय-आकृतीबंध-शैली-मांडणी-संघर्ष-गुंता-अवकाश-पट या साऱ्यांचा साकल्याने पूर्ण अभ्यास केल्याशिवाय नाटकाच्या तालमींचा विचार सुद्धा करु नये असे त्यांचे स्पष्ट मत असे. भूमिकेचा संपूर्ण पोत-गाभा-बेअरिंग मनामध्ये आतून सापडल्याशिवाय व त्या भूमिकेचे विविध सारे कंगोरे-धागे-पदर-स्तर-छटा पूर्णपणे समजावून-चाचपून घेऊन पूर्वतयारी झाल्याखेरीज नाटकातील अगदी दुय्यम भूमिका करणाऱ्या कलाकाराने सुद्धा रंगमंचावर - पहिल्यावहिल्या तालमीसाठी देखील - पाऊल टाकता कामा नये हा त्यांचा नियमवजा खाक्या वा शिरस्ता नाट्यप्रयोग एकसंध-बंदिस्त होण्यास व विस्कळीत-खंडित न होण्यास मदत करतो. कलाकाराने केवळ सवंग लोकप्रियतेसाठी वा हमखास टाळ्या मिळवण्यासाठी जिवाचा आटापिटा करण्यापेक्षा अथवा रोजचा रतीब घातल्यासारखा अभिनयाच्या निव्वळ 'जिलब्या' पाडण्यापेक्षा प्रत्येक भूमिका स्वतःशी ताडून-तपासून पाहून व त्या भूमिकेमागील लेखकाच्या-दिग्दर्शकाच्या दृष्टिकोनाशी-विचारांशी एकनिष्ठ राहून काम करण्यावर भर द्यावा याकडे त्यांचा कल दिसून येतो. नटाने आपली बलस्थाने आणि मर्यादा दोन्ही नेमकी ओळखली तर भूमिका समजून-भिनवून घेण्याच्या प्रक्रियेस त्याची मदतच होते असा साधासरळ पण महत्वाचा विचार त्यांनी मांडला. त्यांच्या अनेक नाटकांतील कलाकारांना बेगडी-भडक-आत्मकेंद्री - किंवा, बाईंच्या शब्दात, 'टरफली' - अभिनयापासून दूर ठेवून त्यांच्याकडून सहजसुंदर-उठावदार अभिनय करवून घेण्यास व नैसर्गिकरीत्या भूमिका सादर होण्यास ही त्यांची शिस्त व मेहनतच कारणीभूत झाल्याचे सातत्याने दिसते.

बऱ्याचदा बाईंमधील कसलेली अभिनेत्री त्यांच्यातील दिग्दर्शिकेवर चक्क मात करताना दिसत असे. 'संध्याछाया'मधील परदेशस्थ पुत्राच्या विरहाने झुरणारी प्रेमळ कुटुंबवत्सल नानी असो वा 'बॅरिस्टर'मधील केशवपन केलेली-आलवण नेसलेली-भावनेच्या कोंडमाऱ्याने घुसमटणारी मावशी असो किंवा 'हमीदाबाईची कोठी'मधील कोठी-संस्कृतीतील गायकी परंपरेचा ऱ्हास असहाय्यपणे पहाणारी हमीदाबाई असो अथवा 'वाडा चिरेबंदी'मधील पतिनिधनानंतर कोसळणारी नाती व वाड्याचं ढासळणारं गतवैभव पचवणारी विधवा आई असो - बाईंनी मात्र समोर हाती आलेल्या भूमिकेला केवळ न्याय आणि संपूर्ण न्यायच दिला. गोळीबंद संवादफेक, हवा तो परिणाम नेमका साधण्यासाठी संवादांतील लयीवर आणि प्रसंगी शब्दविरामांवर देखील दिलेला भर, चेहऱ्यावर पसरलेले अस्सल हावभाव आणि अचूक देहबोली यातून व्यक्तिरेखा नेमकी पकडून प्रत्ययकारकपणे जिवंत उभी करण्याकडे त्यांचा कटाक्ष दिसून येतो. ६० च्या दशकातील प्रायोगिक रंगभूमीवर प्रमुख व्यक्तीरेखा बनलेल्या विजयाबाई ह्या रंगभूमीवरील रंगशारदाच जणू आहेत. ●●

# तलावांचं शहर उदयपूर

सफर शहरांची

**दो**स्तांनो, राजस्थानमध्ये उदयपूर नावाचं सुंदर शहर आहे. उदयपूर ही एके काळी मेवाड साम्राज्याची राजधानी होती. महाराणा उदयसिंहने हे शहर वसवलं. त्यामुळे या शहराला उदयपूर हे नाव पडलं. उदयपूर हे प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. उदयपूरमध्ये बरेच तलाव आहेत. हे शहर अरवली पर्वतरांगांनी वेढलेलं आहे. उदयपूरमध्ये बऱ्याच ऐतिहासिक वास्तू आहेत. पिचोला तलाव, उदयपूर सिटी पॅलेस, कुंभलगड किल्ला ही उदयपूरमधली प्रसिद्ध पर्यटनस्थळं आहेत.

उदयपूरला तलावांचं शहर असंही म्हणतात. या तलावांमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे. या शहरातले तलाव एकमेकांशी जोडलेले आहेत. त्यामुळे इथल्या पाण्याची पातळी कधीच कमी होत नाही. याच कारणामुळे उदयपूरचं वातावरणही थंड असतं. फतेहसागर, जयसमंद, बढी, दूधतलाई हे तलावही खूप प्रसिद्ध आहेत. इथल्या तलावांमध्ये नौकाविहाराचा आनंद लुटता येतो.

इथल्या पिछोला नावाच्या तलावात लेक पॅलेस नावाचं हॉटेल आहे. हे हॉटेल खूप सुंदर आहे. इथल्या कुंभलगड किल्ल्याची निर्मिती राणा कुंभाने केली होती. कुंभलगडाची भिंत खूप लांब आहे. चीनची भिंत जगातली सर्वाधिक लांबीची भिंत आहे. या भिंतीची गणना जगातल्या सात आश्चर्यांमध्ये केली जाते. त्यानंतर कुंभलगडच्या भिंतीचा क्रमांक लागतो, असं म्हणतात. ही जगातली दुसऱ्या क्रमांकाची सर्वात लांब भिंत आहे. जयसमंद हा कृत्रिम तलाव आशिया खंडातला दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा कृत्रिम तलाव आहे. उदयपूर हे खूप शांत शहर आहे. त्यामुळे या शहराला एकदा तरी भेट द्यायला हवी.







# अनोखे वाद्य सरोद

ओळख वाद्यांची

**स**रोद हे भारतीय शास्त्रीय संगीतातील एक अत्यंत महत्त्वाचे तंतुवाद्य आहे. याचा स्वर गंभीर आणि ध्यानसाधनेसारखा असतो. सरोदचा उगम अफगाणिस्तानातील रुबाब या वाद्यापासून झाल्याचे मानले जाते. अठराव्या शतकात अफगाणी रुबाब भारतात आला. त्यात काही बदल करून सरोदाची निर्मिती झाली. सरोद लाकडापासून बनवली जाते. त्याची ध्वनीपेटी धातूपासून बनवली जातेकिंवा प्राण्यांच्या कातड्याने झाकलेली असते.सरोदला साधारण १७ ते २५ तारा असतात. त्यापैकी काही मुख्य तारांवर राग वाजवला जातो. इतर तारा झंकारासाठी आणि तालासाठी वापरल्या जातात. सरोदला पट्ट्या नसतात. त्यामुळे बोटांच्या नखांनी तारा वाजवल्या जातात. त्यातून मींड किंवा गोड सरकते सूर तयार होतात. सरोदच्या तारा जवा नावाच्या पिकने वाजवल्या जातात. डावा हात तारांवर सरकवून स्वर नियंत्रित केले जातात. सरोदचा वापर प्रामुख्याने हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील राग सादर करण्यासाठी केला जातो. त्यात आलाप, जोड, झाल व गट अशा टप्प्यांतून रचना सादर केली जाते. सरोद एकल वादनासाठी तसेच जुगलबंदीसाठीही वापरले जाते. सरोद म्हटले की पहिले नाव येते ते उस्ताद अमजद अली खान यांचे. त्यांच्याशिवाय उस्ताद अली अकबर खान, उस्ताद हाफिज अली खान यांच्या घराण्यानेही सरोद परंपरेला मोठे योगदान दिले आहे. सरोद भारतीय शास्त्रीय संगीतातील एक अनमोल रत्न मानले जाते.






# पर्याय व्होकेशनल अभ्यासक्रमांचा

कोण होणार?

**दो**स्तांनो, आता करिअरचे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. काही वर्षांपूर्वीपर्यंत डॉक्टर, इंजिनिअर, एमबीए, सीए, सरकारी नोकरी, बँकिंग या क्षेत्रांकडेच विद्यार्थ्यांचा कल असायचा पण आता व्होकेशनल म्हणजे व्यावसायिक अभ्यासक्रमांचं आकर्षण वाढताना दिसत आहे. पारंपरिक अभ्यासक्रमांऐवजी वेगळ्या वाटा निवडण्याकडे अनेकांचा कल असतो. बारावी किंवा पदवीनंतर अशा अभ्यासक्रमांची निवड करून चांगलं करीअर करता येतं. अशा काही पर्यायांविषयी...

▶ परदेशी भाषा शिकून तुम्ही विविध क्षेत्रांमध्ये मुशाफिरी करू शकता. नोकरीतही परदेशी भाषेचा लाभ होऊ शकतो. पर्यटनाच्या क्षेत्रात चांगला वाव मिळू शकतो. तसंच तुम्ही दुभाषक म्हणूनही काम करू शकता. लेखन क्षेत्रात करीअर करू शकता.



▶ हॉटेल मॅनेजमेंटचा चांगला पर्याय तुमच्यापुढे आहे. खवय्ये असाल किंवा स्वयंपाक येत असेल तर या क्षेत्रात जाता येईल.

▶ ट्रॅव्हल आणि टूरिझमचा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही पर्यटनाची हौस भागवू शकता. यानंतर सरकारी तसंच खाजगी क्षेत्रात नोकरी करता येईल. पुरेशा अनुभवानंतर स्वत:चा व्यवसाय सुरू करता येईल.

▶ सध्या वेगवेगळ्या प्रकारची पादत्राणं तयार केली जातात. प्लास्टिक, रबर, ताग तसंच इतर साहित्य वापरून पादत्राणांची निर्मिती केली जाते. फुटवेअर डिझायनिंग हा करीअरचा उत्तम पर्याय ठरू शकतो.

▶ कलाक्षेत्रात रस आणि कल्पकता असल्यास टेक्सटाईल डिझायनिंग, टूल अँड डाय मेकिंग, टेक्सटाईल डिझाइन, फॅशन डिझाईन, इंटिरिअर डिझाईन अशा पर्यायांकडे वळता येईल.

# दक्षिणगंगा कावेरी

जीवनदायिनी नदी

**का**वेरी दक्षिण भारतातील अत्यंत महत्त्वाची नदी आहे. तिचा उगम कर्नाटक राज्यातील कोडगू जिल्ह्यातील ब्रह्मगिरी टेकड्यांमधून होतो. कावेरी नदीची लांबी साधारण ८०५ किलोमीटर आहे. ती कर्नाटक आणि तमिळनाडू या राज्यांतून वाहते. शेवटी बंगालच्या उपसागराला मिळते. धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्या खूप महत्त्वाची असल्यामुळे कावेरी नदीला 'दक्षिणगंगा' म्हटले जाते. कावेरी नदीचा प्रवास खूप सुंदर आहे. ती डोंगर, दऱ्या, जंगल आणि मैदानांतून वाहत जाते. या प्रवासात हरंगी, हेमावती, शिम्शा, भवानी आणि अमरावती यासारख्या अनेक उपनद्या तिला मिळतात. पिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी कावेरी नदीवर अनेक धरणे आणि कालवे बांधले गेले आहेत. कृष्णराज सागर धरण, मेट्टूर धरण ही महत्वाची धरणे आहेत. या धरणांमुळे केवळ शेतीसाठीच नव्हे तर पिण्यासाठी आणि वीज निर्मितीसाठीही पाणी उपलब्ध होते. धार्मिकदृष्ट्या कावेरी नदीला फार मोठे स्थान आहे. कावेरीला देवी मानले जाते. कावेरीच्या तीरावर अनेक धार्मिक उत्सव आणि मेळावे भरवले जातात. तिरुचिरापल्ली, श्रीरंगम, तलाकावेरी, मयिलाडुथुराई यांसारखी शहरे कावेरीच्या काठी आहेत. कावेरीला पवित्र मानून तिच्या काठावर स्नान व पूजा केली जाते. कर्नाटक आणि तमिळनाडू या दोन्ही राज्यांसाठी कावेरी ही जीवनरेखा आहे. परंतु आज कावेरी नदीसमोर प्रदूषण, जास्त पाणी उपसा आणि हवामानातील बदल ही आव्हाने आहेत. शहरांमधील सांडपाणी, कारखान्यांचा कचरा आणि प्लास्टिक यामुळे नदीचे पाणी दूषित होत आहे. त्यामुळे कावेरी नदीचे रक्षण करणे आणि तिचे पाणी शुद्ध ठेवणे आवश्यक आहे.



# हॅलोविनची गोष्ट

आयरिश लोककथा

**आ**यर्लंडमधल्या क्लोव्हरविल नावाच्या एका छोट्याशा गावातली गोष्ट. हॅलोविनचा दिवस होता. सगळीकडे भोपळ्याचे दिवे लावले होते. कोळ्याच्या जाळ्यांची आणि चेटकिणीच्या मुखवट्यांची सजावट केली होती. मुले रंगीबेरंगी भुतांचे कपडे घालून घरोघरी जात होती. त्या गावात एक घर होते. तिथे मिसेस मॉर्गन राहायच्या. सगळ्या मुलांना त्यांची भीती वाटायची. कुणी तिकडे गेले की दरवाजा आपोआप बंद व्हायचा. आतून हसण्याचा आवाज यायचा. हू हू हू!




मुले पळतच पुढच्या घरात जायची. मिसेस मॉर्गनच्या घरापाशी कुणीच थांबायचे नाही. लिअमला त्या घराबद्दल खूप कुतूहल वाटायचे. त्या दिवशी लिअम मुळीच ऐकेना. मी तिला भेटणारच! ती जर भूत असेल, तर मी तिला माझ्या गोळ्या देऊन टाकेन! सगळे मित्र हसले. पण लिअम टॉर्च घेऊन त्या घरात गेला. आत गुडुप अंधार होता. कोळ्याची जाळी होती. टेबलावर खूप जुने कपकेक्स ठेवले होते. अगदी दगडासारखे कडक!

अचानक त्याला मागून कोणी तरी म्हणालं, अरे माझे कपकेक्स चोरतोस काय?



लिअम घाबरून वळला, तर एक आजीबाई मोठ्ठी टोपी घालून, चमकदार मोजे आणि हॅलोविनचा एप्रन घालून उभी होती! मी भूत नाही. पण दरवर्षी हॅलोविनला मी शूर मुलाची वाट बघते. मला वाटते, की कुणीतरी शूर मुलगा येईल आणि मी त्याला भरपूर खाऊ देईन !

लिअमला आनंद झाला. त्याने त्याच्या सगळ्या मित्रांना बोलावलं. आजीबाईंनी मुलांच्या डोक्यावर चॉकलेट्स आणि गोळ्यांचा पाऊसच पाडला. त्या दिवसापासून क्लोव्हरविलमध्ये मिसेस मॉर्गनच्या घराला कुणी घाबरत नाही. मिसेस मॉर्गन आणि मुले मिळून गाणी गातात. भोपळे सजवतात आणि मजा करतात.



# ओळखा पाहू

जिज्ञासा

१) व्हॉलीबॉलचा जन्म कोणत्या देशात झाला?
२) झुंबा काय आहे?
३) दिवसा चंद्रावरचं तापमान कमी असतं का जास्त?
४) पहिल्या महायुद्धाची सुरुवात कधी झाली?
५) आईस हॉकीच्या संघात किती खेळाडू असतात?
६) हवेची गती मोजण्यासाठी कशाचा वापर केला जातो?
७) एलपीजी हे कोणत्या दोन वायूंचं मिश्रण असतं?
८) जगातला सर्वात उष्ण खंड कोणता?
९) जगातला सर्वात लोकप्रिय खेळ कोणता?
१०) पाब्लो पिकासो कोण होता?

उत्तर : १) अमेरिका २) नृत्य प्रकार ३) जास्त ४) १९१४ ५) सहा ६) ॲनिमोमीटर ७) ब्युटेन आणि प्रोपेन ८) आफ्रिका ९) फुटबॉल १०) चित्रकार

## ठिपके जुळवा



# अशी बनते तुमची आवडती जेली...

फन टाईम



**छो**ट्या दोस्तांनो, जेली हा प्रकार बराच लोकप्रिय आहे. महाराष्ट्रात महाबळेश्वरमध्ये मोठ्या प्रमाणावर जेली तयार होते. ही जेली मस्त लागते. गोल आकाराची, रंगीबेरंगी जेली पाहताच खावीशी वाटते. डेझर्टसोबतही जेली येते. अमेरिकेत जेलीला जेल–ओ असं म्हटलं जातं. तापमानानुसार जेलीचा आकार बदलत जातो. ० ते २० अंश सेल्सियस तापमानात जेली सेट होते. पण हे तापमान थोडंसं वाढलं तरी जेली वितळायला लागते. तापमान कमी झाल्यावर पुन्हा घट्ट होते. जेली सेट करण्यासाठी कोणत्या घटकाचा वापर केला जातो, हे तुम्हाला माहित आहे का? यासाठी जिलेटिनचा वापर केला जातो. जिलेटिन हा जेल बनवणारा घटक आहे. प्राण्यांच्या शरीरातल्या टिश्यूंमध्ये सापडणाऱ्या कोलाजन नामक प्रथिनांचा वापर करून जिलेटिन तयार केलं जातं. प्राण्यांची त्वचा किंवा हाडं पाण्यात उकळल्यानंतर जिलेटिन तयार होतं. प्राण्यांच्या टिश्यूंपासून कोलाजनचे तंतू वेगळे होतात. त्यांची पाण्यासोबत प्रक्रिया घडते आणि जिलेटिन तयार होतं. अगदी एक टक्का कोलाजन पाण्यात वितळवल्यानेही जिलेटिन तयार होऊ शकतं.

जिलेटिनमध्ये प्रथिनांची मोठी साखळी असते. गरम पाण्याशी संपर्क आल्यानंतर त्यांचं रूपांतर सूक्ष्म तंतूंमध्ये होतं. हे तंतू पाण्यातल्या सूक्ष्म कणांना स्वत:कडे आकर्षित करतात. यामुळे पाण्यातल्या सूक्ष्म कणांची संख्या कमी होते. हे मिश्रण थंड झाल्यानंतर पाणीयुक्त सूक्ष्म कण एकमेकांवर आदळतात आणि गुंतून बसतात. उरलेलं पाणी प्रथिनांच्या तंतूंमध्ये एकत्र बांधलं जातं आणि या मिश्रणाचं रूपांतर जेलमध्ये होतं. मार्शमॅलो आणि आईसक्रीममध्येही जिलेटिनचा वापर केला जातो. आजघडीला जिलेटिनऐवजी स्टार्च आणि पेक्टिनचा वापर करूनही पदार्थांना घट्टपणा दिला जातो. स्टार्च आणि पेक्टिन हे साखरेचे प्रकार आहेत. त्यांना गुंतागुंतीची कर्बोदकं असंही म्हटलं जातं.

## दोस्त हे मस्त

### पर्शियन मांजर



मुलांनो, कुत्र्यांप्रमाणे मांजराच्याही वेगवेगळ्या प्रजाती असतात. यापैकी एक म्हणजे पर्शियन प्रजातीचं मांजर. हे मांजर खूप गोंडस असतं. त्याला भरपूर केस असतात. पर्शियन मांजर खूप महाग असतं. मांजराच्या या प्रजातीला बरीच मागणी असते. पर्शियन मांजरांची खूप काळजी घ्यावी लागते. त्यांच्याकडे नीट लक्ष द्यावं लागतं. पर्शियन मांजर १० ते १७ वर्षांपर्यंत जगतं. या मांजराचा थाट राजेशाही असतो! पर्शियन मांजर खूप खेळकर आणि प्रेमळ असतं.

## खादाडी


### पौष्टिक पालक रायता



मुलांनो, थोडे आरोग्यदायी पदार्थ खाणंही गरजेचं आहे. म्हणूनच पालक रायता बनवून बघा. यासाठी दोन कप दही, दोन कप बारीक चिरलेला पालक, पाव चमचा लाल तिखट, अर्धा चमचा जिरेपूड, अर्धा चमचा साखर, अर्धा चमचा मिरपूड असं साहित्य घ्या. मीठ, दोन चमचे तेल, थोडी मोहरी आणि कढीपत्ता असं साहित्य घ्या. एका कढईत थोडं तेल गरम करा. त्यात जिरं घाला. यात पालक घालून परतून घ्या. पालक थोडा शिजू द्या. मग गॅस बंद करा. आता एका भांड्यात दही, जिरेपूड, लाल तिखट, मिरपूड आणि मीठ घालून हलवून घ्या. आता छोट्या भांड्यात तेल घाला. तेल गरम झाल्यावर मोहरी घाला. मग कढीपत्ते घाला. हा तडका दह्यात घाला. मग शिजवलेला पालक घाला. तुमचा पालक रायता तयार आहे.

## स्टडी टिप्स


### मेंदूला द्या आराम



मुलांनो, परीक्षेच्या काळात तुम्हाला टीव्ही बघू दिला जात नाही. जास्त वेळ टीव्ही बघू नका, असंही सांगितलं जातं. टीव्ही बघण्यापेक्षा अभ्यास करणं गरजेचं असलं तरी दिवसभरात थोडा वेळ म्हणजे तासभर टीव्ही बघायला हरकत नाही. आपल्या आवडीचा कार्यक्रम बघितल्यावर मेंदू ताजातवाना होतो आणि तुम्ही अधिक जोमाने अभ्यास करू शकता. त्यामुळे तुम्ही अगदी थोडा वेळ टीव्ही बघू शकता. यामुळे मेंदूला आराम मिळू शकतो.

## योगा टाईम

### करा मर्कटासन



मुलांनो, तुम्हाला वर्गात बराच काळपर्यंत बसावं लागतं. तुम्ही घरी बसून अभ्यास करता. शिवाय स्मार्टफोनमुळे मैदानी खेळांचं प्रमाणही कमी झालं आहे. यामुळे अगदी लहान वयात पाठदुखी, खांदेदुखीसारख्या तक्रारी जाणवू लागल्या आहेत. म्हणूनच तुम्ही मर्कटासन करायला हवं. या आसनामुळे शरीर लवचिक होतं. पाठीच्या कण्याला आराम मिळतो आणि पाठदुखीचा त्रास कमी होतो.

# भारताचा ऑस्ट्रेलियावर शानदार विजय

■ सुंदरकडून बळींचा ट्रीपल धमाका
■ मालिकेत २-१ अशी आघाडी

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

गोल्डकोस्टवर सूर्य मावळत होता, पण ऑस्ट्रेलियाचा सूर तर चौथ्या टी-२० सामन्यातच मावळला! भारताने केवळ १६७ धावा केल्या आणि तेवढ्याच संख्येवर काय होईल? असे वाटत असतानाच अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी फिरकीचे जाळे असे लावले की, कांगारूंना धावफलकच सापडेनासा झाला. ४८ धावांनी झालेला विजय हा भारताचा ऑस्ट्रेलियातला सर्वात मोठा टी-२० विजय ठरला आणि मालिकेत २-१ अशी आघाडी मिळाली.




## दुवेची दुहेरी ठोसेबाजी

शिवम दुबे या खेळाडूचे नाव ऐकले की, सौम्य गोलंदाजी आठवते, पण गोल्ड कोस्टवर त्याने स्लोअर शॉक दिला. मिचेल मार्श चांगला रंगात आला होता तेव्हा दुबेनं त्याला अर्शदीपकडून झेलबाद केले. पुढच्याच क्षणी टिम डेविडने दुबेला षटकार ठोकला

## वॉशिंग्टनचे वादळ

ऑस्ट्रेलिया अर्धा संघ ९८ धावांत ढासळल्यानंतर ग्लेन मॅक्सवेल हा शेवटचा आशेचा किरण होता. पण वरुण चक्रवर्तीच्या चेंडूवर त्याचा त्रिफळा उडाला आणि प्रकाशच गेला! मग वॉशिंग्टन सुंदरने आपली स्वच्छता मोहीम सुरू केली. मार्पस स्टॉयनिस पायचीत, आणि पुढच्याच चेंडूवर झेव्हियर बार्टलेटचे स्टंप पाडले. दोन चेंडूत दोन विकेट्स म्हणजे गोल्ड कोस्टवर सुंदर चक्रीवादळ होते.

नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल यांनी दिलेली ५६ धावांची सलामी भारतासाठी सोन्याहून पिवळी ठरली. शुभमन गिलचे ४६ धावाचे संयमी, पण स्मार्ट इनिंग म्हणजे जणू ऑस्ट्रेलियाच्या मैदानावर शिस्तीची शिकवण दिली.

दुबे आणि सूर्यकुमार यांनी काही चमकदार फटके मारले, पण मधल्या फळीत झम्पाने तिलक वर्मा आणि जितेश शर्माला बाद करून गती कमी केली.

शेवटी अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन यांनी शेवटच्या काही षटकांत मिळवलेल्या धावा त्या धावांनीच पुढचे चित्र रंगवले.

१६८ धावांचे लक्ष्य म्हणजे थोडंफार मारले तर जमेल अशी भावना घेऊन आलेल्या कांगारूंना भारतीय फिरकीपटूंनी थोडंफार फिरवले आणि बाकीचे काम दुबेने हळूवार हाताने केले. पहिल्या तीन सामन्यांत फारसा गाजावाजा न करणारा अक्षर पटेल इथे आला आणि त्याच्या बोटांमधून नुसता चेंडू नाही, तर भ्रमाचा भुंगा निघत होता. मॅथ्यू शॉर्ट स्वीप करण्याच्या मोहात पायचीत झाला आणि जोश इंग्लिसचा ऑफ स्टंप अक्षरच्या जलद फिरकीने उडवला. पंचांनी सुरुवातीला नकार दिला होता, पण रिह्यूने सत्य उघडलं. कांगारूंच्या डोक्यावर पहिला झटका बसला. शेवटी जसप्रीत बुमराने बेन ड्वारशुईसचा त्रिफळा उडवून काम संपवलं आणि वॉशिंग्टनने झम्पाला झेलबाद करून ऑस्ट्रेलियाचा डाव पूर्ण केला. भारताकडून वॉशिंग्टन सुंदरने ३ विकेट्स, अक्षर पटेल आणि दुबे यांनी २-२, तर अर्शदीप, चक्रवर्ती आणि बुमराने १-१ विकेट घेतली.

# तायक्वांदो स्पर्धेत प्रज्योतीला सुवर्णपदक




| मुंबई | प्रतिनिधी |

रत्नागिरी जिल्ह्यातील डेरवण येथे झालेल्या ३५ व्या महाराष्ट्र राज्य ज्युनिअर क्युरोगी आणि ११ व्या पूमसे तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेत प्रज्योती जाधव हिने सुवर्णपदक पटकावले आहे. तसेच प्रणव कुडाळकर याने कांस्यपदक पटकावर मोहोर उमटवली आहे.

तायक्वांदो असोसिएशन ऑफ सिंधुदुर्गच्यावतीने देवाशिष नर, प्रणव कुडाळकर, अथर्व तेली, व मुलींमध्ये दुर्वा गावडे आणि प्रज्योती जाधव अशा एकूण पाच खेळाडूंनी राज्य स्पर्धेत सिंधुदुर्ग जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले होते. त्यापैकी प्रज्योती जाधव हिने ५९ ते ६३ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले व बेंगलोर येथे ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय ज्युनियर तायक्वांदो स्पर्धेकरिता आपली जागा पक्की केली. तर प्रणव कुडाळकर याने ४५ ते ४८ वजनी गटात कांस्यपदक मिळवले. दोन्ही खेळाडू कणकवली नगरवाचनालय येथील मास्टर स्पोर्टस तायक्वांदो अकॅडमीमध्ये राष्ट्रीय तायक्वांदो प्रशिक्षक एकनाथ धनवटे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहेत. सर्व खेळाडूंचे भालचंद्र कुलकर्णी, सुधीर राणे, अमित जोशी, विनायक सापळे यांनी अभिनंदन केले आहे.

## महिला विश्व चषक ठरला ‘पर्यावरणपूरक’

| नवी मुंबई | वृत्तसंस्था |

भारतातील एकात्मिक नगर ठोस कचरा व्यवस्थापन क्षेत्रातील अग्रणी कंपनी अँटनी वेस्ट हँडलिंग सेल लिमिटेडने नवी मुंबईतील पाटील स्टेडियमवर झालेल्या क्रिकेट विश्वचषकासाठी एक सर्वसमावेशक आणि यशस्वी कचरा व्यवस्थापन कार्यक्रम पूर्ण केल्याची घोषणा केली आहे. या उपक्रमामुळे मैदानात स्वच्छ, टिकाऊ आणि कार्यक्षम कचरा पुनर्प्रक्रिया प्रक्रिया सुनिश्चित झाली, ज्यामुळे भारतातील पर्यावरणपूरक क्रीडा स्पर्धांसाठी एक नवा आदर्श स्थापित झाला आहे.

## निवडक



### कृतिक, नेहाचे जिल्हास्तरीय स्पर्धेत यश

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील मुनवली येथील कृतिक बांद्रे व नेहा बांद्रे यांनी पिल्लई कॉलेज रसायनी येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत दोघांनीही प्रथम क्रमांक पटकावला आहे, याबाबत सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. पिल्लई कॉलेज रसायनी येथे झालेल्या शालेय विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील स. म. वडके विद्यालयातील विद्यार्थी कृतिक संतोष बांद्रे याने ५ हजार मीटर चालणे स्पर्धेत भाग घेत प्रथम क्रमांक पटकावला तर व नेहा पांडुरंग बांद्रे हिने भाला फेक स्पर्धेत भाग घेत प्रथम क्रमांक पटकावला. या जिल्हास्तरीय स्पर्धेत दोघांनी सहभाग घेऊन आपल्या विद्यालयाचे व मुनवली गावाचे नाव उज्वळ केल्याबद्दल मापगाव ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या सानिका घाडी तसेच सचिन घाडी मित्रमंडळ मुनवली चे सर्व कार्यकर्ते यांनी बांद्रे यांच्या निवासस्थानी जाऊन पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.

### एमसीएचा वाद चिघळण्याची चिन्हं

**मुंबई :** बहुचर्चित मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या




निवडणुकीचा वाद आणखी चिघळण्याची चिन्हं आहेत. एमसीएच्या निवडणुकीतील अंतिम उमेदवार यादीवर आक्षेप घेत एमसीएच्या काही सदस्यांनी या यादीला मुंबई हायकोर्टात आव्हान दिले आहे. या याचिकेवर मंगळवारी प्राथमिक सुनावणी घेत तूर्तास पात्र उमेदवारांची यादी जाहीर करू नका, असे आदेश हायकोर्टाने जारी करत या याचिकेवर गुरुवार (दि.६) नोव्हेंबर रोजी पुन्हा सुनावणी घेतली. या सुनावणीत याचिकाकर्त्यांनी कोर्टाला माहिती दिली की, त्यांचे आक्षेप का फेटाळण्यात आले आहेत, याचा सविस्तर आदेश संबंधित निवणूक अधिकाऱ्यांकडून त्यांना नुकताच प्राप्त झालाय. त्याचा अभ्यास करून त्यानुसार याचिकेत बदल करण्याची संधी द्यावी, अशी विनंती करण्यात आली.

### रस्सीखेच स्पर्धेत प्रणवला सुवर्ण

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय बीच एशियन रस्सीखेच स्पर्धेत नाशिक



जिल्ह्यातील जायगाव (ता. सिन्नर) येथील खेळाडू प्रणव किशोर दिघोळे याने सुवर्ण व कांस्यपदक जिंकून भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात मलेशियामध्ये ही स्पर्धा पार पडली. प्रणवने २३ वर्षांखालील गटात कुवैतविरुद्ध सुवर्ण आणि २३ वर्षांखालील गटात मिक्स ४ बाय ४ गटात कांस्य पदक जिंकले. या यशाबद्दल असोसिएशनच्या अध्यक्षा माधवी पाटील, संजय पाटील, स्वप्नील करपे, विनोद शिरभाते, सुरेखा पाटील आदींनी प्रणवचे अभिनंदन केले. त्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे नाव उज्ज्वल केल्याने त्याचे महाराष्ट्रासह देशभरात कौतुक होत आहे.

### मोहसीना सोडावं लागणार पद?

**नवी दिल्ली :** आशिया कप ट्रॉफीभोवती सुरू असलेल्या



वादाच्या पार्श्वभूमीवर, बीसीसीआय मोहसिन नक्वी यांना लक्ष्य करण्याची तयारी करत आहे. मीडिया माहितीनुसार, बीसीसीआयने नक्वी यांच्याविरुद्ध आरोपांची यादी तयार केली आहे, जी आयसीसीच्या बैठकीत सादर केली जाऊ शकते. नक्वी हे सध्याचे पीसीबी अध्यक्ष आहेत आणि आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष देखील आहेत. बीसीसीआयने आरोप केला आहे की नक्वी यांनी आयसीसीच्या ऑपरेशनल नियमांचे उल्लंघन केले आहे. बीसीसीआयने मोहसिन नक्वी यांच्याविरुद्ध आरोपांची यादी तयार केली आहे. बीसीसीआय त्यांच्या क्रीडा पदांवर राहण्याच्या पात्रतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा विचार करत आहे.

### १३ खेळाडूंना बाहेरचा रस्ता

**मुंबई :** मुंबई इंडियन्सने रिटेन केलेल्या खेळाडूंच्या नावाची घोषणा केली आहे. २०२६ च्या मोसमासाठी खेळाडूंची यादी जाहीर करण्याचा आजचा शेवटचा दिवस होता, त्याआधी मुंबईने रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर केली आहे. पुढच्या सिझनसाठी मुंबईने फक्त ५ खेळाडूंना रिटेन केलं आहे, तर १३ खेळाडूंना बाहेरचा रस्ता दाखवला आहे.२७ नोव्हेंबरला दिल्लीमध्ये खेळाडूंचा लिलाव पार पडणार आहे, त्यामुळे सर्व फ्रॅन्चायजींना रिटेन आणि रिलीज केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करण्यासाठी आजची डेडलाईन देण्यात आली होती, त्यानुसार मुंबई इंडियन्सने रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी प्रसिद्ध केली आहे. महिला प्रीमियर लीगच्या यंदाच्या मोसमासाठी मुंबईने वर्ल्ड कप विजेती कर्णधार हरमनप्रीत कौर, नॅट स्कीव्हर ब्रंट, अमनजोत कौर, जी कमालिनी आणि हिली मॅथ्यूज यांना रिटेन केलं आहे. पण तब्बल १३ खेळाडूंना मुंबई इंडियन्सने बाहेर केले आहे.


**मुंबईने बाहेर केलेले खेळाडू**

पूजा वस्त्रकार, यास्तिका भाटिया, शबनीम इस्माईल, एमिलिया केर, नदिने डे क्लार्क, च्लोई ट्रायन, अक्षीता महेश्वरी, संजीवन सजना, सत्यमूर्ती कीर्तना, साईका इशाक, संस्कृती गुप्ता, अमनदीप कौर, जिंतामणी कलिता

# आरसीबीच्या चाहत्यांना विराट धक्का

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

इंडियन प्रीमियर लीग आणि वुमन प्रीमियर लीगमध्ये चषक जिंकणारा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हा संघ विक्रीच्या उंबरठ्यावर उभा आहे. आगामी हंगामापूर्वी आरसीबीची विक्री होणार असून त्या संदर्भात हालचाली सुरू झाल्या आहेत. ब्रिटिश स्पिरिट्स क्षेत्रातील दिग्गज कंपनी डियाजिओ पीएलसीने ३१ मार्च २०२६ पूर्वी नवीन मालक शोधून संघाची विक्री केली जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. या संदर्भात बुधवारी मुंबई स्टॉक एक्सचेंजला पत्रही लिहिण्यात आले आहे.



रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ विक्रीला

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने २०२४ मध्ये आयपीएल ट्रॉफीवर नाव कोरले. मात्र आता मद्य व्यवसायावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी आरसीबीची विक्री करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २०१६ मध्ये मल्ल्याच्या अडचणी वाढैल्या आणि त्याने डियोजिओ कंपनीला मद्य कंपन्यांसोबत आरसीबीचीही विक्री केली. २००८ मध्ये मल्ल्याने १११.६ मिलियन मध्ये हा संघ खरेदी केला होता.

## मुंबई उपनगर असोसिएशन कबड्डी स्पर्धा

# सुरक्षा प्रबोधिनी, सिद्धिविनायकची विजयी सलामी

| मुंबई | प्रतिनिधी |

सुरक्षा प्रबोधिनी, सिद्धिविनायक यांच्या कुमार, तर संघर्ष, प्रबोधिनी स्पोर्ट्स यांच्या कुमारी गटातील विजयाने मुंबई उपनगर कबड्डी असो. पश्चिम विभागाच्या निवड चाचणी कबड्डी स्पर्धेला प्रारंभ झाला. मुंबई उपनगर कबड्डी असो. च्या मान्यतेने गजानन क्रीडा मंडळ व पार्ले स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने पार्ले येथील प्ले ग्राऊंडवर सुरू झालेल्या कुमारांचा पहिल्या सामन्यात मालाडच्या सुरक्षा प्रबोधिने दहिसरच्या रत्नदीप कबड्डी संघाचा ४१-२३ असा पराभव करीत विजयी सलामी दिली. राम गुप्ता, विराज घाणेकर यांचा चढाई पकडीच्या उत्कृष्ट खेळाला याचे श्रेय जाते. रत्नदीपच्या अभिषेक सरोज, शैलेश तारकाते यांचा खेळ संघाला विजयी करण्यात कमी ठरला.



दहिसरच्या सिद्धिविनायक मंडळाने मालाडच्या दत्तगुरु मंडळाला नमवित आगेकूच केली. पूर्वार्धात २१-११ अशी आश्वासक आघाडी घेणाऱ्या सिद्धिविनायक मंडळाला उत्तरार्धात दत्तगुरूने विजयासाठी चांगलेच झुंजविले. नीरज बाईत, प्रभात चौधरी सिद्धिविनायक कडून, तर प्रशांत सावंत, निहार गावडे दत्तगुरु संघाकडून उत्तम खेळले. कुमारी गटात गोरेगावच्या संघर्ष मंडळाने दहिसरच्या जगदंब मंडळाचा सहज पाडाव केला. पहिल्या डावात झंझावाती खेळ करीत संघर्षने २७-०८ अशी भक्कम आघाडी घेतली. कुसुम कुरकी, दिशी कोपलकर यांच्या सुरुवातीच्या आक्रमक खेळाला या विजयाचे श्रेय जाते. जगदंबची सायली पाटील बरी खेळली. गोरेगावच्या प्रबोधिनी स्पोर्ट्स ने यजमान पार्ले स्पोर्टस्‌चा ४०-१३ असा धुव्वा उडविला तो आचल पाल, आशू यादव यांच्या सर्वांगसुंदर खेळामुळे. पार्लेची दीपाली गुरव बरी खेळली.

या स्पर्धेचे उद्घाटन द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त गणेश देवरुखकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्याप्रसंगी आ. पराग आळवणी, सुधाकर घाग, मिलिंद शिंदे उपस्थित होते.

## सिंधुदुर्ग कबड्डी संघाचा अर्जुन कर्णधार

| कुडाळ | प्रतिनिधी |

जयप्रकाश नारायण माध्यमिक विद्यालयाचा नववीतील विद्यार्थी अर्जुन चव्हाण याची किशोर गट सिंधुदुर्ग कबड्डी संघाच्या कर्णधारपदी निवड झाली. जिल्हा कबड्डी फेडरेशनच्या वतीने झालेल्या किशोर आणि किशोरी गट निवड चाचणीत वाडोस विद्यालयाचा संघ अजिंक्य ठरला. यात अष्टपैलू कामगिरी करणारा अर्जुन चव्हाण याला कप्तानपदी संधी देण्यात आली असून, तो ६ ते ९ नोव्हेंबरदरम्यान पुणे येथे होणाऱ्या राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत सिंधुदुर्ग संघाचे नेतृत्व करणार आहे. त्याच्या निवडीबद्दल कबड्डी प्रशिक्षक डॉ. आनंद राठ्ये, मुख्याध्यापकांनी त्याचे अभिनंदन केले.

## रायगडच्या क्रिकेट खेळाडूंचा निवड चाचणीमध्ये समावेश

| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या सोळा व एकोणीस वर्षाखालील मुलांची महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या संघ निवड चाचणी शिबिरामध्ये करण्यात आली आहे. सोळा वर्षाखालील मुलांच्या निवड चाचणी शिबिरासाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या चार खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

रायगडचा कर्णधार पंकज इटकर, आर्यन काळे, साहिल पोपेटा व आर्यन निकाळजे यांना पुणे येथे एमसीए निवड चाचणी व प्रशिक्षण कॅम्पसाठी हजर राहण्याची सूचना करण्यात आली आहे.गेल्या हंगामात सोळा वर्षाखालील मुलांची आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धा रायगड जिल्ह्यात घेण्यात आली होती. सदरच्या स्पर्धेत रायगड जिल्ह्याचा संघ सुपर लीग फेरीसाठी पात्र झाला होता, साखळी फेरीत वरील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली असल्याने त्यांची निवड चाचणी शिबिरासाठी करण्यात आली आहे. एकोणीस वर्षाखालील मुलांच्या निवड चाचणी शिबिरासाठी आर्यन देशमुख याची निवड करण्यात आली आहे. हे शिबिर जळगाव येथे सुरू होते. रायगड जिल्ह्यातील युवा गुणवान खेळाडूंची निवड राज्य स्तरावर होत असल्याने रायगड जिल्ह्यातील युवा खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून येणाऱ्या क्रिकेट हंगामात जिल्ह्याचा संघ मुला-मुलींच्या विविध वयोगटात चांगली कामगिरी करेल अशी आशा रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे.

# आशियाई कपसाठी भारतीय संघाची घोषणा

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय फुटबॉल संघ बांगलादेशविरुद्धच्या औपचारिक आशियाई कप पात्रता फेरीचा सामना खेळणार आहे. या सामन्यासाठी भारतीय फुटबॉल संघ जाहीर करण्यात आला आहे. संघाचे मुख्य प्रशिक्षक खालिद जमील यांच्याकडून बुधवारी बांगलादेशविरुद्धच्या औपचारिक आशियाई कप पात्रता फेरीसाठी २३ सदस्यीय संभाव्य खेळाडूंची यादी जाहीर करण्यात आली आहे. हा सामना १८ नोव्हेंबर रोजी ढाका येथे खेळवण्यात येणार आहे. भारतीय संघ २०२७ मध्ये सौदी अरेबियामध्ये होणाऱ्या मुख्य स्पर्धे साठी पात्र ठरण्यात अपयशी ठरला आहे. गेल्या महिन्यात मडगाव येथे सिंगापूरकडून भारतीय संघाला २-१ असा पराभव स्वीकारावा लागला होता. नंतर यादीत आणखी खेळाडूंचा समावेश केला जाईल असे समजते.




अंतिम संघात सहसा २३ खेळाडू असतात. छेत्रीचे नाव यादीत समाविष्ट केले जाईल की नाही हे अद्याप माहित नाही. त्याने आपली निवृत्ती मागे घेऊन पात्रता फेरीत खेळण्याचा निर्णय घेतला होता, परंतु भारत पात्र ठरू शकला नाही. एएफसी चॅम्पियन्स लीग २ गटातील सामन्यात एफसी गोवाचा सामना अल झवरा एससीशी होईल. आत्तापर्यंत प्रशिक्षकाचा बेधडक निर्णय भारतीय फुटबॉल संघाचे प्रशिक्षकपद सांभाळल्यापासून मुख्य कोच खालिद जमील यांनी अनेक बेधडक निर्णय घेतले आहे.

**किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा | सोलापूरचा अथर्व सोनार चमकला**

# रत्नागिरी, लातूर, नंदुरबारची आगेकूच

| पुणे | प्रतिनिधी |

मुंबईशहर पश्चिम, रत्नागिरी, नंदूरबार, यांची किशोरी तर लातूर नंदुरबार व पुणे शहर यांची ३६ व्या किशोर किशोर राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत आपआपल्या गटात आगेकुच सुरू ठेवली आहे. पिंपरी चिंचवड बोपखेल येथील श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत कै. राकेशभाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान संघ व विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांच्या वतीन आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या दिवसातील पहिल्या सत्रात झालेल्या सामन्यात किशोरी विभागात ह गटात मुंबई शहर पश्चिम संघाने मुंबई उपनगर पूर्व संघाचा सहज पराभव केला. आक्रमक पवित्रा घेत मुंबई शहर पश्चिम संघाने विश्रांती पुर्वी दोन लोन देत २५-९ अशी भक्कम आघाडी घेतली. मुंबई शहरच्या पायल कांचन, श्रृतीका शिंदे यांच्या आक्रमणाला उपनगरकडे तोड नव्हती.





उपनगरच्या सई ताम्हाणेकर हिने काही पकडी घेत मुंबईला थोडाफार प्रतिकार केला. किशोरी ब गटात नंदुरबारने बीड संघाचा फडशा पाडला. विश्रांतीलाच ३२-९ अशी आघाडी घेणाऱ्या नंदुरबारने आपल्या आक्रमणाची धार कायम राखत ३४ गुणाच्या मोठ्या फरकाने सामना आपल्या बाजुला झुकविला. वैष्णवी देवकाते, अनुष्का झेंडे यांच्या अष्टपैलू खेळाला या विजयाचे श्रेय जाते. किशोर विभागात अत्यंत चुरशीच्या झालेल्या ग गटात लातूरने बलाढ्य अशा मुंबई उपनगर पश्चिमला ५२-४९ असे चकविले. मुंबई उपनगरने विजयासाठी चांगलेच झुंजविले. रुद्र सारोळ, रितेश चव्हाण, आदित्य बने लातूरकडून तर स्वरूप बाईत, संदिप विश्वकर्मा, उमाशंकर वर्मा उपनगरकडून उत्कृष्ठ खेळले. नंदुरबारने मुंबई शहर पश्चिम संघाला ‘ह’ गटात नमवित आगेकुच केली. सुदर्शन अडकित्ते, निलेश पाटील यांच्या झंजावाती चढाया व संभव बनकर, शंतनु महसके यांच्या पकडी या मुळे नंदुरबारला हा विजय सोपा गेला. मुंबई शहर पश्चिमकडून आयुष कनोजिया, जैयस्वर संतराम, जयकिशन चौहान यांनी बऱ्या पैकी प्रतिकार केला.

‘ब’ गटात पुणे शहर संघाने सोलापूर संघाचा ५३-२६ असा पाडाव केला. कार्तिक तरडे व श्रेयश सुरवसे यांनी या विजयात उत्कृष्ठ खेळ केला. सोलापूरचा अथर्व सोनार चमकला.

### इतर सामने

किशोरी विभाग- कोल्हापूर वि.वि. हिंगोली (३८-२२), अहमदनगर वि.वि. धुळे (६४-१३), ठाणे शहर वि.वि. औरंगाबाद(४७-३५), किशोर विभाग- नांदेड वि.वि. सिंधुदुर्ग(७९-२९), पालघर वि.वि. हिंगोली(३५-२९), सातारा वि.वि. उस्मानाबाद(५०-४४)

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)